# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १६/२००५.** **दिनांक १८.१२.२००५**
**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- दुपारी १.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे रविवार दिनांक १८ डिसेंबर, २००५ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एस एस एस-वशी-०४-१४३६५-२००५, दि. १० डिसेंबर,२००५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक १८ डिसेंबर, २००५ रोजी दुपारी १.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा. श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष |
| ०३. | मा. श्री. राधाकृष्ण एकनाथ विखे पाटील. | ०४. | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग |
| ०५. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे. | ०६. | मा.श्री. प्रकाश रामदास काळे |
| ०७. | मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव | ०८. | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे. |
| ०९. | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर | १०. | मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा |
| ११. | मा.श्री.कृष्णचन्द्र श्यामसुन्दर पाण्डेय | १२. | मा. डॉ. पी. एल. तिवारी. |
| १३. | मा.श्री.कैलास गोविंदराव कोते. | | |

मा. श्री. भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबतच्या मा.श्री समि खतिब व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांचे फॅक्स /पत्राची तसेच मा.श्री. रमाकांत गणेश कर्णिक व मा.श्रीमती रिम्पल लोहिया यांचे दूरध्वनी निरोपांची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

सभेचे सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे दुखवट्याचा ठराव मांडला व तो सर्वानुमते संमत करण्यात आला.

"ख्यातनाम साहित्यिक, पत्रकार,चित्रपट निर्माते, कथा लेखक रामानंद सागर यांचे दिनांक १३/१२/२००५ रोजी, वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांनी रामायण ही मालिका टी.व्ही.वर साकारुन अवघ्या भारत वर्षाला रामभक्तीमय बनविले होते. ते साईभक्तही होते, सध्या टी.व्ही. वर त्यांची साईबाबा ही मालिका चालु आहे. श्रीसाईबाबा त्यांचे आत्म्यास शांती व सद्‌गती देवो हीच श्रीसाईचरणी प्रार्थना.

श्री.रामानंद सागर यांचे कुटूंबियाचे दुःखात सर्व विश्वस्त, संस्थानचे कर्मचारी सहभागी आहोत."

नंतर सभेने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून (कै.) रामानंद सागर यांना श्रद्धांजली अर्पण केली.

यानंतर श्रीगणेश सहकारी साखर कारखान्याच्या झालेल्या निवडणूकीत मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भा.गोंदकर यांचे नेतृत्वाखाली उभ्या असलेल्या पॅनलचे काही उमेदवार भरघोस मतांनी निवडून आले त्याबद्दल मा.अध्यक्षांचे हस्ते मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भा.गोंदकर यांचा शॉल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच राहूरी सहकारी साखर कारखान्याचे निवडणूकीत मा.विश्वस्त श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे हे निवडून आले त्याबद्दल मा.उपाध्यक्षांचे हस्ते त्यांचा शॉल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच संस्थानने केंद्रशासनाकडे संस्थानला देणगी देणाऱ्या भक्तांसाठी ३५ अेसी अंतर्गत आयकरात सवलत मिळणेबाबत प्रस्ताव सादर केलेला होता. सदर प्रकरणाचा पाठपुरावा करुन मंजूर केले असलेबाबत मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा यांनी सभेस सांगितले. त्याचबरोबर त्यांनी संस्थान कर्मचाऱ्यांसाठी मनुष्यबळ विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविल्याबद्दल मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा यांचा मा.अध्यक्ष यांनी शॉल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१. व्यवस्थापन समितीचे दि.०५.११.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७३१.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०५.११.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरस्ती करण्यात आली.

**<u>निर्णय क्र.६८५ मध्ये शेवटचा परिच्छेद-</u>**

"यावर सविस्तर चर्चा होऊन, कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारीत, कॅनन कंपनीच्या दोन डिजीटल झेरॉक्स मशिन्स, झेरॉक्स मशिन्सच्या उत्पादक कंपन्यांकडून/अधिकृत विक्रेत्यांकडून विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १२,००,०००.०० (अक्षरी रुपये बारा लाख मात्र) चे खर्चास मान्यता देण्यात आली."

**<u>याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावा.</u>**

" यावर सविस्तर चर्चा होऊन, कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारीत, <u>कॅनन व रिक्को (पूर्वीचे गेस्टेटनर) कंपनीचे डिजीटल झेरॉक्स मशिन्स,</u> झेरॉक्स मशिन्सच्या उत्पादक कंपन्यांकडून/अधिकृत विक्रेत्यांकडून विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी

करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १२,००,०००.०० (अक्षरी रुपये बारा लाख मात्र) चे खर्चास मान्यता देण्यात आली." (कार्यवाही-खरेदी अधिकरी/प्रशासन शाखा, वशी-१२)

**निर्णय क्र.७१५ मध्ये शेवटचा परिच्छेद-**

"यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तांना या सुविधेची आवश्यकता असल्याने परवाना फी रक्कम रुपये १,५००/- आकारुन महाबळेश्वर मधोत्पादक सहकारी सोसायटी लि.,महाबळेश्वर यांना त्यांचे परवान्यात ११ महिने मुदतीची मुदतवाढ पूर्वीचेच इतर शर्ती व अटींवर देण्यात यावी, असें ठरलें."

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावा.**

"यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तांना या सुविधेची आवश्यकता असल्याने परवाना फी रक्कम रुपये १,५००/- व लाईट बील वेगळे आकारुन महाबळेश्वर मधोत्पादक सहकारी सोसायटी लि.,महाबळेश्वर यांना त्यांचे परवान्यात ११ महिने मुदतीची मुदतवाढ पूर्वीचेच इतर शर्ती व अटींवर देण्यात यावी, असें ठरलें." (कार्यवाही- विधी अधिकरी)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं.०२. दिनांक ३.१२.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.स्थानिक सदस्य सभेचे इतिवृत्ताची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.७३२.** दिनांक ३.१२.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.स्थानिक सदस्य सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन ते **परिशिष्ट "अ"** म्हणून सोबत ठेवण्यात आले होते. त्या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**अ) मौजे निमगांव-कोऱ्हाळे गट नं. ८०, ८५ मध्ये नियोजित प्रसादालय बांधकामाकरिता ठेकेदारांकडून पूर्वपात्रतेसाठी आलेल्या अर्जांबाबत.**

- उपरोक्त प्रकल्पासाठी ठेकेदारांचे पूर्वपात्रतेकरीता (Pre-qualification) दि. १२/११/२००५ रोजी The Times of India, all editions व दि. ०५/११/२००५ रोजी Indian Express, Pune edition या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार खालील बांधकाम ठेकेदारांकडून अर्ज प्राप्त झालेले आहेत.

| Sr. No | Name | Inward Number | Date | Number of envelopes |
|---|---|---|---|---|
| 01 | Sterling and Wilson Electricals pvt. Ltd., Mumbai (Associates of Shapoorji Pallonji & Co. Ltd.,) | 29305 | 19/11/2005 | 1 |
| 02 | VIJ Construction Ltd., New Delhi | 29434<br>29435 | 22/11/2005<br>22/11/2005 | open<br>open |
| 03 | Klassic Constuction Pvt.Ltd., Mumbai | 29482 | 22/11/2005 | 1 |
| 04 | Suyojit Infrastructure Ltd., Nashik | 29687 | 24/11/2005 | 2 |
| 05 | Unity Infraprojects Ltd., Mumbai | 29688 | 24/11/2005 | 1 |
| 06 | IVRCL Infrastructures & Projets Ltd., Pune. | 29689 | 24/11/2005 | 2 |
| 07 | Ramky Infrastructures Ltd., Hyderabad | 29690 | 24/11/2005 | 1 |
| 08 | Asmita Constructions Pvt. Ltd., Thane. | 29691 | 24/11/2005 | 1 |
| 09 | M/s. A.V. Pandhe, Solapur | 29692 | 24/11/2005 | 1 |
| 10 | B.G. Shirke, Pune. | 29693 | 24/11/2005 | 1 |
| 11 | B.E. Billimoria &Company Ltd., Mumbai. | 29694 | 24/11/2005 | 2 |
| 12 | National Projects Construction Corporation Limited Parli Vaijnath (Beed) | 29713<br>29986 | 24/11/2005<br>29/11/2005 | Fax<br>01 |
| 13 | Era Constructions (India) Ltd., New Delhi -14 | 29714 | 24/11/2005 | 1 |
| 14 | Golani Builders, Mumbai | 29715 | 24/11/2005 | 1 |
| 15 | Guptasons , New Delhi | 29736 | 24/11/2005 | 2 (Open) |
| 16 | JMC Projects (India) Ltd., Ahmedabad | 29815<br>29816 | 26/11/2005<br>26/11/2005 | 1<br>1 Received at Mumbai Office on 24/11/05(No.2728) |
| 17 | Shapoorji Pallanji & Co. Ltd.,Mumabi | 29817 | 26/11/2005 | 1 |
| 18 | R.L. Dalal & Co. Pvt. Ltd., Mumbai | 29935 | 28/11/2005 | 1 (open) |
| 19 | Gammon India Limted, Mumbai | 29936 | 28/11/2005 | 01 |
| 20 | M/s. Jyoti Sarup Mittal New Delhi. | 30267 | 29/11/2005 | 1 (open) |
| 21 | Wish-On Enterprises, Thane. | 30322 | 30/11/2005 | 1 |

- अ.नं. १ स्टर्लीग ॲण्ड विल्सन इलेक्ट्रीकल्स प्रा.लि., मुंबई हे फक्त विद्युतीकरण ठेकेदार असून शापूरजी पालोनजी ॲण्ड कं.लि., मुंबई यांचे असोसिएटस आहेत.
- अ.नं. १२ नॅशनल प्रोजेक्टस् कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन लि., परळी वैजनाथ (बीड) यांनी फॅक्सव्दारे अर्ज पाठविला आहे. त्यानंतर आवक नं. २९९८६ दि.२९/११/२००५ अन्वये त्यांचेकडून एक बंद पाकीट प्राप्त झालेले आहे. सदर कंपनी ही भारत सरकारचा अंगिकृत व्यवसाय आहे.
- जाहीरातीत नमूद केल्यानुसार अर्ज संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात दाखल करणे आवश्यक होते. अ.नं. १६ जे एम सी प्रोजेक्टस् (इं.)लि., अहमदाबाद यांनी अर्ज संस्थानचे मुंबई कार्यालयात सादर केला आहे. अर्जाची एक प्रत त्यांनी शिर्डी कार्यालयातही सादर केली असून ती उशिराने प्राप्त झालेली आहे.

- अ.नं. १७,१८,१९,२० व २१ मध्ये नमूद केलेले अनुक्रमे शापूरजी पालोनजी ॲण्ड कं., लि., मुंबई, आर.एल.दलाल ॲण्ड कंपनी प्रा.लि.,मुंबई, गॅमन इंडिया लि., मुंबई, मे.ज्योती सरुप मित्तल, न्यू दिल्ली, विश-ऑन एन्टरप्रायजेस, ठाणे यांचे अर्ज उशिराने प्राप्त झालेले आहेत.
- लार्सन ॲण्ड टुब्रो लि., मुंबई यांनी दि. १६/११/२००५ चे पत्राव्दारे सध्या त्यांचेकडील कामांमुळे पुर्वपात्रतेमध्ये भाग घेवू शकत नसल्याचे कळविले आहे.

वरीलपैकी पूर्वपात्रताधारक ठेकेदारांची यादी तयार करुन त्यास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता अपेक्षित आहे. त्यासाठी प्रथम सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे. शक्ती परमार ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांचेमार्फत उपरोक्त अर्जांची छाननी करुन त्यांचा अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले अर्ज आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. या अर्जांची मे. शक्ती परमार ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांचेमार्फत छाननी करुन त्यांचा अभिप्राय घेऊन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करणेत यावा, असे ठरले.(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**ब) <u>सुपर स्पेशालिटी रुग्णालयासाठी रेफ्रिजरेटर खरेदीकामी आलेल्या दरपत्रकांवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.</u>**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०९.२००५ चे सभेत निर्णय क्र.४९१ अन्वये संस्थानचे नियोजित रुग्णालयासाठी आवश्यक असणारे डबल डोअर असलेले ३०० व २०० लिटर क्षमतेचे अनुक्रमे १२ व १० नग तसेच १६५ लिटर क्षमतेचे ५ नग रेफ्रिजरेटर असे एकूण २७ नग रेफ्रिजरेटर निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,२०,०००.०० चे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार जा.नं. ११८३९ दिनांक १८.१०.२००५ अन्वये गोदरेज, अल्विन, सॅमसंग, एल.जी. केल्व्हिनेटर या कंपनीचे रेफ्रिजरेटरसाठी दरपत्रके मागविण्यात आलेली होती. आलेली दरपत्रके उघडण्यात येऊन त्याचा तुलनात्मक तक्ता आजचे सभेत सादर करण्यात आला होता. तसेच कोटेशन्ससादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी पुढीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्सधारकांचे नांव | रेफ्रिजरेटर डबल डोअर, क्षमता-३०० लिटर, गोदरेज/ अल्विन/एल.जी./ सॅमसंग/केल्व्हिनेटर कंपनी मागणी-१२ नग | | रेफ्रिजरेटर डबल डोअर, क्षमता-२०० लिटर, गोदरेज/अल्विन/एल.जी./ सॅमसंग/केल्व्हिनेटर कंपनी मागणी १० नग | | रेफ्रिजरेटर क्षमता-१६५ लिटर, गोदरेज/अल्विन/एल.जी./ सॅमसंग/केल्व्हिनेटर कंपनी मागणी ०५ नग | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोटेशनमधील दर | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर | कोटेशनमधील दर | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर | कोटेशनमधील दर | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर |
| ०१. | मे.राम एजन्सी, अहमदनगर | १५८७०.०० (२८५ लिटर वर्लपूल) | १५७००.०० (२८५ लिटर वर्लपूल) | ९९२०.०० (२२० लिटर वर्लपूल) | ९८००.०० (२२० लिटर वर्लपूल) | ७२००.०० (१७०लिटर वर्लपूल) | ६८००.०० (१७० लिटर वर्लपूल) |
| | | २०४७०.०० (३१० लिटर वर्लपूल) | १९५००.०० (३१० लिटर वर्लपूल) | ---- | ---- | ---- | ---- |
| ०२. | मे.आर.टी.कराचीवाला, श्रीरामपूर | १३२२५.०० (२६० लिटर गोदरेज ) | १३१००.०० (२६० लिटर गोदरेज ) | १०२२५.०० (२०० लिटर गोदरेज ) | १०१००.०० (२०० लिटर गोदरेज ) | ६६५०.०० (१७० लिटर गोदरेज ) | ६३५०.०० (१७० लिटर गोदरेज ) |
| ०३ | मे.राधाकृष्ण ट्रेडर्स, श्रीरामपूर | १३८५०.०० (२८० लिटर गोदरेज) | अनुपस्थित | १०४७५.०० (२०० लिटर गोदरेज) | अनुपस्थित | ६८००.०० ( १७० लिटर गोदरेज) | अनुपस्थित |
| | | १४०००.०० (२८५ लिटर केल्व्हिनेटर) | अनुपस्थित | ११२००.०० (२४५ लिटर केल्व्हिनेटर) | अनुपस्थित | ७१००.०० ( १७० लिटर केल्व्हिनेटर) | अनुपस्थित |
| ०४. | मे.पारख इलेक्ट्रॉनिक्स, नाशिक | १६४१५.०० (३२५ लिटर एलजी ) | अनुपस्थित | ९६०४.०० (२०० लिटर एलजी) | अनुपस्थित | ७३००.०० ( १८० लिटर एलजी) | अनुपस्थित |
| | | १८६९०.०० (२८० लिटर गोदरेज) | अनुपस्थित | १२५७३.०० (२०० लिटर गोदरेज) | अनुपस्थित | ७०४५.०० ( १७० लिटर गोदरेज) | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.आर.टी. कराचीवाला, श्रीरामपूर यांचे निम्नतम दर मान्य करण्यात येऊन त्यांना गोदरेज कंपनीचे रेफ्रिजरेटर पुरविणेकामी आदेश देण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-खरेदी अधिकारी)

**क) <u>गुरुपाठ अभंग सी.डी. ओंकारसाधना मार्गदर्शिका कॅसेट व श्री साईबाबा दि ग्रेट सेंट ऑफ शिर्डी सी.डी. रोम तयार करणेकामी आलेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत.</u>**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५.११.२००५ रोजीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस-वशी-प्रकाशने १३०४४/ २००५ दिनांक १२.११.२००५ अन्वये ११ सी.डी. निर्मात्यांना गुरुपाठ अभंग सी.डी.,ओंकार साधना मार्गदर्शिका कॅसेट व श्री साईबाबा दि ग्रेट सेन्ट ऑफ शिर्डी सी.डी. रोम तयार करणे कामाचे कोटेशन पत्र पाठवून ते भरून देणेकामाची अंतिम मुदत दिनांक- ३०.११.२००५ अखेर देण्यात आली होती. त्यानुसार ६ कोटेशन मुदतीत प्राप्त झाली आहेत व २ कोटेशन दि.३०.११.२००५ ऐवजी दि.०१.१२.२००५ रोजी दाखल झाली आहेत. त्यांचाही विचार होणेस

हरकत नाही अशी एकूण ८ कोटेशन्स खालील प्रमाणे प्राप्त झाली आहेत.सदरची कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात आली असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं | सी.डी.निर्मात्यांचे नांव व गांव | गुरुपाठ अभंग ऑडिओ सी.डी (२ सी.डी.चा १ संच) (अ) | ओंकार साधना मार्गदर्शिका पुस्तीकेसह कॅसेट (ब) | श्री साईबाबा दि ग्रेट संत ऑफ शिर्डी, कॉम्प्युटर सी.डी. रोम (क) | पात्र/अपात्र |
|---|---|---|---|---|---|
| | **मागणी** ⟶ | ३,००० संच (२ सीडी चा १ संच) | १,००० नग | ५,००० नग | |
| | | व्हॅट इतर सर्व करांसह प्रती संच दर रुपये पैसे | व्हॅट इतर सर्व करांसह प्रती नग रुपये पैसे | व्हॅट इतर सर्व करांसह प्रती नग रुपये पैसे | |
| 01 | A.C.M.Enterprises,Goregaon (E) Mumbai | २९ .५० | १३. ५० | २२ . ५० | अपात्र |
| 02 | San-Van Enterprises, Khar (W) Mumbai | २१ . ५३ | १६ .२२ | १२. ४३ | पात्र |
| 03 | Vandana Electronics, Mumbai | **२१ . ४२** | १६ .१२ | १२ . ३२ | पात्र |
| 04 | Mhir Agenceis (P) Ltd .Dahisar (E) Mumbai | २१ . ८४ | १६ .३८ | १२ . ५३ | पात्र |
| 05 | Sunrise IndustriesBombay | २३ . ९२ | ११ .९६ | १६ . ६४ | पात्र |
| 06 | Krunal Music Company, Mumbai | २६ . ०० | ११ .९६ | १२ .१० | पात्र |
| 07 | Audio Vision, Mumbai | २२ . ३६ | **१० .९२** | **११ .४४** | अपात्र |
| 08 | Sagarika Acoustronics Pvt.Ltd, Navi Mumbai | ३९ . ९० | २५ .६५ | १९ .८५ | अपात्र |

वरील तुलनात्मक तक्त्यातील अ.नं.०१ ते ०६ निर्मात्यांनी मुदतीत दिनांक ३०.११.२००५ रोजी कोटेशन्स दाखल केलेले आहेत. अ.नं. ०७ व ०८ यांनी दिनांक ०१.१२.२००५ रोजी उशिरा कोटेशन्स प्राप्त झाल्याने त्यांचा विचार करता येणार नाही. अ.नं. ०१ ते ०६ या निर्मात्यांपैकी खालील नमूद केलेल्या निर्मात्यांकडून निम्नतम दराने काम करुन घेण्यात यावे .

१) गुरुपाठ अभंग ऑडिओ सी.डी तयार करणेकामी अ.नं. ३ वंदना इलेक्ट्रॉनिक्स,मुंबई या निर्मात्याचे सी.डी.तयार करणे कामाचा निम्नतम दर रू.२१.४२ पैसे असा आहे.

२) ओंकार साधना मार्गदर्शिका पुस्तीकेसह कॅसेट तयार करणेकामी अ.नं.५ सनराईज,मुंबई या निर्मात्याचे कॅसेट तयार करणे कामाचा निम्नतम दर रू.११.९६ पैसे असा आहे यांनी कोटेशनमध्ये ५० टक्के रकमेची अगाऊ मागणी केलेली आहे. परंतू अगाऊ रक्कम देण्याची प्रथा नसल्याने त्यांना अगाऊ रक्कम देता येणार नाही. त्यांनी सदरचे काम नाकारल्यास व्दितीय निम्नतम दराचे निर्माते मे.कृणाल म्युझिक कंपनी, मुंबई यांचेकडून काम करुन घेण्यात यावे .

३ ) श्री साईबाबा दि ग्रेट सेन्ट ऑफ शिर्डी, कॉम्प्युटर सी.डी. रोम तयार करणेकामी अ.नं.६ कृणाल म्युझिक कंपनी, मुंबई या निर्मात्याचे सी.डी रोम तयार करणे कामाचा निम्नतम दर रू.१२.१० पैसे असा आहे.

तरी वरील "**१,२ व ३**" नुसार कोटेशन्सधारकांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**ड) दि.०६.१२.२००५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे निर्वाण दिनानिमित्त दादर येथील चैत्य भुमीत येणाऱ्या बांधवांकरिता शिधा देणेबाबत.**

श्री योगीराज खोंडे, अध्यक्ष, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दि.०१/१०/२००५ रोजीचे पत्रान्वये नागपूर येथील दीक्षा भूमीप्रमाणेच मुंबई येथे दि.०६/१२/२००५ रोजी दादर येथील चैत्यभूमीवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे निर्वाण दिनी दरवर्षाप्रमाणे राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेमार्फत नाष्टा, चहापान व भोजनाची व्यवस्था येणा-या बांधवांसाठी करणार आहोत. सदरहू स्तुत्य व सामाजिक उपक्रमास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत खालीलप्रमाणे शिधा देण्याची विनंती करीत आहोत.

| अ.नं. | तपशील | प्रमाण | अ.नं. | तपशील | प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | तांदुळ | २० क्विंटल | ०२. | आटा | १० क्विंटल |
| ०३. | तेल | १० डबे | ०४. | साखर | ०२ पोते |
| ०५. | चहा पावडर | ५० किलो | ०६. | मसाला-तिखट | १० किलो. |

उपरोक्तप्रमाणे शिधा मंजूर केल्यास शिधा घेऊन जाण्याची व्यवस्था मध्यवर्ती संघटनेमार्फत करण्यात येईल असे कळविले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थानकडे मागणी केलेला शिधा कोठे नेणार, तसेच सदरचा शिधा नेऊन कोठे शिजविणार याबाबत काहीही स्पष्ट उल्लेख नसल्याने सदर विषय अमान्य करण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- प्रशासन शाखा,वशी-०५)

**इ) संस्थानतर्फे प्राणायाम व योगसाधना शिबीर चालू करणे बाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने दिनांक २६.११.२००५ ते दिनांक ०३.१२.२००५ अखेर ८ दिवस स्वामी रामदेवजी महाराज, हरिव्दार यांचे प्राणायाम व योगसाधना शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये मोठ्या संख्येने साईभक्त,गावकरी व कर्मचारी यांनी भाग घेतला. यानंतर असे शिबीर पूढेही चालू रहावे अशी शिर्डीतील गावकरी, व संस्थान कर्मचारी यांची मागणी आहे. याकरीता मानधन तत्वावर एका योग शिक्षकाची नेमणूक करण्यात यावी. सदरचे शिबीर हे शैक्षणिक संकुलात उपलब्ध असलेल्या म्युझिक हॉलमध्ये अथवा संस्थान परिसरात उपलब्ध जागेत चालू करण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही- प्रशासन शाखा,वशी-०५)

**ई) शिरडी महोत्सव आयोजित करणे बाबत.**

सन २००४ सालात दि.२७/१२/२००४ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.४१, निर्णय क्र. १६८ अन्वये " शिर्डी महोत्सव - २००४ हा दि.२९/१२/२००४ ते दि.३१/१२/२००४ अखेर साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचा उद्देश हा चालू वर्षाचा शेवट व नवीन वर्षाची सुरुवात चांगल्यारितीने व्हावा असा आहे. मागील वर्षी सदरच्या कार्यक्रमास साधारणपणे रु. ९७,६१६/- (अक्षरी रु. सत्याण्णव हजार सहाशे सोळा मात्र) खर्च आलेला आहे. सन २००४ मध्ये सदरचा कार्यक्रम तीन दिवस साजरा करण्यात आला होता.

याहीवर्षी मागील वर्षाप्रमाणे शिर्डी महोत्सव साजरा करणेबाबत व त्या अनुषंगाने ७ मान्यवर गायकांचे व कलाकारांचे दि.२९/१२/२००५ ते दि.३१/१२/२००५ या काळात गायन व नृत्य कार्यक्रमास परवानगी मिळावी म्हणून पत्रे आलेली आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | कलाकाराचे नांव व पत्ता | तपशील | दिनांक | मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१. | सचिदानंद अप्पा, वेस्टर्न रेल्वे कॉलनी, ७७/४, माटुंगा रोड, | एक शाम साईके नाम - कार्यक्रम | ३१/१२/२००५ रात्रौ शेजारतीनंतर. | रु.१२,०००/-जाणे-येणे भाडे, रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद. |
| ०२. | श्री पारस सी जैन, शिर्डी | भजन संध्या कार्यक्रम. | ३१/१२/२००५ वेळ -७ ते ९.३० | रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद. |
| ०३. | श्री प्रमोद रंगनाथ मेढी, कलाकार पुजारी, शिर्डी | भजन संध्या कार्यक्रम. | ३१/१२/२००५ रात्रौ शेजारतीनंतर | रु.२१,०००/- मुंबई येथील वाद्यवृंद व साऊंड सिस्टिमसह, रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद. |
| ०४. | श्री कुमार आनन्द रंजन, संस्थापक, अध्यक्ष, सत् श्री साई अध्यात्मिक मॅनेजमेंट एण्ड नेचर क्योर ऑर्गनायझेशन, न्यु दिल्ली. | भजन संध्या कार्यक्रम | ३१/१२/२००५ | ३० साथीदार - निवास व भोजन व्यवस्था, रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद. |
| ०५. | ए सुरेशचंद्र, द्वारकामाई , ९७ & ९८, दंडमुडी इनक्लेव्ह, पेठ बशीराबाद, हैद्राबाद - | कु.अनिंदिता हिचा " भरत नाट्यम् नृत्याचा कार्यक्रम. | २९/१२/२००५ सायं.७.०० ते ९.०० | रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद. २५ साथीदार यांची निवासव्यवस्था पेमेंट बेसीसवर. |
| ०६. | आरती दिक्षित, व विलास आडकर, तेजस थिएटर्स, ६०, नारायण पेठ, पुणे -३० | निसर्गराजा व भक्तिधारा चा मराठी व हिंदी गीतांचा कार्यक्रम. | ३०/१२/२००५ ७.०० ते ९.३० | मानधन व येण्याचा जाण्याचा खर्च मिळून रु.३५,०००/-१८ जणांची निवास व भोजन व्यवस्था संस्थानने करावयाची आहे. लाईट व साऊंड सिस्टिम सह. |
| ०७. | चारुशीला बेलसरे, स्वरगायत्री प्रतिष्ठान, बी-९, अनुदत्त सोसायटी, पौड रस्ता, रामबाग कॉलनी, पुणे ३८, | "रंग भक्तीचे" भक्तीसंगीत कार्यक्रम | दि.३०/१२/२००५ रात्रौ १०.३० ते १२.०० पर्यंत | मानधन व जाण्या-येण्याचे भाडे मिळून रु.२०,०००/- |

उपरोक्तप्रमाणे ०७ कलाकारांनी दि.२९/१२/२००५ ते दि.३१/१२/२००५ या काळात भजन संध्या , नृत्य व गायन कार्यक्रम सादर करणेस परवानगी मागितलेली आहे. उपरोक्त कलाकारांशी फोनवरुन संपर्क साधला असता त्यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली -

अ.नं. ०१ यांनी ( रु.१२,०००/- जाणे -येणे भाडे) , रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद.व ०२ (यांचे पत्रावर मा.अध्यक्ष यांचा " श्री. वाकचौरे परवानगी द्यावी," असा शेरा आहे) यांनी संस्थानमार्फत रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद व अ.नं. ०३ यांनी रु.२१,०००/- वाद्यवृंद व साऊंड सिस्टीमसह, रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद श्री प्रमोद मेढी हे स्वतः काहीही घेणार नाहीत, अ.नं.०४ यांनीही ३० साथीदार - निवास व भोजन व्यवस्था, रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद , अ.नं. ०५ यांनी रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद. २५ साथीदार यांची निवासव्यवस्था पेमेंट बेसीसवर, अ.नं. ०६ यांनी मानधन व येण्याचा जाण्याचा खर्च मिळून रु.३५,०००/- व १८ जणांची निवास व भोजन व्यवस्था

संस्थानने करावयाची आहे. लाईट व साऊंड सिस्टीम सह व अ.नं. ०७ यांनी मानधन व जाण्या-येण्याचे भाडे मिळून रु.२०,०००/- याप्रमाणे मागणी केलेली आहे.

तीन दिवसांच्या या महोत्सवासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | तपशील | तीन दिवस खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | स्टेज, ड्रेसींग रुम व ५०० खुर्च्यांसह बैठक व्यवस्था | २०,०००.०० |
| ०२. | जाहिरात, कापडी बॅनर्स व बोर्ड | १५,०००.०० |
| ०३. | कलाकार मानधन व प्रवास खर्च (अंदाजे तीन दिवसाकरीता कलाकार ) | १,५०,०००.०० |
| ०४. | कलाकार निवास व्यवस्था | ४५,०००.०० |
| ०५. | व्हि.डी.ओ.शुटींग व फोटोग्राफी | २०,०००.०० |
| ०६. | इतर किरकोळ खर्च | २०,०००.०० |
| | **एकूण खर्च** | **२,७०,०००.००** |

सदरचा कार्यक्रम श्री पुण्यतिथी उत्सव २००५ चा कलाकार कार्यक्रम ज्याठिकाणी झाला त्याठिकाणी केल्यास उत्तम प्रतिसाद मिळेल. तसेच सदरचे कार्यक्रम रात्रौ ४.३० पर्यंतच ठेवावे असे नम्र मत आहे. मागील वर्षाप्रमाणे याहीवर्षी तीन दिवस कार्यक्रम ठेवावा . वेळ सायं. ७.०० ते ९.३० पर्यंत एक कार्यक्रम व रात्रौ शेजारतीनंतर ४.३० पर्यंत दुसरा कार्यक्रम ठेवावा याबाबत योग्य तो निर्णय होणे आवश्यक आहे. तीन दिवसाच्या या महोत्सवासाठी साधारणपणे अंदाजीत रु.२,७०,०००/- (अक्षरी रु. दोन लाख सत्तर हजार मात्र) खर्च येण्याची शक्यता असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथे दिनांक २९ ते ३१ डिसेंबर,२००५ या कालावधीत साई महोत्सव आयोजित करणेत यावा. यासाठी नामांकित कलाकारांना आमंत्रित करुन त्यांचे मानधन निश्चित करण्यात यावे. याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- प्रशासन शाखा,वशी-०५)

**विषय नं.०३. व्यवस्थापन समितीचे दि.१८.०९.२००५ व दि.०२.१०.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांवर करण्यात आलेली कार्यवाही.**

**निर्णय क्र. ७३३.** व्यवस्थापन समितीचे दि.१८.०९.२००५ व दि.०२.१०.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०४. नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता ऑक्टोबर , २००५**

**(ब) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) माहे ऑक्टोबर , २००५ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(ड) माहे ऑक्टोबर,२००५ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**(इ) माहे ऑक्टोबर, २००५ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/- चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.७३४. (A).** माहे ऑक्टोबर, २००५ मधील जमा-खर्चाचे तक्ते, माहे २४ ऑक्टोबर, २००५ अखेरीस गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, माहे ऑक्टोबर,२००५ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेली देणगी, माहे ऑक्टोबर,२००५ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंचा अहवाल, माहे ऑक्टोबर,२००५ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाचे तक्ते ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात आली.

**०२. माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २००५ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबत.**

**निर्णय क्र. ७३४. (B).** माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २००५ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबतचा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०३ रुग्णालयातील रुग्णांना माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २००५ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ७३४. (C).** माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर,२००५ मध्ये रुग्णालयातील गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०४ माहे ऑक्टोबर, २००५ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ७३४. (D).** माहे ऑक्टोबर, २००५ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या कर्मचाऱ्यांच्या /कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०५ बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ७३४. (E).** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०६ पाणी तपासणी अहवाल**

**निर्णय क्र. ७३४. (F).** माहे नोव्हेंबर, २००५ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे. एनव्हायरो लॅब, नाशिक व आरोग्यप्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०५. गुंतवणूकीबाबत.**

**निर्णय क्र. ७३५.** माहे डिसेंबर,२००५ मध्ये मुदत पूर्ण होणाऱ्या व इतर उपलब्ध गुंतवणूकपात्र रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | बँकेचे नाव | दिनांक | मुदतअंती उपलब्ध रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | किसान विकासपत्र श्रीरामपूर | ६.१२.२००५ | ८,००,००,०००/- |
| ०२ | माहे डिसेंबर,२००५ अखेर दैनंदिन खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम | | ३,००,००,०००/- |
| | | एकूण- | ११,००,००,०००/- |

उपरोक्त उपलब्ध होणारी रक्कम व आय.सी.आय.सी.आय.बँक,नाशिक यांचेकडून मुदतठेवीत मार्च,२००५ व जुलै,२००५ मध्ये ठेवलेली एकूण रक्कम रुपये २.२५ कोटी पर्यंतची रककम मुदतपूर्ती होण्याआधीच काढून तसेच माहे डिसेंबर,२००५ मधील दक्षिणा पेटीमधून मिळणारी एकूण रक्कम अशी सर्व रक्कम गुंतविणेसाठी मा.अध्यक्ष यांनी स्थानिक / परिसरातील राष्ट्रीयीकृत बँकेचे प्रतिनिधी यांचेशी चर्चा करुन निर्णय घ्यावा असें ठरलें. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०६. ए.डी.सी.सी. व आय. सी. आय. सी.आय. बँकांची बचत खाती बंद करणेबाबत.**

**निर्णय क्र.७३६.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) चे दैनंदिन आर्थिक व्यवहार करणेकामी कामकाजाचे सोईचे दृष्टीने विविध बँकांमध्ये वेळोवळी बचत खाती उघडण्यात आलेली आहेत. या बँकामधील बचत खात्यामार्फत आवश्यकतेप्रमाणे दैनंदिन आर्थिक व्यवहार केले जातात.

दिनांक १८ सप्टेंबर,२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये, ज्या बचत खात्यातून आर्थिक व्यवहार होत नाहीत किंवा त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे अशा एकूण ९ बँकांकडील बचतखाते बंद करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यावर निर्णय क्रमांक ४८० नुसार अनावश्यक असलेली ०९ पैकी ७ बचत खाती बंद करुन तेथील शिल्लक रकमा संस्थानच्या इतर बचत खात्यांमध्ये वर्ग करण्यास मान्यता मिळालेली होती. बँक खाती बंद करावयाच्या बँकांपैकी सिंडीकेट बँक ही राष्ट्रीयीकृत बँक आहे व संस्थानच्या दक्षिणापेटयांच्या चाव्यांचा एक संच त्यांचेकडे आहे. त्यामुळे सिंडीकेट बँक, शिर्डी व अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शिर्डी, या दोन बँकांची नांवे वगळण्यात यावीत असे ठरविण्यात आले होते.

मा.व्य.समितीचे वरील निर्णय क्रमांक ४८० नुसार ७ बचत खाती बंद करणेबाबत बँकांना पत्राव्दारे कळविण्यात आलेले आहे. तथापि; महाराष्ट्र शासन क्रमांक :-सासवि २००५/४०६/(६३) का.सोळा , विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचे दि.१४ नोव्हेंबर,२००५ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम २००४ मधील कलम २० (३) नुसार संस्थानच्या विश्वस्त व्यवस्थेचा मालकीचा निधी, पैसा व इतर मौल्यवान वस्तू केवळ राष्ट्रीयीकृत बँकेत किंवा बँकांमध्ये ठेव म्हणून ठेवण्यात यावा असे निर्देश दिलेले आहेत.

संस्थानचे सध्या राष्ट्रीयीकृत बँका व्यतिरिक्त आयसीआयसीआय बँक, नासिक व अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शिर्डी यांचेकडे बचत खाते आहेत. सदरच्या बँका या राष्ट्रीयीकृत नसल्याने उपरोक्त नमूद पत्रानुसार सदरची खाती बंद करणे गरजेचे आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे आयसीआयसीआय बँक, नासिक व अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शिर्डी यांचेकडील बचतखाती बंद करणेस व तेथील शिल्लक रक्कम संस्थानच्या इतर बचत खात्यात वर्ग करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०७. राष्ट्रीयीकृत बँका वगळता इतर गुंतवणूक रक्कम मुदतपूर्ती होईपर्यंत ठेवणेकामी शासनाची मंजूरी घेणेबाबत.**

**निर्णय क्र.७३७.** संस्थानला चेक/डिमांड ड्राफ्ट, मनिऑर्डर्स, रोख स्वरुपात व दक्षिणा पेटीव्दारे साई भक्तांकडून मोठया प्रमाणावर देणगी मिळत असते. या देणगी रकमेतून संस्थानचा दैनंदिन होणारा खर्च व इतर विकास कामे भागवून शिल्लक राहणारी रक्कम मा.व्यवस्थापन समितीचे मंजुरीन्वये विविध बँकेत मुदतठेवीच्या स्वरुपात गुंतविली जाते. अशाप्रकारे आज अखेर एकूण रक्कम रु. २२९ कोटींची गुंतवणूक विविध बँका, बॉण्डस्, किसान विकास पत्र इत्यादी मध्ये करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्रातील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २० (३) मध्ये गुंतवणूकी बाबत पुढीलप्रमाणे तरतूद आहे. (३) विश्वस्तव्यवस्था निधीच्या मालकीचा सर्व पैसा व इतर मौल्यवान वस्तू केवळ राष्ट्रीयीकृत बँकेत किंवा बँकांमध्ये ठेव म्हणून ठेवण्यात येतील किंवा जमा करण्यात येतील किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम,१९५० च्या कलम २ च्या खंड (१२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सार्वजनिक रोख्यांमध्ये गुंतवण्यात येतील. तसेच विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील सासवि २००५/४०६/(६३) का.सोळा , विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचे दि.१४ नोव्हेंबर,२००५ रोजीचे संदर्भित पत्रात पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत. "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम २००४ मधील कलम २०(३) नुसार संस्थानच्या विश्वस्तव्यवस्थेचा मालकीचा निधी, पैसा व इतर मौल्यवान वस्तू केवळ राष्ट्रीयीकृत बँकेत किंवा बँकांमध्ये ठेव म्हणून ठेवण्यात यावा किंवा जमा करण्यात यावा."

उपरोक्त मुदत ठेवीतील एकूण रक्कम रु.२२९ कोटींपैकी रक्कम रु.९,०३,२३,१०८/- ची गुंतवणूक ही राष्ट्रीयीकृत बँके व्यतिरीक्त इतर कमर्शियल, सहकारी बँकेत व वित्तीय संस्थेत करण्यात आलेली आहे. या गुंतवणूकीचे तपशीलवार विवरण सोबत जोडण्यात आलेले आहे. या मुदतठेवींच्या रकमा वरील नमूद तरतुदीस अधिन राहून संस्थानने मुदत पुर्ण होण्या आगोदरच काढून घेतल्या तर संस्थानला व्याजाचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान सोसावे लागेल. सदरचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी या ठेवी आहे त्याच बँकांकडे त्यांची मुदत पूर्ण होई पर्यंत ठेवण्यात याव्यात असे वाटते. मुदतपूर्तीनंतर मिळणारी रक्कम त्याच बँकांकडे पुनर्गुंतवणूक न करता राष्ट्रीयीकृत बँकेकडे गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे. सदरच्या ठेवी आहे त्याच बँकांकडे मुदत संपेपर्यंत ठेवणेसाठी शासनाची मान्यता घेणेसाठी तसा प्रस्ताव शासनाकडे दाखल करावा लागेल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सोबतच्या तक्त्यातील अ.नं.२ ते ८ मध्ये नमूद केलेल्या तक्त्यांतील गुंतवणूकीची मूदतपूर्ती दिनांक १७ ऑक्टोबर २००६ अखेर संपत आहे. सदरचा कालावधी हा फक्त १० महिन्यांचाच आहे, त्यामुळे या गुंतवणूका मुदतपूर्तीपुर्वीच काढून घेतल्यास संस्थानला व्याजाचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान सोसावे लागेल. सदरचे नुकसान टाळण्यासाठी या गुंतवणूका त्यांच्या मुदतपूर्तीपूर्वीच न काढता माहे डिसेंबर,२००६ अखेर मुदतपूर्ती होणाऱ्या बँकेतील रकमा वगळता उर्वरित सर्व बँकांतील रकमा त्वरीत मुदतपूर्ती पूर्वीच काढून घेण्यात याव्यात, असे ठरले.

त्यानुसार आयसीआयसीआय बँक,नाशिक येथील डिसेंबर २००६ नंतर मुदतपूर्ती होणारी गुंतवणूकीची रक्कम रुपये २.२७ कोटी काढून घेण्यात यावी, असे ठरले. सदरची मिळणारी रक्कम रुपये ११ कोटी गुंतविण्याबाबत या सभेत जो निर्णय झालेला आहे त्यानुसार राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतविण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०८. मौजे निमगांव-कोऱ्हाळे गट नं.८०,८५ मध्ये नियोजित प्रसादालय बांधकामाकरिता ठेकेदारांकडून आलेल्या पूर्व पात्रता अर्जांबाबत.**

**निर्णय क्र.७३८.** उपरोक्त विषयांकीत प्रकल्पासाठी ठेकेदारांचे पूर्वपात्रतेकरीता (Pre-qualification) दि. १२/११/२००५ रोजी The Times of India, (all edition) व दि. ०५/११/२००५ रोजी Indian Express, (Pune edition) या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार खालील बांधकाम ठेकेदारांकडून अर्ज प्राप्त झालेले आहेत.

| Sr.No | Name | Inward Number | Date | Number of envelopes |
|---|---|---|---|---|
| 01 | Sterling and Wilson Electricals pvt. Ltd., Mumbai (Associates of Shapoorji Pallonji & Co. Ltd.,) | 29305 | 19/11/2005 | 1 |
| 02 | VIJ Construction Ltd., New Delhi | 29434<br>29435 | 22/11/2005<br>22/11/2005 | open<br>open |
| 03 | Klassic Constuction Pvt.Ltd., Mumbai | 29482 | 22/11/2005 | 1 |
| 04 | Suyojit Infrastructure Ltd., Nashik | 29687 | 24/11/2005 | 2 |
| 05 | Unity Infraprojects Ltd., Mumbai | 29688 | 24/11/2005 | 1 |
| 06 | IVRCL Infrastructures & Projets Ltd., Pune. | 29689 | 24/11/2005 | 2 |
| 07 | Ramky Infrastructures Ltd., Hyderabad | 29690 | 24/11/2005 | 1 |
| 08 | Asmita Constructions Pvt. Ltd., Thane. | 29691 | 24/11/2005 | 1 |
| 09 | A.V. Pandhe, Solapur | 29692 | 24/11/2005 | 1 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10 | B.G. Shirke, Pune. | 29693 | 24/11/2005 | 1 |
| 11 | B.E. Billimoria & Company Ltd.,Mumbai. | 29694 | 24/11/2005 | 2 |
| 12 | National Projects Construction Corporation Limited Parli Vaijnath (Beed) | 29713<br>29986 | 24/11/2005<br>29/11/2005 | Fax<br>01 |
| 13 | Era Constructions (India) Ltd., New Delhi –14 | 29714 | 24/11/2005 | 1 |
| 14 | Golani Builders, Mumbai | 29715 | 24/11/2005 | 1 |
| 15 | Guptasons , New Delhi | 29736 | 24/11/2005 | 2 (Open) |
| 16 | JMC Projects (India) Ltd., Ahmedabad | 29815<br>29816 | 26/11/2005<br>26/11/2005 | 1<br>1Received at Mumbai Office on 24/11/05(No. 2728) |
| 17 | Shapoorji Pallanji & Co. Ltd., Mumabi | 29817 | 26/11/2005 | 1 |
| 18 | R.L. Dalal & Co. Pvt. Ltd., Mumbai | 29935 | 28/11/2005 | 1 (open) |
| 19 | Gammon India Limted,Mumbai | 29936 | 28/11/2005 | 1 |
| 20 | Jyoti Sarup Mittal New Delhi. | 30267 | 29/11/2005 | 1 (open) |
| 21 | Wish-On Enterprises, Thane. | 30322 | 30/11/2005 | 1 |

- अ.नं. १ स्टर्लींग ॲण्ड विल्सन इलेक्ट्रीकल्स प्रा.लि., मुंबई हे फक्त विद्युतीकरण ठेकेदार असून शापूरजी पालोनजी ॲण्ड कं.लि., मुंबई यांचे असोसिएटस आहेत.
- अ.नं. १२ नॅशनल प्रोजेक्टस् कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन लि., परळी वैजनाथ (बीड) यांनी फॅक्सव्दारे अर्ज पाठविला आहे. त्यानंतर आवक नं. २९९८६ दि.२९/११/२००५ अन्वये त्यांचेकडून एक बंद पाकिट प्राप्त झालेले आहे. सदर कंपनी ही भारत सरकारचा अंगिकृत व्यवसाय आहे.
- जाहीरातीत नमूद केल्यानुसार अर्ज संस्थानचे शिर्डी कार्यालयात दाखल करणे आवश्यक होते. अ.नं. १६ जे एम सी प्रोजेक्टस् (इं.)लि., अहमदाबाद यांनी अर्ज संस्थानचे मुंबई कार्यालयात सादर केला आहे. अर्जाची एक प्रत त्यांनी शिर्डी येथील कार्यालयात सादर केली असून ती उशिराने प्राप्त झालेली आहे.
- अ.नं. १७,१८,१९,२० व २१ मध्ये नमुद केलेले अनुक्रमे शापूरजी पालोनजी ॲण्ड कं., लि., मुंबई, आर.एल.दलाल ॲण्ड कंपनी प्रा.लि.,मुंबई, गॅमन इंडीया लि., मुंबई, मे.ज्योती सरुप मित्तल, न्यू दिल्ली व विश-ऑन एन्टरप्रायजेस, ठाणे यांचे अर्ज उशिराने प्राप्त झालेले आहेत.
- लार्सन ॲण्ड टुब्रो लि., मुंबई यांनी दि. १६/११/२००५ चे पत्राव्दारे सध्या त्यांचेकडील कामांमुळे पुर्वपात्रतेमध्ये भाग घेवू शकत नसल्याचे कळविले आहे.

दि. ०३/१२/२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक विश्वस्त सभेत वरीलप्रमाणे प्राप्त झालेले पूर्वपात्रता अर्जांचे सर्व लिफाफे उघडण्यात आले.

आर्किटेक्ट शक्ती परमार, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री. योगेश चव्हाण,यांनी दि. ०६/१२/२००५ रोजी शिर्डी येथे उपरोक्त २१ ठेकेदारांचे अर्जांची छाननी केली असता जाहीरातीत नमूद करण्यात आलेल्या किमान पात्रतेनुसार खालील पूर्वपात्रता धारक १६ ठेकेदार आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव |
|---|---|
| ०१ | व्हि आय जे कन्स्ट्रक्शन,लि., नवी दिल्ली |
| ०२. | सुयोजीत इन्फ्रास्ट्रक्चर लि., नाशिक |
| ०३. | युनीटी इन्फ्रास्ट्रक्चर्स लि.,मुंबई |
| ०४. | आय व्ही आर सी एल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस लि., पुणे |
| ०५. | रामकी इन्फ्रास्ट्रक्चर्स लि., हैद्राबाद |
| ०६. | ए.व्ही पंधे, सोलापूर |
| ०७. | बी.जे. शिर्के, पुणे |
| ०८. | बी.ई. बिलीमोरीया ॲण्ड कंपनी लि., मुंबई |
| ०९. | नॅशनल प्रोजेक्टस कन्स्ट्रक्शन कार्पोरेशन लि., परळी वैजनाथ (बीड) |
| १०. | एरा कन्स्ट्रक्शन्स (इंडिया)लि., नवी दिल्ली |
| ११. | गोलानी बिल्डर्स , मुंबई |
| १२. | जे एम सी प्रोजेक्टस (इंडिया) लि., अहमदाबाद |
| १३. | शापूरजी पालोनजी ॲण्ड कं.लि. मुंबई |
| १४. | आर एल दलाल ॲण्ड कं. प्रा.लि., मुंबई |

| | |
|---|---|
| १५. | गॅमन इंडिया लि., मुंबई |
| १६. | मे. ज्योती सरुप मित्तल, नवी दिल्ली |

आर्किटेक्ट शक्ती परमार यांनी दि. ०९/१२/२००५ रोजीचे पत्राव्दारे खालील ०९ ठेकेदार सदर प्रकल्पाचे बांधकामासाठी पात्र आहेत. कामाचे स्वरुप,विहीत मूदतीत काम पूर्ण करण्याची मर्यादा या सर्व बाबींचा विचार करता इतर उर्वरीत ठेकेदारांची क्षमता तसेच त्यांच्या बाबत मार्केट मधील माहिती नसल्यामुळे त्यांना अपात्र ठरविण्यात यावे. फक्त खालील ठेकेदारांनाच कोरे निविदा फॉर्म देण्यात यावेत असे कळविले आहे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव |
|---|---|
| ०१ | युनिटी इन्फ्रास्ट्रक्चर्स लि, मुंबई |
| ०२. | आय व्ही आर सी एल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,पुणे |
| ०३. | बी.जी. शिर्के, पुणे |
| ०४. | बी.ई. बिलोमोरीया ॲण्ड कं. लि., पुणे |
| ०५. | नॅशनल प्रोजेक्टस् कन्स्ट्रक्शन्स कार्पोरेशन लि., परळी वैजनाथ (बीड) |
| ०६. | जेएमसी प्रोजेक्टस् (इंडिया ) लि., अहमदाबाद |
| ०७. | शापूरजी पालोनजी ॲण्ड कं.प्रा.लि., मुंबई |
| ०८. | आर.एल. दलाल ॲण्ड कं. प्रा.लि. मुंबई |
| ०९. | गॅमन इंडिया लि., मुंबई |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उत्तम दर्जाचे कामासाठी ठेकेदारांची पूर्वपात्रता यादी तयार करण्यात यावी. याकामी ठेकेदारांकडून अर्ज मागविण्यात यावीत असे चर्चेत ठरले होते. पूर्वपात्रतेसाठी ठरविण्यात आलेल्या निकषानुसार पात्र असलेल्या १६ ठेकेदारांपैकी आर्किटेक्ट शक्ती परमार, मुंबई यांनी शिफारस केल्याप्रमाणे वरील ९ ठेकेदारांना कोऱ्या निविदा घेणेकामी निविदा सुचनांचे (Notice inviting Tender) पत्र पाठविण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.०९. स.नं.१४८/२मधील जमिनीवर साईभक्तांसाठी निवासी खोल्या बांधणेकरिता प्राप्त झालेल्या निविदाबाबत.**

**निर्णय क्र.७३९.** संस्थानचे स.नं.१४८/२ जमिनीवर साईभक्तांसाठी निवासी खोल्या बांधणेकामी आर्किटेक्ट यांनी तयार केलेल्या रु. ९,७९,०८,९००/- मात्र अपेक्षित खर्चाचे सुधारीत एस्टीमेटनुसार वर्तमानपत्रात निविदा सूचना देउन निविदा मागविण्यात आल्या आहेत. कोरी निविदा विक्री दि.२२/०८/२००५ ते ०६/०९/२००५ अखेर होती. सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि.१३/१०/२००५ अखेर ठेवण्यात आलेली होती.

खालील ठेकेदारांनी मुदतीत कोरे निविदा फॉर्म विकत घेतलेले आहे.

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** |
|---|---|
| ०१. | मे.आर.एल.दलाल ॲण्ड कंपनी प्रा.लि.,मुंबई |
| ०२ | मे.रामकी इन्फ्रास्ट्रक्चर लि., हैद्राबाद. |
| ०३ | मे.पवार पाटकर कन्स्ट्रक्शन, नाशिक |
| ०४ | मे.सुयोजित इन्फ्रास्ट्रक्चर लि., नाशिक |
| ०५ | मे.अशोका बिल्डकॉन लि., नाशिक |
| ०६ | मे.अे.व्ही.पंधे, सोलापूर |
| ०७ | मे.पाटील कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद |
| ०८ | मे.गोलानी बिल्डर्स, मुंबई |
| ०९ | मे.प्रकाश कन्स्ट्रूवेल प्रा.लि.नाशिक |
| १० | मे.विशाल इन्फ्रास्ट्रक्चर लि., मुंबई |
| ११ | मे.अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि.मुंबई |

वरील ११ ठेकेदारांपैकी खालील ०६ ठेकेदारांनी विहीत मूदतीत सिलबंद निविदा सादर केल्या होत्या.

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** |
|---|---|
| ०१. | मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई |
| ०२ | मे. आर.एल. दलाल ॲण्ड कंपनी, मुंबई |
| ०३ | मे. पाटील कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद |
| ०४ | मे. पवार पाटकर, नाशिक |
| ०५ | मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई |
| ०६ | मे. ए.व्ही. पंधे, सोलापूर |

उपरोक्त ठेकेदारांचे तांत्रिक माहिती असलेला लिफाफा क्र. १ दि. २८/१०/२००५ रोजी मा. स्थानिक व्यवस्थापन समितीपुढे उघडण्यात आलेला आहे. दि. ०४/११/२००५ च्या पत्रान्वये आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक यांनी निविदांमध्ये सोलर सिस्टीम , लिफ्ट इत्यादी बाबींचा समावेश न करता निविदा मागविण्यात आल्या आहेत. या ॲटमचे काम नंतर केल्यास त्यासाठी जादा कालावधी लागेल.

इमारत बांधकामा बरोबरच या ॲटमचेही काम करुन घेतल्यास उत्पादकाच्या (Manufactures) सूचना विचारात घेता येतील. करीता या सर्व बाबींचा समावेश करुन वरील निविदा सादर केलेल्या ठेकेदारांकडून सुधारीत देकार मागविता येतील. असे कळविले होते. याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५/११/२००५ चे सभेत प्रस्ताव ठेवण्यात आला होता. त्यात नि.क्र. ६५५ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार जा.नं. एस.एस.एस.टी./वशी-बांध/१३६६१/ दि. २४/११/२००५ अन्वये उपरोक्त सिलबंद निविदा सादर केलेल्या सहा ठेकेदारांना त्यांनी यापुर्वी सादर केलेल्या सिलबंद निविदांचे लिफाफा क्र. २ व सुधारीत कोरी निविदा फॉर्म घेऊन जावे व सुधारीत सिलबंद निविदा दि. ०२/१२/२००५ अखेर जमा कराव्यात असे कळविणेत आले होते. त्यानुसार उपरोक्त सहाही ठेकेदारांनी त्यांचे यापुर्वीचे लिफाफा क्र. २ व सुधारीत कोरी निविदा घेतली होती. त्यापैकी मे.ए.व्ही. पंधे, सोलापूर यांनी सुधारित निविदा सादर केलेली नाही. खालील ठेकेदारांनी सुधारीत सिलबंद निविदा लिफाफा क्र.२ विहित मूदतीत सादर केलेले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१. | मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई |
| ०२ | मे. आर.एल. दलाल ॲण्ड कंपनी, मुंबई |
| ०३ | मे. पाटील कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद |
| ०४ | मे. पवार पाटकर, नाशिक |
| ०५ | मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत ठेकेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | देऊ केलेले दर |
|---|---|---|
| ०१. | मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई | २३.४ % अधिक |
| ०२ | मे. आर.एल. दलाल ॲण्ड कंपनी, मुंबई | ३६ % अधिक |
| ०३ | मे. पाटील कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | १४.९५ % अधिक |
| ०४ | मे. पवार पाटकर, नाशिक | २३.९९ % अधिक |
| ०५ | मे. गोलानी बिल्डर्स, मुंबई | ७.७७ % अधिक |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निम्नतम तीन अ. नं. ५, ३ व १ या ठेकेदारांनी केलेल्या कामाची पहाणी आर्किटेक्ट यांनी स्वतः करावी. तथापि निम्नतम दराचे ठेकेदर मे.गोलानी बिल्डर्स, मुंबई यांचे कामाचा दर्जा योग्य असल्यास त्यांची निम्नतम दराचीच निविदा स्वीकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१०. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांचे डांबरीकरण करणेकामी आलेल्या निविदांबाबत.**

**निर्णय क्र.७४०.** दिनांक ११/०७/२००५ रोजीचे पत्रान्वये मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नऊ रस्त्यांची कामे शिरडी शहराच्या तसेच साईभक्तांचे सोयी-सुविधांच्या दृष्टीने विकसीत करणेकामी अंदाजीत किंमत रु. ४२२.३६ लक्ष इतका निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचेतर्फे उपलब्ध करुन कामे करुन द्यावीत अशी विनंती केली होती.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०७/२००५ रोजीचे सभेत निर्णय क्र.३४२ अन्वये सदर विकास कामे करणेस व खर्चास तत्वतः मान्यता दिली आहे.

शिर्डी नगरपंचायतीने डांबरीकरण करुन मागितलेल्या रस्त्यांची रुंदी प्रत्यक्षात उपलब्ध नसल्यामुळे सदर रस्त्यांचे डांबरीकरणाचे कामाबाबत दि. ०१/०९/२००५ रोजी मा. अध्यक्ष महोदय, यांचे समवेत चर्चा झाली. सदर बैठकीस मा.कार्यकारी अधिकारी, व नगर पंचायतीचे अध्यक्ष मा.श्री. कैलास (बापू ) कोते तसेच श्री गोसावी, मुख्याधिकारी हेही उपस्थित होते. त्यावेळेस रस्ते रुंदीकरणाकरीता ब-याचशा अडीअडचणी असल्यामुळे जास्तीत जास्त उपलब्ध रुंदीप्रमाणे रस्त्यांचे डांबरीकरण करुन घेण्यात यावे असे ठरले. त्यानुसार मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी खालीलप्रमाणे सुधारीत डांबरीकरणाचे एस्टीमेट सादर केले आहे

| अ.नं. | रस्त्याचे नाव व तपशील | रुंदी मिटरमध्ये | अंदाजीत खर्च रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | शिर्डी - निमगांव - शीव रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे (न.म.रोड ते पुर्वेस ०.८ कि.मी.) | ५.५० | १४,१३,९३९.०० |
| ०२ | नांदुर्खी रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे (२०० रुम ते नांदुर्खी शीव रस्ता) लांबी १.७ कि.मी. | १२.०० | ८९,९३,६३३.०० |
| ०३ | कनकुरी रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे. (न.म.रस्ता ते नाला रस्ता पर्यंत)लांबी १.०० कि.मी. | १०.५० | २६,७३,७३७.०० |
| ०४ | नाला रस्ता डांबरीकरण करणे (लुटे वस्ती ते साईबंधारा पर्यंत) | ६.०० | ३१,६५,३८२.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | लांबी २ कि.मी. | | |
| ०५ | बिरेगांव रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. (शिर्डी ते चौफुली ते बिरोबा मंदीर) लाबी ३.३० कि.मी. | ६.०० | ७१,७०,६६३.०० |
| ०६ | १२ क्रमांक चारी पुढील रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे लांबी ०.९० कि.मी. | ५.०० | १७,१९,१४४.०० |
| | | एकूण :- | २,५१,३६,४९८.०० |

आर्किटेक्ट मे. निकम पा. असो., श्रीरामपूर यांनी प्रस्तावीत रस्त्यांचे सविस्तर एस्टीमेट तयार करुन तपासणी केली आहे. डांबरीकरण कामाची एकुण अंदाजित रक्कम रु. २,५१,३६,४९८.०० इतकी आहे. त्यानुसार याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या होत्या. को-या निविदा फॉर्म विक्रीची मुदत दि.०६/१०/२००५ ते २०/१०/२००५ अखेर व सिलबंद निविदा सादर करण्याची मुदत दि.२२/११/२००५ अखेर ठेवण्यात आली होती.

विहीत मुदतीत खालील ११ ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** |
|---|---|
| ०१. | मे.पॅसो इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर, कोपरगांव |
| ०२ | मे.एम.एस.पंजाबी, पुणे |
| ०३ | मे.एस.एस.कन्स्ट्रक्शन, अ.नगर |
| ०४ | मे.एन.के.गाडे, संगमनेर |
| ०५ | मे.अे.जी.वाबळे, अ.नगर |
| ०६ | मे.एस.एम.औताडे, मंगळवेढा, सोलापूर |
| ०७ | मे.बी.डी.शिंदे ॲण्ड कं., राहाता |
| ०८ | मे.ओंकार कन्स्ट्रक्शन, नांदेड |
| ०९ | मे.बनकर पाटील ॲण्ड इंजि.,अंगणगांव, येवला. |
| १० | मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन कंपनी., अ.नगर |
| ११ | मे.जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड इंजिनियरींग कं.,कोल्हार (खु) |

उपरोक्त ११ ठेकेदारांपैकी खालील ०७ ठेकेदारांनी विहीत मुदतीत सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** |
|---|---|
| ०१. | मे.पॅसो इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर, कोपरगांव |
| ०२ | मे.एम.एस.पंजाबी, पुणे |
| ०३ | मे.एस.एम.औताडे, मंगळवेढा, सोलापूर |
| ०४ | मे.बी.डी.शिंदे ॲण्ड कं., राहाता |
| ०५ | मे.बनकर पाटील ॲण्ड इंजि.,अंगणगांव, येवला. |
| ०६ | मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन कंपनी., अ.नगर |
| ०७ | मे.जगताप कन्स्ट्र. ॲण्ड इंजि. कं.,कोल्हार (खु) |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील कलम २१ (२) अन्वये उपरोक्त रस्त्यांची कामे संस्थानचे निधीतून हाती घेणेसाठी मान्यता मिळणेकामी जा.नं. एसएसएसटी/ वशी-बांधकाम/१०५४६/ दि.२२/०९/२००५ चे पत्राव्दारे मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत ठेकेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** | **देऊ केलेले दर** | **चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर** |
|---|---|---|---|
| ०१. | मे.पॅसो इंजिनियर्स ॲण्ड कॉन्ट्रक्टर, कोपरगांव | ७.७७ % अधिक | .०७ % कमी |
| ०२ | मे.एम.एस.पंजाबी, पुणे | २८.४० % अधिक | अनुपस्थित |
| ०३ | मे.एस.एम.औताडे, मंगळवेढा, सोलापूर | ४.२० % कमी | अनुपस्थित |
| ०४ | मे.बी.डी.शिंदे ॲण्ड कं., राहाता | १८ % अधिक | १७ % अधिक |
| ०५ | मे.बनकर पाटील ॲण्ड इंजि.,अंगणगांव, येवला. | २७ % अधिक | अनुपस्थित |
| ०६ | मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन कंपनी., अ.नगर | ७.९९ % अधिक | ७.०९ % अधिक |
| ०७ | मे.जगताप कन्स्ट्र. ॲण्ड इंजि. कं.,कोल्हार (खु) | ११.७९ % अधिक | ११.५० % अधिक |

निम्नतम दराचे ठेकेदार मे.एस.एस.औताडे, आजचे सभेपुढे चर्चेसाठी अनुपस्थित असल्याने तसेच त्यांचा डांबरीकरणाचा प्लँट शिर्डी परिसरात नाही त्यामुळे मंगळवेढा येथील सदर ठेकेदार शिर्डी परिसरात काम करण्यास सक्षम नाहीत. याबाबत सभेत सविस्तर चर्चा होऊन द्वितीय निम्नतम दर असलेले ठेकेदार पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड काँट्रॅक्टर्स, कोपरगाव यांनी वाटाघाटीत देऊ केलेले निविदा रकमेच्या ०.०७ % दराची निविदा स्वीकारण्यात यावी, असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.११.** **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रुई रस्ता (जुना पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिवापर्यन्त) काँक्रीटीकरण करणे कामासाठी आलेल्या निविदांबाबत.**

**निर्णय क्र.७४१.** शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नऊ रस्त्यांची कामे शिर्डी शहराच्या विकासाच्या दृष्टीने संस्थान मार्फत हाती घेणेबाबत शिर्डी नगरपंचायत यांनी विनंती केली होती. सदरच्या प्रस्तावास व याकामी रु. ४.२२ कोटी मात्र इतक्या अपेक्षित खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि. १३/०३/२००५ चे सभेत नि.क्र. १०८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

मा. मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी सदर नऊ रस्त्यापैकी ७०० मी. लांबीचा व ६.०० मी. रुंदीचा रुई रस्ता (जुना पिंपळवाडी रस्ता ते निमगांव शिव रस्ता) कॉक्रीटीकरण करुन मिळणेबाबत रु. ४६,१३,५४०.०० खर्चाचा सुधारीत प्रस्ताव सादर केला होता त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/०९/२००५ रोजीचे सभेत निर्णय क्र. ५७२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

याकामी निविदा मागविणेबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देउन को-या निविदा फॉर्मची विक्री दि. ०६/१०/२००५ ते दि.२०/१०/२००५ अखेर होती. सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि. २२/११/२००५ अखेर ठेवण्यात आलेली होती.

खालील ठेकेदारांनी विहित मुदतीत कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१. | पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव |
| ०२ | एस.आर. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर |
| ०३ | एस.एस. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर |
| ०४ | ए.जी. वाबळे, अहमदनगर |
| ०५ | एस.एम. औताडे, सोलापूर |
| ०६ | बेस्ट कन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदनगर |
| ०७ | गुगळे कन्स्ट्रक्शन अहमदनगर |

वरील ०७ ठेकेदारांपैकी खालील ०२ ठेकेदारांनी विहित मुदतीत सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१. | पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव |
| ०२ | एस.आर. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील कलम २१ (२) अन्वये उपरोक्त रस्त्यांची कामे संस्थानचे निधीतून हाती घेणेसाठी मान्यता मिळणेकामी जा.नं. एसएसएसटी/ वशी-बांधकाम/१०५४६/ दि.२२/०९/२००५ चे पत्राव्दारे मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे

उपरोक्तप्रमाणे मुदतीत प्राप्त झालेल्या सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समिती सभेत उघडणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त कामी दोनच निविदा प्राप्त झाल्याने याकामासाठी फेर निविदा मागविण्यात याव्यात, असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१२.** **मौजे निमगांव-को-हाळे येथील शेती महामंडळाकडून ताबा घेतलेल्या जमिनीसाठी रस्ते विकसित करणेबाबतचे कामाचे निविदांबाबत.**

**निर्णय क्र.७४२.** मौजे निमगांव को-हाळे येथील शेती महामंडळाकडून ताबा घेतलेल्या जमिनींसाठी रस्ते विकसीत करणेबाबतच्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीचे दि. १३/०३/२००५ रोजीचे सभेत निर्णय क्र. १०८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

आर्किटेक्ट मे. निकम पा. असो.श्रीरामपूर यांनी रु.१,०४,०२,८९७/- मात्र अपेक्षित खर्चाचे सादर केलेल्या एस्टीमेटनुसार वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आल्या आहेत. को-या निविदा विक्री दि. ०६/१०/२००५ ते दि. २०/१०/२००५ या कालावधीत ठेवण्यात आली होती. सिलबंद निविदा सादर करण्याची मूदत दि. ०३/११/२००५ अखेर होती.

खालील निविदाधारकांनी दिलेल्या मुदतीत कोरे निविदा फॉर्म विकत घेतलेले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१. | पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव |
| ०२ | एम.एस.पंजाबी, पुणे |

| | |
|---|---|
| ०३ | एस.एस. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर |
| ०४ | एन.के.गाडे, संगमनेर |
| ०५ | ए.जी. वाबळे, अहमदनगर |
| ०६ | एस.एम. औताडे, मंगळवेढा, जि. सोलापूर |
| ०७ | बी.डी. शिंदे ॲण्ड कंपनी, राहाता |
| ०८ | ओंकार कन्स्ट्रक्शन, नांदेड |
| ०९ | बनकर पाटील ॲण्ड इंजि. अंगणगांव, ता. येवला. |
| १० | बेस्ट कन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदनगर |
| ११ | जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड इंजिनियरींग कं.,कोल्हार खु ॥ |

वरील निविदाधारकांपैकी दि. २२/११/२००५ अखेर वाढ दिलेल्या मुदतीत खालील ०५ निविदाधारकांनी सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** |
|---|---|
| ०१. | पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव |
| ०२ | श्री.एस.एम.औताडे,मंगळवेढा, जि.सोलापूर |
| ०३ | बी.डी. शिंदे ॲण्ड कंपनी, राहाता |
| ०४ | जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड इंजिनियरींग कंपनी, कोल्हार खु ॥ |
| ०५ | एन.के. गाडे, संगमनेर |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील कलम २१ (२) अन्वये उपरोक्त रस्त्यांची कामे संस्थानचे निधीतून हाती घेणेसाठी मान्यता मिळणेकामी जा.नं. एसएसएसटी/ वशी-बांधकाम/१०५४७/ दि.२२/०९/२००५ चे पत्राव्दारे मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत ठेकेदारांसमक्ष उघडण्यात आल्या. त्यामध्ये त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| **अ.नं.** | **ठेकेदाराचे नांव** | **देऊ केलेले दर** | **चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर** |
|---|---|---|---|
| ०१. | पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव | ७.७७ % अधिक | .०७ % कमी |
| ०२ | श्री.एस.एम.औताडे,मंगळवेढा, जि.सोलापूर | ७ % कमी | अनुपस्थित |
| ०३ | बी.डी. शिंदे ॲण्ड कंपनी, राहाता | ९.९९ % अधिक | ६.९९ % अधिक |
| ०४ | जगताप कन्स्ट्रक्शन ॲण्ड इंजिनियरींग कंपनी, कोल्हार खु | १८.७७ % अधिक | १५.७७ % अधिक |
| ०५ | एन.के. गाडे, संगमनेर | ३१ % अधिक | २९.५० % अधिक |

निम्नतम दराचे ठेकेदार मे.एस.एस.औताडे, आजचे सभेपुढे चर्चेसाठी अनुपस्थित असल्याने तसेच त्यांचा डांबरीकरणाचा प्लँट शिर्डी परिसरात नाही त्यामुळे मंगळवेढा येथील सदर ठेकेदार शिर्डी परिसरात काम करण्यास सक्षम नाहीत. याबाबत सभेत सविस्तर चर्चा होऊन द्वितीय निम्नतम दर असलेले ठेकेदार पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉंट्रॅक्टर्स, कोपरगाव यांनी वाटाघाटीत देऊ केलेले निविदा रकमेच्या ०.०७ % दराची निविदा स्वीकारण्यात यावी, असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१३. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नगर-मनमाड रस्ता (लांबी-१६०५ मीटर) रुंदीकरण व डांबरीकरण कामाबाबत.**

**निर्णय क्र.७४३.** शिर्डी शहरातून जाणारा नगर- मनमाड रस्ता (लांबी - १६०५ मि. ) रुंदीकरण व डांबरीकरणाचे काम ठेकेदार मे. न्यू महावीर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचेमार्फत चालू आहे. सदर कामापैकी डांबरीकरणाचे मुख्य काम पूर्ण झालेले आहे. डिव्हायडरचे काम व पूर्व बाजू फुटपाथ स्लॅब व पेव्हींग ब्लॉकचे काम जवळजवळ पूर्ण झालेले आहे. पश्चिम बाजू फुटपाथ व स्लॅबचे सुमारे ६०% काम पूर्ण झालेले आहे. सदर कामाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | शिरडी शहरातून जाणारा नगर-मनमाड रस्ता (लांबी १६०५ मि.) विकसीत करणे. |
| ठेकेदाराचे नांव | मे. न्यु महावीर कंन्स्ट्रक्शन, औरंगाबाद |
| व्यवस्थापन मंडळ निर्णय | क्रमांक ५२ दि.२१-२२/०२/२००४<br>क्रमांक २२७ दि. २९-३०/०५/२००४<br>क्रमांक १४९ दि. २७/१२/२००४<br>क्रमांक ३४४ दि. १८/०७/२००५ |
| मंजूर निविदा रक्कम | रु. २,०७,१६,२००/- |
| मंजूर सुधारीत एस्टीमेट क्र. १ | रु. २,५६,४०,८५०/- |
| मंजूर सुधारीत एस्टीमेट क्र. २ (M-२५ पेव्हींग ब्लॉक खर्चासह ) | रु. ३,०१,३५,९०४/- |
| कार्यादेश क्रमांक | जा.नं. एसएसएस/वशी- बांधकाम/ ४७३८ /०४ दिनांक ०६/०५/२००४ |
| काम पूर्ण करण्याची मूदत | दि. ३१/०८/२००५ अखेर (निर्णय क्र. २५८ (क) |

| | |
|---|---|
| | दि. ०९/०७/२००५) |
| झालेल्या कामाची रक्कम | रु. २,८१,३०,४१०/- (१३ वे रनिंग बिल ) (ठेकेदार यांनी रु.३,३५,१४,८६८/- मात्र रकमेचे १४ वे रनिंग बील सादर केलेले असून त्यापोटी त्यांना रु. १७,००,०००/- मात्र इतका ॲडव्हान्स अदा करण्यात आलेला आहे. ) |

सदर प्रकल्पाचे पूर्वीचे आर्किटेक्ट मे.प्रसाद आर्किटेक्ट, पुणे यांनी सादर केलेल्या रु.२,९७,४०,३००/- मात्रचे सुधारीत एस्टीमेट क्र. ०२ ला मा.व्यवस्थापन समिती निर्णय क्र. १४९ दि. २७/१२/२००४ अन्वये मान्यता देणेत आली आहे. त्यानंतर रस्त्याचे धावपट्टीत M २५ ब्लॉक बसविणेसाठी अपेक्षित वाढीव खर्च रु. ३,९५,६०४/- मात्रला निर्णय क्र. ३४४ दि. १८/०७/२००५ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. अशाप्रकारे सद्यस्थितीत सदर प्रकल्पासाठी एकूण रु. ३,०१,३५,९०४/- इतकी रक्कम मंजूर आहे. ठेकेदार यांनी सादर केलेले १४ वे रनिंग बील रु. ३,३५,१४,८६८/- मात्र इतक्या रकमेचे आहे. ही रक्कम मंजूर रकमेपेक्षा जास्त आहे. सदर बिलापोटी मंजूर रकमेच्या मर्यादेत रु. १७,००,०००/- इतका ॲडव्हान्स ठेकेदार यांना अदा करणेत आलेला आहे. आता उर्वरित काम पूर्ण करणेसाठी अपेक्षित वाढीव खर्चास मंजुरीची आवश्यकता आहे.

ठेकेदार यांनी दि.३१/१०/२००५ चे पत्राव्दारे निविदेत समाविष्ट नसलेल्या बाबींसाठी VAT ४% व PF १%. सह सुधारीत दरांची मागणी केलेली आहे. करारनाम्यामध्ये निविदेत नसलेल्या बाबींसाठी D.S.R. दर अधिक निविदा टक्केवारी व D.S.R. मध्ये नसलेल्या बाबींसाठी मटेरीअल, लेबर अधिक १५% याप्रमाणे दर निश्चित करण्यात यावेत अशी तरतूद आहे.अशाप्रकारे करारनाम्यानुसार Extra Items साठी VAT व PF देय होत नाही. न्यू महावीर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांना जा.नं. ४७३८ दि. ०६/०५/२००४ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. त्यावेळी VAT अस्तित्वात नव्हता. एप्रिल - २००५ पासून VAT अस्तित्वात आलेला आहे. दि.०७/१२/२००५ चे पत्राव्दारे ठेकेदार यांनी VAT कर at source कपात करावयाचा असेल तर तो प्रथम त्यांचे चालू कामावर लागू करावा व नंतर at source कपात करावा. त्यांचे चालू देयकातून VAT कपात करु नये. VAT संदर्भात काही देय रक्कम असेल तर त्याची पूर्ण जबाबदारी त्यांचेवर राहील असे कळविले आहे.

ठेकेदार यांचे उपरोक्त मागणीबाबत सदर प्रकल्पाचे कन्सल्टंट मे. निकम पा. असो.यांनी दि. २४/११/ २००५ चे पत्राव्दारे अभिप्राय दिला आहे. सदर पत्राव्दारे निविदेत नसलेल्या बाबींसाठी VAT व PF देय होत नाही असे त्यांनी कळविले आहे. तसेच कन्सलंट यांनी दि. ०९/१२/२००५ चे पत्राव्दारे सर्व काम (Entire scope of work as per Revised Estimate No.०२) पूर्ण करणेसाठी अपेक्षित असलेल्या खर्चाचे सुधारित एस्टीमेट सादर केले आहे. त्यानुसार एकूण अपेक्षित खर्च रु. ३,४४,३९,८६१/- (रु. तीन कोटी चव्वेचाळीस लक्ष एकोणचाळीस हजार आठशे एकसष्ठ ) मात्र इतका आहे. म्हणजेच यापुर्वीचे मंजूर रकमेपेक्षा रु.४३,०३,९५७/- मात्र इतका जादा खर्च अपेक्षित आहे. कन्सल्टंट यांनी सादर केलेली उपरोक्त दि. २४/११/२००५ व दि. ०९/१२/२००५ ची पत्र व त्यासोबतचे एस्टीमेट सोबत अवलोकनार्थ जोडले आहे. त्याचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) | निविदेतील बाबी | - | रु. | २,६९,५५,७३८.१० |
| ब) | एक्स्ट्रा आयटेम्स (DSR Rate ) | - | रु. | २६,२९,१४५.०३ |
| क) | एक्स्ट्रा आयटेम्स (Non-DSR) | - | रु. | ४४,२२,५२२.८९ |
| | एकूण | - | रु. | ३,४०,०७,४०६.०२ |
| | सिमेंटचे दरातील फरक | - | रु. | २,२७,५०५.०० |
| | एकूण | - | रु. | ३,४२,३४,९११.०२ |
| | अधिक कन्टीन्जंसीज | - | रु. | २,०४,९५०.३५ |
| | महान एकूण | - | रु. | ३,४४,३९,८६१.०० |

वरीलपैकी ठेकेदार यांनी साईटवर पूर्ण केलेल्या कामाची अंदाजे किंमत रु. ३,०३,९५,५११.०० मात्र इतकी असून साईटवर शिल्लक असलेल्या मटेरीअलची अंदाजे किंमत रु.१०,७४,८९७.०० मात्र इतकी आहे.

कन्सल्टंट यांनी सादर केलेल्या सुधारीत एस्टीमेटनुसार कमी व अधिक होणा-या बाबींचा तपशील सोबत जोडला आहे.

ठेकेदार यांनी मागणी केलेल्या वाढीव दरांनुसार संपूर्ण कामासाठी येणारा खर्च अंदाजे रु. ३,५५,४९,५६१.०० मात्र इतका आहे. म्हणजेच मंजूर रकमेपेक्षा अंदाजे रु. ५४,१३,६५७.०० मात्र इतका जादा खर्च आहे.

त्यापैकी ठळक वाढीच्या बाबी खालील प्रमाणे आहेत.

**०१) ६०० मि.मी.व्यासाचे आरसीसी पाईप्स :-** पूर्व बाजूचे पाईप एनकेसिंगसाठी सदर पाईप वापरण्यात आले. सदर रस्त्यालगत असलेली खाजगी मालमत्ताधारक, हॉटेल्स, बस स्थानक, संस्थान परीसर प्रवेशव्दार तसेच सार्वजनिक जोड रस्ते या ठिकाणी जड वाहनांना फुटपाथ ओलांडून जाणे शक्य नसल्याने त्या ठिकाणी आर.सी.सी.पाईप टाकून त्याभोवती कॉंक्रीटचे आवरण (एनकेसिंग) करण्यात आले आहे. त्यामुळे क्वांटीटी मध्ये वाढ झाली.

**०२) S.D.B.C :-** सुधारीत अंदाजपत्रक क्र. २ मध्ये आर्किटेक्ट यांनी २५ मि.मी. जाडी गृहीत धरली होती. तथापि जॉब मिक्स नुसार तसेच रस्त्याला योग्य उतार (केंबर) देणेसाठी जास्त जाडी करावी लागेल. त्यामुळे क्वांटीटीत वाढ झाली.

**०३) इंटरलॉकींग पेव्हींग ब्लॉक :-** आर्कीटेक्ट यांचे डिझाईननुसार फुटपाथवर फ्लॉवर बेड दर्शविलेले होते. फुटपाथची रुंदी कमी असल्याने त्यांचा पादचा-यांना अडथळा होईल म्हणून फुटपाथचे संपूर्ण पृष्ठभागावर पेव्हींग ब्लॉक बसविण्याचे ठरले. त्यामुळे एकूण क्वांटीटीत वाढ झाली.

**०४) पी.सी.सी. (M१५) पडदी :-** फुटपाथचे खाली गटरसाठी सांडपाण्याचा निचरा होणेकामी योग्य प्रमाणात उतार मिळावा याकरीता साईटवरील प्रत्यक्ष परिस्थितीनुसार परदीच्या उंचीत वाढ झाली. त्यामुळे क्वांटीटीत वाढ झाली.

**०५) डांबर पुरवठा :-** निविदेतील तरतूद व जॉब मिक्स नुसार वापरण्यात आलेले डांबर यामधील फरक अदा करणेत आलेला आहे. आर्किटेक्ट यांनी पूर्वीचे एस्टीमेटमध्ये धरलेली क्वांटीटी फारच अपुरी होती.

यापुर्वी मंजूर करण्यात आलेल्या सुधारीत एस्टीमेट क्र. ०२ नुसार रु. २,९७,४०,३००/- मात्र अपेक्षित खर्चाचा प्रस्ताव जा.नं. ३८२७ दि. १४/०४/२००५ चे पत्रान्वये मा. प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेत आलेला आहे. आता अपेक्षित वाढीव खर्चाचा प्रस्ताव त्यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा लागेल.

तरी यापुर्वीचे मंजूर दरांनुसार तसेच आर्किटेक्ट यांनी प्रमाणित केलेल्या दरांनुसार येणारे रु.४३,०३,९५७.०० मात्रचे अपेक्षित वाढीव खर्चास व त्यानुसार मे. न्यू महावीर कन्स्ट्रक्शन यांचेकडून संपूर्ण काम करुन घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत मे.न्यू महावीर कन्स्ट्रक्शन,औरंगाबाद व आर्किटेक्ट मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर हे उपस्थित होते. त्यांनी या कामाबाबत सभेस सविस्तर माहिती दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.श्री सी.डी.फकीर,निवृत्त मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडे अपेक्षित वाढीव खर्च व दरांबाबतचा प्रस्ताव पाठवून त्याचा अभिप्राय घेण्यात यावा व अभिप्रायानुसार कार्यवाही करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१४. मौजे निमगांव-कोऱ्हाळे गट नं.१९८,१९९,२०० व २०१मध्ये उद्यान विकसित करणेसाठी कन्सल्टंट यांची फी ठरविणेबाबत.**

**निर्णय क्र.७४४.** दिनांक ०२.१०.२००५ चे व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.५८८ अन्वये मढव कन्सलटंट यांच्या समवेत विश्वस्तांनी शेगाव येथील गार्डनची पहाणी करुन त्यांना आराखडा करणेबाबत पत्र द्यावे असे ठरले. त्यांनतर व्यवस्थापन समितीच्या दिनांक ५.११.२००५ रोजी झालेल्या सभेतील निर्णयानुसार मढव कन्सल्टंटस प्रा.लि.मुंबई यांना मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील शेती महामंडळाकडून ताब्यात घेतलेल्या क्षेत्रापैकी गट नं. १९८,१९९,२०० व २०१ मिळून क्षेत्र ८ हेक्टर २० आर या जागेवर उद्यान विकसित करणेकामी जा.नं.एसएसएस-वशी-बगीचा-१३१३३-२००५ दिनांक १६.११.२००५ ने नेमणूक पत्र दिलेले आहे. त्यानुसार त्यांनी कार्यपध्दती बाबत अटी व शर्ती व फी या संबधी दिनांक ११.११.२००५ चे पत्राव्दारे खालीलप्रमाणे मागणी केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**अ)कामाचा आवाका-**

०१.संपूर्ण जागेची पहाणी व नकाशा तयार करुन अंदाजे खर्चाचा तपशिल देणे बगीचा तयार करणेकामी कामाचे नियोजन करणे

०२. आराखडा व बांधकामाचे स्वरुप त्यामध्ये ड्रेनेज विद्युत रोषणाई, हिरवळ व पाण्याची सोय

०३. आर्किटेक्ट प्लॅननुसार सर्व बांधकामाचे नकाशे व आतील कामाचे नकाशे देणे

०४. सर्व कामाचे स्पेसिफिकेशन्स व बाबींचे विवरणासह अहवाल तयार करणे

**ब) फी संबंधी**

**पर्याय क्र.०१.**

०१. एकूण खर्चाच्या ६ टक्के रक्कम व अधिक लागू कर

०२. पर्यवेक्षणासाठी आवश्यक असेल तेव्हा साईटला भेट त्यासाठी रुपये २५००.०० प्रति भेट प्रति दिवस व प्रत्यक्ष होणारा खर्च

**पर्याय क्र.०२**

०१. स्ट्रक्चरल इंजिनिअर, इलेक्ट्रीकल इंजिनिअर, मेकॅनिकल इंजिनिअर, किचन कन्सल्टंटस व बीले प्रमाणीत करणे यासह टर्नकी प्रोजेक्ट कन्सल्टंट घेणार असल्यास त्यासाठी एकूण खर्चाच्या ८ टक्के अधिक लागू कर इतकी फी

**क) पेमेंटची पध्दती**

०१. १० टक्के रक्कम नेमणूकीच्या वेळी

०२. २० टक्के रक्कम आराखडा मंजूर झाल्यावर

०३. ६० टक्के रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर

**ड) संस्थानची जबाबदारी**

०१. माती परिक्षण, पाणी कनेक्शन, झाडे, हिरवळ व ड्रेनेज यांची माहिती पुरविणे

०२. संस्थानच्या सर्व विभागाशी व इतर कन्सल्टंटस समन्वय ठेवणेकामी सहाय्य करणे

०३. शासकीय मंजूरी असेल तर वेळेत प्राप्त करणे.

संस्थानतर्फे सध्या इतर बांधकाम प्रकल्पासाठी नेमणूक करण्यात आलेल्या आर्किटेक्टस् यांना कामाच्या किंमतीच्या २% इतकी फी देण्यात येत आहे. वरील फी विषयी वाटाघाटी करणेकामी अपेक्षित असल्यास तसे कळविणेबाबत मढव कन्स्ल्टंट्स यांनी विनंती केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत श्री विश्वास मढव यांचे प्रतिनिधी श्री गौरंग डांगे हे उपस्थित होते. त्यांनी माहिती चित्रफितीव्दारे सभेस दिली. याकामी श्री.मढव यांना आर्किटेक्ट फी ४ % देण्यात यावी, असें ठरलें.

याचवेळी मा.अध्यक्षांनी सभेस अशी माहिती दिली की, संस्थानने भू-संपादनाने निमगाव-कोऱ्हाळे येथील खरेदी केलेल्या जमीनीमध्ये काही भागात खाजगी शेतकऱ्यांच्या जमीनी आलेल्या आहेत. या जमीनी संस्थानला मिळाल्या तर संस्थान मालकीचे सलग क्षेत्र होऊन संस्थानला चांगल्याप्रकारे विकास कामाच्या योंजना राबविता येतील. याकरिता भूसंपादनाचा प्रस्ताव करावा अथवा या शेतकऱ्यांना समक्ष बोलावून संस्थानला जमीनी खरेदीने देण्याबाबत विनंती करावी. सदर प्रकरणाचा पाठपुरावा मा.अध्यक्ष व मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भा.गोंदकर यांनी करावा, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/बगीचा विभाग प्रमुख)

**विषय नं.१५. श्रीसाईनाथ रुग्णालयात डॉ.भरत बंब, दंत रोग तज्ञ, कोपरगाव यांना विनामोबदला सेवा करण्याची परवानगी देणेबाबत.**

**निर्णय क्र.७४५.** डॉ. भरत मदनलाल बंब, बी.डी.एस., कोपरगांव यांनी संस्थानच्या हॉस्पिटलमध्ये आठवड्यातून एक दिवस सकाळी ९.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत श्री साईनाथ रुग्णालयात स्वतः च्या खर्चाने येऊन विनामोबदला केवळ सेवेच्या भावनेतून काम करण्याची इच्छा दिनांक २८/१०/२००५ रोजीच्या अर्जान्वये दर्शविली आहे.

डॉ. बंब यांनी बी.डी.एस. ही पदवी प्राप्त केल्यांनतर १ वर्ष गव्हरमेंट डेंटल कॉलेज व हॉस्पिटल, मुंबई येथे अनुभव घेतल्यानंतर सन १९८७ पासून गेली १८ वर्षे कोपरगाव येथे दंतरोग तज्ञ म्हणुन यशस्वीरित्या दंत रोग्यांना वैद्यकीय सेवा देत आहेत.

डॉ. बंब यांची श्री साईनाथ रुग्णालयात आठवडयातील रविवार या दिवशी साईभक्त परिसरातील रुग्ण व कर्मचारी यांच्यासाठी दंतसेवा उपलब्ध करुन देता येईल असे मत आहे. कारण इतर दिवशी आपल्याकडील दंतरोग तज्ञ डॉ. चांदगुडे हे रुग्णांना सेवा देत असतात. रविवारी इतर डॉक्टरांना सुट्टी असल्याने डॉ. बंब यांना आठवडयातील रविवार या दिवशी श्री साईनाथ रुग्णालयात दंतरोग विभागात विनामोबदला सेवा करण्याची संधी दिल्यास साईभक्त तसेच शिरडी व शिरडी परिसरातील रुग्ण तसेच संस्थान कर्मचारी यांना या सेवेचा फायदा देता येईल. तसेच डॉ. बंब यांचे सेवेचा बोर्ड तयार करुन रुग्णालय विभागात लावता येईल.

तरी डॉ. भरत बंब यांना श्री साईनाथ रुग्णालयामध्ये विनामोबदला आठवडयातील रविवार या दिवशी स्वखर्चाने उपस्थितीत राहून विनामोबदला सेवा करण्यास तसेच त्यांचे सेवेचा बोर्ड श्री साईनाथ रुग्णालयात लावणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/वैद्यकीय अधिक्षिका,रुग्णालय)

**विषय नं.१६. संस्थान कर्मचाऱ्यांना जादा वैद्यकीय बीलांचा परतावा देणेबाबत.**

**निर्णय क्र.७४६.** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा. गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नांव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुर्यकांत केशव भोसले | १४८३२.६० | १२६०८.०० |
| २ | श्री. रमेश नारायण चौधरी | ७३२७.२५ | ६४०३.०० |
| ३ | श्रीमती आशा तुकाराम रोकडे | १०७४०.०० | ९६६०.०० |
| ४ | श्रीमती उल्का संजय थिटे | ९९४१.०० | ९९४१.०० |
| ५ | डॉ. सौ. आशा श्रीराम पेंडसे | ६३५.०० | ६३५.०० |
| ६ | डॉ. विशाल बाबुराव धस | ८०७.०० | ८०७.०० |
| ७ | श्री. सुदाम देवराम कणसे | ३७४८.०० | ३५४८.०० |
| ८ | श्री. अशोक हरिश्चंद्र गोडगे | ३९,२३६.५५ | ३९२३६.५५<br>- १५१९३.००<br>= **२४०४३.५५** |
| ९ | श्री. सतिष गंगाधर बकरे | २,५९०.०० | २,५९०.०० |
| १० | डॉ.एस.बी.गोंदकर | ९०२९.०० | ९०२९.०० |

तसेच उपरोक्त तक्त्यात अ.नं.०८ श्री. गोडगे यांना दुसऱ्यांदा उपचारासाठी जाते वेळी रु. २०,०००/- मात्र रक्कम ॲडव्हान्स म्हणून के.ई.एम. रुग्णालयाचे नावाने संस्थानकडून देण्यात आली होती. त्यातील रु. ४८०७/- चा डी.डी. हॉस्पिटलने परत पाठविला आहे. म्हणजे श्री. गोडगे यांना उपचारासाठी प्रत्यक्ष रु. १५१९३/- मात्र खर्च आलेला आहे. त्यांना संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये संपूर्ण रक्कम रु. ३९२३६.५५ मात्र देय होत आहे. रु.१५१९३/- ही ॲडव्हान्स दिलेली रक्कम जमा नावे होवून त्यांना रु. २४०४३.५५ मात्र अदा करणेत यावी असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.१७. संस्थान कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचारासाठी नवीन रुग्णालयाचा अंतर्भाव करणेबाबत.**

**निर्णय क्र.७४७.** श्रीसाईबाबा संस्थानचे सेवेतील कायम कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबितांना वैद्यकीय उपचाराचा परतावा देण्यात येत असतो. त्याबाबतची सध्याची कार्यप्रणाली खालीलप्रमाणे आहे-

०१. संस्थान कर्मचारी व त्यांचेवरील अवलंबितांना संस्थानचे रुग्णालयात होणारे बाह्यरुग्ण उपचार अंतर्रुग्ण उपचार हे संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात मोफत देण्यात येत असतात. यावेळेस त्यांना उपचारासाठी लागणारी औषधे गोळ्या, इंजेक्शन इत्यादी जी संस्थानचे रुग्णालयात उपलब्ध आहे ती वापरली जातात व जी संस्थानचे औषध भांडारात उपलब्ध नाहीत ती त्यांना बाहेरुन विकत आणणेकामी Prescription वर लिहून दिली जातात.

०२. संस्थानचे रुग्णालयात जे उपचार/तपासण्या होत नाहीत त्यासाठी संस्थानचे वैद्यकीय अधिकारी सदर कर्मचारी अथवा त्यांचे अवलंबितांना बाहेरचे रुग्णालयात पूढील उपचार/तपासण्याकामी श्री साईनाथ रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षिका यांचेमार्फत पाठविले जाते याकामी खालीलप्रमाणे रुग्णालये निश्चित करण्यात आलेली आहेत.

| | |
|---|---|
| ०१ | प्रवरा हॉस्पिटल,लोणी |
| ०२ | सिव्हील हॉस्पिटल,नाशिक |
| ०३ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद |
| ०४ | ससून हॉस्पिटल,पुणे |
| ०५ | के.ई.एम.हॉस्पिटल,पुणे |
| ०६ | जे.जे.हॉस्पिटल,मुंबई |
| ०७ | के.ई.एम.हॉस्पिटल ,मुंबई |
| ०८ | लोकमान्य टिळक(सायन)हॉस्पिटल,मुंबई |
| ०९ | नायर हॉस्पिटल,मुंबई |
| १० | सिव्हील हॉस्पिटल,अहमदनगर |
| ११ | ऑल इंडिया इन्स्टीट्यूट ऑफ फिजीकल मेडीसीन,मुंबई |
| १२ | नामको हॉस्पिटल,नाशिक |
| १३ | आनंद ऋषीजी हॉस्पिटल,अहमदनगर |
| १४ | सेंट लूक हॉस्पिटल,श्रीरामपूर |
| १५ | टाटा मेमोरिअल हॉस्पिटल, मुंबई |

०३. या रुग्णालयाव्यतिरिक्त जर कर्मचाऱ्यांने इतर रुग्णालयात उपचार घेतले तर त्या वैद्यकीय बीलाचा परतावा करण्यात येत नाही.

०४. संस्थान कर्मचारी अथवा त्यांचे अवलंबित यांनी संस्थान रुग्णालयात उपचार घेत असतांना बाहेरुन आणलेल्या औषधांच्या खर्चाची बीले अथवा वरील निश्चित केलेल्या रुग्णालयात उपचार घेतल्यास येणाऱ्या खर्चाची प्रतीपूर्ती करण्यात येत असते.

०५. उपरोक्तप्रमाणे झालेल्या खर्चाची बील प्रतीपूर्ती करण्यासाठी नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्यानुसार रुपये ५०००/- पर्यन्तच्या खर्चाची बीले ही मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात वैद्यकीय अधिक्षिका यांनी शिफारस केल्यानंतर अदा करण्यात येत असतात.

०६. रुपये ५०००/- चे वरील खर्चाची बीले ही वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये अदा करण्यात येत असतात. या नियमावलीनुसार रुपये ५०००/- चे वरील प्राप्त झालेली बीले ही प्रथम वैद्यकीय अधिक्षिका यांनी तपासून त्यानुसार देय होणारी रक्कम अदा करण्याची शिफारस करण्यात येते. त्यानंतर सदर बीले ही वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ समितीपूढे (व्यवस्थापन मंडळातील दोन डॉक्टर्स) मान्यतेसाठी ठेवण्यात येतात व त्यांचे शिफारसीनुसार बीले अंतिम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीपूढे सादर करण्यात येतात त्यानुसार मंजूर झालेल्या बीलाची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांना लेखाशाखेमार्फत अदा करण्यात येतात.

याप्रमाणे बीले प्रतीपूर्ती करण्याची सध्याची कार्यप्रणाली आहे. परंतु आतापर्यन्त असे दिसून आले आहे की, वरील शिफारस केलेली १५ रुग्णालये ही शासकीय, निमशासकीय, धर्मादाय असल्याने कर्मचाऱ्यांना तेथे संपूर्णपणे उपचाराची सुविधा उपलब्ध होत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना तेथे ( म्हणजे ज्या रुग्णालयात शिफारस केलेली आहे ) गेल्यावर खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागतात. व अशा बीलांची प्रतीपूर्ती करणे नियमबाह्य होते म्हणून वरील १५ रुग्णालयांव्यतिरिक्त अजून खालील रुग्णालयांचा यादीत समावेश करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | सेठ नंदलाल धूत हॉस्पिटल, औरंगाबाद | ०२ | सुजाता बिर्ला चॅरिटेबल हॉस्पिटल,नाशिक |
| ०३ | रुबी हॉल क्लिनीक,पुणे | ०४ | संचेती इन्स्टिट्युट ऑफ आर्थोपेडीक,पुणे |
| ०५ | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल,पुणे | ०६ | लाईफ लाईन हॉस्पिटल,नाशिक |
| ०७ | बॉम्बे हॉस्पिटल, मुंबई | ०८ | निरामय हॉस्पिटल, चिंचवड, पुणे |

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.१८. श्री शिवाजी यमाजी महाडीक, वरिष्ठ लिपिक,चौकशी व निवासस्थान कार्यालय यांचे जादा वैद्यकीय बीलाबाबत.**

**निर्णय क्र.७४८.** श्री.महाडीक यांचा मुलगा श्री. भाऊसाहेब शिवाजी महाडीक यांची प्रकृती अतिशय गंभीर झाल्यामुळे श्री. महाडीक यांनी दि. ०४/०४/२००५ रोजी संस्थानचे रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. परंतु आपल्या रुग्णालयात त्यांना काहीच फरक न वाटल्याने त्यांनी त्यांचे स्वतःच्या इच्छेनुसार रुबी हॉल क्लिनीक, पुणे येथे पुढील उपचारासाठी दाखल केले होते. तेथे ते दि. ०५/०४/२००५ ते १९/०४/२००५ अखेर अंतरुग्ण म्हणून दाखल होते. तेथे त्यांनी घेतलेल्या उपचारासाठी त्यांना एकूण रु. २,५४,१८२/- मात्र खर्च आलेला आहे. परंतु उपचार घेवूनही त्यांचे मुलास फरक न पडल्याने त्याचे दुःखद निधन झालेले आहे. श्री. महाडीक यांनी संस्थानचे शिफारस पत्र घेतलेले नाही, तसेच त्यांचा मुलगा हा विवाहित होता. त्यामुळे श्री. महाडीक यांचे बील वैद्यकीय देखभाल नियमावलीत बसत नाही. तथापि, श्री. महाडीक यांच्या मुलाचे दुःखद निधन झालेले आहे. त्यांना विशेष बाब म्हणून रक्कम देय झाल्यास रु. २,०३,३४५/- मात्र देय होईल.

सदरचे बील हे मा. विश्वस्त डॉ. एकनाथ भा. गोंदकर व मा.विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी यांना दाखविलेले असून त्यांनी विशेष बाब व सहानुभूती म्हणून मदत देण्यास हरकत नाही अशी शिफारस केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.१९. श्रीसाईनाथ रुग्णालयातील आय.यु.आय.विभागासाठी मशिनरी /उपकरणे खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.७४९.** श्री साईनाथ रुग्णालयात नव्याने सुरु करावयाचे आय.यु.आय. विभागासाठी लागणारी उपकरणे खरेदीकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.०७.२००५ चे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर चर्चा होउन निर्णय क्र.२६५ अन्वये उपकरणे खरेदी कामीचा खर्च रु.२९७३०५/- चे खर्चास मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार सदर विभागासाठी लागणाऱ्या आठ प्रकारच्या उपकरणासाठी इकडील पत्र क्र.१०३६५ दि.१७.०९.२००५ अन्वये दि.३०.०९.२००५ अखेर एकूण ०५ उत्पादक कंपन्या / अधिकृत विक्रेते यांचेकडून कोटेशन मागवण्यात आले होते.

त्यास अनुसरुन खालील तीन अधिकृत विक्रेते / कंपन्या यांनी आपले कोटेशन पाठवले आहे.

१. मे. डी.शहा ॲण्ड कं., मुंबई

२. मे. रेमी इन्स्ट्रुमेंट (मोटार्स ) लि., मुंबई

३. मे. युनीव्हर्सल केमीकल्स, नाशिक

वरील पैकी अ.नं.१ व २ यांचे कोटेशन हे प्रशासन शाखेकडून टपालातून उघडून मिळालेले असून अ.नं. ३ यांचे बंद कोटेशन हे स्थानिक विश्वस्त सभा दि.२८.१०.२००५ रोजी समक्ष उघडून घेतलेले आहे. अशा ०३ कोटेशनचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन तो सर्व सदस्यांना पुरविण्यात आला होता तो सोबत **परिशिष्ट "ब "** म्हणून ठेवण्यात आलेला आहे.

| Sr. No. | Name of Machinary/Equipment | Qty. | D.Shah & Company, Pune | Universal Chemical, Nashik | Remi Motors Ltd., Mumbai | Total Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Remi Compact Clinical Centrifuge | 1 | **2835.00** | 2926.00 | 11646.54 | 2835.00 |
| | | | C 852 4x15ml | Model-C-852/4(4Tubes) | | |
| 2 | Cintex Carbon Dioxide ($CO_2$) Incubator # CIC-73 | 1 | 273375.00 | **269900.00** | | 269900.00 |
| | | | Inner Size -18" x 18" x18" | Make-Cintex, Model -CIC-73a, (14"X14"X14") | | |
| 3 | Micro-Filt(India) Horizontal Laminar Flow Ultra Clean Air Unit | 1 | **54675.00** | 57600.00 | | 54675.00 |
| | | | 28"x40"x58" | 2'X2'X2' | | |
| 4 | Magnus Inclined Binocular Microscope Model MLX-B | 1 | **23793.75** | 25168.00 | | 23793.75 |
| | | | | Magnus MLX-B , Olympus | | |
| 5 | Laboratory Incubator Mild Steel | 1 | 11643.00 | **5236.00** | | 5236.00 |
| | | | 18" x 18" x18" (45 x 45 x 45cm) | 14"x14"x14" | | |
| 6 | Automatic Micropet Pipettes | 2 | **1620.00** 5-40ul DMV-5 . | 5575.00 (5-50ul, 100-1000ul, 20-200ul,) | | 3240.00 |
| | | 2 | **1620.00** 40-200ul DMV-40 . | 2646(5ul,10ul,20ul,25ul,50ul,100ul,200ul,250ul,1000ul) | | 3240.00 |
| | | 2 | **1620.00** 200-1000ul DMV-200 . | | | 3240.00 |
| | Fixed Valume Pipette | 2 | **759.37** DMF-100 | 2646.00 100ul | | 1518.74 |
| | | | | | | |
| 7 | Centrifuge Tubes Borosilicate Glass 15ml | 50 | **9.11** | 35.00 | | 455.50 |
| | | | 15ml Capacity | 15ml | | |
| 8 | Counting Chamber Improved Neuber Ruling with a pair of cover slip Brightline Rohem Make | 1 | **759.37** | 840.00 | | 759.37 |
| | | | Rohem Make | Rohem | | |
| | | | | | **Total Amount Rs.-** | **368893.36** |

या तक्त्यातील निम्नतम दर ज्यांचे असतील त्यांचेकडून त्यांची खरेदीची शिफारस करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरच्या खरेदीकामी येणारे रक्कम रु.३,६८,८९३.३६ मात्र चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.२०. श्रीसाईनाथ रुग्णालयाकरिता सर्जिकल सिझर्स खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.७५०.** श्री साईनाथ रुग्णालयात ऑपरेशन थिएटरमध्ये इ.एन.टी. गायनिक, ऑर्थोपेडीक, जनरल सर्जरी इत्यादी शस्त्रक्रियासाठी खालील प्रकारच्या सर्जीकल सिझर्सची तातडीने आवश्यकता आहे. सध्या असलेल्या सिझर्स ह्या खराब (बोथट) झालेल्या असल्यामुळे दैनंदिन शस्त्रक्रिया करताना खुपच अडचणी येतात.

| अ.नं. | सिझर्सचे नांव | संख्या | अंदाजे किंमत |
|---|---|---|---|
| 1. | Mayo's Dissecting Scissors (Curved) 7.5" | 50 | Rs.19,500.00 |
| 2. | Mayo's Dissecting Scissors (Curved) 6.5" | 10 | Rs. 3,600.00 |
| 3. | Suture Cutting Scissors (Mayo-Curved ) 6.5" | 30 | Rs.10,800.00 |
| 4. | Suture Cutting Scissors (Mayo-Straight ) 6.5" | 30 | Rs.10,800.00 |
| 5. | Suture Cutting Scissors (Mayo-Curved ) 9.5" | 20 | Rs. 7,200.00 |
| | | Total Amount | Rs.51,900.00 |

वरील प्रमाणे सिझर्स ह्या मे.कालेलकर सर्जीकल्स, मुंबई या कंपनीच्या उत्कृष्ट दर्जाच्या आहेत. व त्या तातडीच्या असल्याने मे.कालेलकर सर्जीकल्स, मुंबई यांचेकडून खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रु.५१,९००.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय/वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**विषय नं.२१. गावरान तूप खरेदीकामी आलेल्या निविदांवर चर्चा /वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.७५१.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०५.११.२००५ मधील निर्णयानुसार प्रसादालय विभागाकडील प्रसादलाडूसाठी डिसेंबर २००५ ते एप्रिल २००६ अखेर आवश्यक १४५० क्विंटल गावरान तूप खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागणी करणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.१९-२१.११.२००५ चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेत आलेल्या आहेत. पैकी क्र.१ चे लिफाफ्यात मूळनिविदा व क्र.२ चे लिफाफयात बयाणा रकमेचा डीडी तसेच इतर कागदपत्राची मागणी केलेली आहे. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नांव** |
|---|---|
| ०१. | श्रीरामपूर दूध जिल्हा मध्य.सह.दूध व्याव.संघ लिमीटेड, बाभळेश्वर |
| ०२. | गोदावरी खोरे सहकारी दूध उत्पादक संघ लिमीटेड, शिंगणापूर ता.कोपरगांव |
| ०३. | विणा फुडस, जळगांव |
| ०४. | श्री साई समर्थ ॲग्रो लिमीटेड, चांगदेवनगर, पुणतांबा ता.राहाता |
| ०५. | अशोक भगर मिल, नाशिक |
| ०६. | पराग मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि., अवसरी फाटा, पो.मंचर जि.पुणे |
| ०७. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिकरोड |
| ०८. | एस.आर.थोरात मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि, संगमनेर |
| ०९. | नारायण उदेराम वैश्य, नाशिक |
| १०. | औरंगाबाद जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि.,औरंगाबाद |
| ११. | बाफना बजार, नाशिक |
| १२. | कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोल्हापूर |
| १३. | श्री वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ लि.,तात्यासाहेब कोरेनगर, ता.पन्हाळा |
| १४. | मेघदूत सेल्स कार्पोरेशन, मुंबई |
| १५. | महानंद डेअरी, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडणेत येऊन निविदा सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. चर्चा/वाटाघाटीअंती निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नांव** | **निविदेतील दर प्र.कि. रुपये** | **वाटाघाटीअंती देऊ केलेले दर प्र.कि.रुपये** |
|---|---|---|---|
| ०१. | श्रीरामपूर दूध जिल्हा मध्य.सह.दूध व्याव.संघ लिमीटेड, बाभळेश्वर | १२०.००(लूज) | १०८.००(लूज)<br>११३.००(पॅकिंगमध्ये) |
| ०२. | गोदावरी खोरे सहकारी दूध उत्पादक संघ लिमीटेड, शिंगणापूर ता.कोपरगांव | १२०.००(लूज) | १०८.००(लुज) |
| ०३. | विणा फुडस, जळगांव | ११०.००(लूज)<br>११३.००(पॅकिंगमध्ये) | ११०.००(लूज)<br>११३.००(पॅकिंगमध्ये) |
| ०४. | श्री साई समर्थ ॲग्रो लिमीटेड, चांगदेवनगर, पुणतांबा ता.राहाता | ११५.००(लूज) | १०५.००(लूज) |
| ०५. | अशोक भगर मिल, नाशिक माणिक<br>माखन क्रिम<br>मिल्क क्रिम<br>सुंदरम | १२०.०० पॅकिंग.<br>११८.००पॅकिंग.<br>११६.००पॅकिंग.<br>११५.००पॅकिंग. | ११८.००<br>११४.००<br>११०.००<br>११५.०० |
| ०६. | पराग मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि.,अवसरी फाटा,पो.मंचर जि.पुणे | १२०.००(पॅकिंगमध्ये ) | ११५.००(पॅकिंगमध्ये) |
| ०७. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिकरोड | ११५.४४ (पॅकिंगमध्ये) | १०५.००(पॅकिंगमध्ये) |
| ०८. | एस.आर.थोरात मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि, संगमनेर | १२०.००(लूज)<br>१२५.००(पॅकिंगमध्ये) | ११०.००(लूज)<br>१२०.००(पॅकिंगमध्ये) |
| ०९. | नारायण उदेराम वैश्य, नाशिक माणिक<br>माखन क्रिम<br>मिल्क क्रिम<br>सुंदरम | ११९.००<br>११७.००<br>११५.००<br>११४.०० | १०१.००+vat<br>९९.००+vat<br>९४.००+vat<br>९७.०० +vat |
| १०. | औरंगाबाद जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि.,औरंगाबाद | १२५.००(लूज) | १०८.००(लूज) |
| ११. | बाफणा बजार, नाशिक अमुल<br>महक<br>मोहनभोग | १४२.४८ (पॅकिंगमध्ये)<br>१२१.६८ (पॅकिंगमध्ये)<br>१००.८८ (पॅकिंगमध्ये) | १३७.०० (पॅकिंगमध्ये)<br>११०.७० (पॅकिंगमध्ये)<br>९७.०० (पॅकिंगमध्ये) |
| १२. | कोल्हापुर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. कोल्हापूर | १३५.२०(म्हैस ) | १२०.६४(म्हैस) |
| १३. | श्री वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ लि.,तात्यासाहेब कोरेनगर, ता.पन्हाळा | १११.२८(लूज)<br>११५.४४(पॅकिंगमध्ये) | १११.२८(लूज)<br>११५.४४(पॅकिंगमध्ये) |
| १४. | मेघदुत सेल्स कार्पोरेशन, मुंबई | १२०.०० | ११०.०० |
| १५. | महानंद डेअरी, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई | १२२.००(लूज) | ११८.००(लूज) |

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामपूर दूध जिल्हा मध्य.सह.दूध व्याव.संघ लिमीटेड, बाभळेश्वर व गोदावरी खोरे सहकारी दूध उत्पादक संघ लिमीटेड, शिंगणापूर, ता.कोपरगांव,जिल्हा-अहमदनगर. यांचेकडून तसेच पराग मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि.,अवसरी फाटा,पो.मंचर

जि.पुणे यांना गावरान तूप पुरविणेकामी पुरवठा आदेश देण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-खरेदी अधिकारी)

**विषय नं.२२. मंदिर परिसरातील स्टेनलेस स्टील रेलींगसाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निविदाधारकांशी चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.७५२.** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८-०९-२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेतील निर्णय क्र.५३६ अन्वये मंदिर परिसरात विविध ठिकाणी स्टेनलेस स्टील रेलींग व स्लाईडींग गेट बसविणेसाठी रक्कम रू. ०५,३५,०००.०० इतक्या खर्चास मान्यता मिळून या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेचा निर्णय झालेला आहे. या अन्वये वर्तमानपत्रांमधून जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार ०२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०२ | मे. शार्प इंजिनिअर्स, पुणे |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडणे आल्या असता निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेत देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | ४२,०४,१५९.०० |
| ०२ | मे. शार्प इंजिनिअर्स, पुणे | ०८,२४,७०९.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेले दर हे एस्टिमेटेड कॉस्ट पेक्षा जास्त असल्याने याकामी संबंधित कामे करणाऱ्या पार्ट्यांना पत्रे पाठवूनफेर निविदा मागविण्यात याव्यात, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक, विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.२३. नियोजित रुग्णालयाकरीता सौर उर्जा प्रकल्पाचे प्राप्त झालेल्या निविदा उघडून निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.७५३.** मा.व्यवस्थापन समितीसमोर श्री साईबाबा संस्थानच्या नवीन नियोजित सुपरस्पेशालिटी रुग्णालयाला सौर उर्जा सुविधा पुरविणेसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव दिनांक ०६-०८-२००५ च्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.०६ निर्णय क्र. ४५५ अन्वये मान्य झाला आहे.

याकामासाठी येणारे खर्चास व या कामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस मान्यता मिळालेली आहे. श्री साईबाबा संस्थानच्या नवीन नियोजित सुपरस्पेशालिटी रुग्णालयाला सौर उर्जा सुविधा पुरविणेसाठी मागवाव्या लागणाऱ्या टेंडरची विक्री करणेबाबत वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार शिरडी कार्यालयातून ०७ निविदा व मुंबई कार्यालयातून ०३ निविदांची विक्री झालेली आहे. व त्यापैकी शिरडी कार्यालयात ०४ निविदा व मुंबई कार्यालयात ०२ निविदा मिळून एकूण ०६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील खालीलप्रमाणे:-

**(अ) शिर्डी कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा :-**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे. जैन इरिगेशन सिस्टीम लि., जळगांव |
| ०२ | मे.सुदर्शन सौर शक्ती प्रा. लि., औरंगाबाद |
| ०३ | मे.फोटॉन एनर्जी सिस्टिम लि., हैदराबाद |
| ०४ | मे. सेवमॅक्स सोलर सिस्टिम प्रा.लि, पुणे |

**(ब) मुंबई कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा :-**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | मे. सोलर एनर्जायझरस, प्रा.लि., मुंबई |
| ०२ | मे.भारत हेवी इलेक्ट्रिकल्स, मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या असता निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेत देऊ केलेले दर रुपये | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१ | मे. जैन इरिगेशन सिस्टीम लि., जळगांव | २०,८५,५६५.०० | १७,२५,०००.०० |
| ०२ | मे.सुदर्शन सौर शक्ती प्रा. लि., औरंगाबाद | २२,४०,९१७.०० | २१,०६,४६२.०० |
| ०३ | मे.फोटॉन एनर्जी सिस्टिम लि., हैदराबाद | २१,१४,८०६.४६ | २०,०९,०६५.०० |
| ०४ | मे. सेवमॅक्स सोलर सिस्टिम प्रा.लि, पुणे | २०,७८,४९२.०० | अनुपस्थित |
| ०५ | मे. सोलर एनर्जायझरस, प्रा.लि., मुंबई | १८,४३,९७२.०० | १८,२५,९७२.०० |
| ०६ | मे.भारत हेवी इलेक्ट्रिकल्स, मुंबई | २६,४७,७९५.०० | २६,४७,७९५.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. जैन इरिगेशन सिस्टीम लि., जळगांव यांची निम्नतम दराची रुपये १७,२५,०००.०० निविदा स्वीकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.२४. ब्लिचिंग पावडर, ॲलम व क्लोरिन खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.७५४.** पाणी पुरवठा विभागाचे कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुध्दीकरणांसाठी ब्लीचींग पावडर आय.एस.आय. मार्क ग्रासीम मेक एस.बी.पी., फेरीक ॲलम आय.एस.आय. मार्क व क्लोरीन गॅस सिलेंडर यांची दैनंदिन कामांसाठी आवश्यकता भासते. यापुर्वीही आपण मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेनूसार वार्षिक खरेदीमध्ये निविदा मागवून नियमानूसार खरेदी केलेली आहे. परंतू माहे- डिसेंबर-२००५ अखेर सदर ऑर्डरची मुदत संपंत आहे व आज अखेर ब्लीचींग पावडर १० टन १०० किलो, फेरीक ॲलम १० टन व क्लोरीन गॅस सिलेंडर १३ नग येणे बाकी आहे.

पुढील वर्षासाठी माहे- जानेवारी-२००६ ते डिसेंबर-२००६ पर्यंत नवीन निविदा मागवून वरील मटेरीयल खरेदी करणे आवश्यक आहे. त्यात २५ टन ब्लीचींग पावडर, ५० टन फेरीक ॲलम व २० नग क्लोरीन गॅस सिलेंडरची आवश्यकता असून त्यासाठी अंदाजे रुपये ५,७७,८००/- मात्र एकूण खर्च येणार आहे.

वरील मटेरीयलकरीता चालू वर्षात झालेला खर्च खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | अंदाजे खर्च रुपये |
|---|---|---|
| ०१. | ब्लीचींग पावडर-१९.६६३ टन (एप्रिल २००४ ते मार्च २००५ अखेर) | २,८६,८८३.१७ |
| ०२. | फेरीक ॲलम -३७.१५५ टन (एप्रिल २००४ ते मार्च २००५ अखेर) | ९९,६१२.५५ |
| ०३. | क्लोरीन गॅस सिलेंडर -१३ नग (एप्रिल २००४ ते मार्च २००५ अखेर) | ५१३५०.०० |
| | एकूण | ४,३७,८४५.७२ |

सन २००४-२००५ चा प्रत्यक्ष खर्च लक्षात घेता खालील प्रमाणे ब्लीचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर लागणार आहेत.त्यासाठी रुपये **५,७७,८००/-**खर्च अपक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | तपशील | टन/नग | एकूण अंदाजे खर्च रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | ब्लीचींग पावडर | २५ टन | ३,६४,७५०/- |
| ०२ | फेरीक ॲलम | ५० टन | १,३४,०५०/- |
| ०३ | क्लोरीन गॅस सिलेंडर | २० टन | ७९,०००/- |
| | | **एकूण अंदाजे खर्च-** | **५,७७,८००/-** |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तप्रमाणे आवश्यक असणारे ब्लीचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५,७७,८००.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-खरेदी अधिकारी/पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**विषय नं.२५. मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांची पाणी तपासणीकामी फेर नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र. ७५५.** पाणी पुरवठा विभागाकडील कनकुरी साठवण तलाव येथून पाणी शुध्द करून साईभक्तांना पिण्यासाठी व इतर सुविधांसाठी संस्थान परिसरात वितरीत करण्यात येते. ते पाणी पिण्यास योग्य आहे किंवा कसे? यासाठी त्या पाण्याची आपले लॅबमध्ये तपासणी केली जाते. तसेच अहमदनगर येथील शासकिय आरोग्य प्रयोगशाळेतही तपासणी केली जाते. याशिवाय एनव्हायरो लॅब नाशिक यांचीही पाणी तपासणी करणेकामी नेमणूक करण्यात आलेली होती. त्यांना जा.क्रं./एसएसएस/वशी/पा.पु./१३/२००४, दिनांक ०१/०१/२००५ अन्वये, जानेवारी २००५ ते डिसेंबर २००५ या वर्षासाठी पाणी नमून्यांची तपासणी करून ॲनॅलेसिस रिपोर्ट देणेबाबत आदेश देण्यात आलेला होता. त्याची मुदत माहे डिसेंबर २००५ अखेर संपत आहे.

त्यांना उपरोक्त आदेशान्वये प्रत्येक सॅम्पल तपासणीसाठी रूपये ६००/- मात्र व व्हिजीट प्रवास खर्च रुपये १००/- मात्र भाव देण्यात येत आहे. त्यांनी यापुढेही त्याच दराने पाणी तपासणी करण्याचे मान्य केले असून तसा फॅक्स दिनांक १६/११/२००५ रोजी आपलेकडे पाठविला आहे.

तरी एनव्हायरो लॅब, नाशिक यांना जानेवारी २००६ ते डिसेंबर २००६ पर्यंत पाणी तपासणीस म्हणून मुदतवाढ देणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**विषय नं.२६. पुस्तके/फोटो छपाई कामाचे कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.७५६.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.०७.२००५ चे सभेतील निर्णय क्र.३७६ व दि.०५.११.२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. नुसार खालील "अ" व "ब" यात दर्शविलेल्या तपशिलाप्रमाणे पुस्तके/फोटोंची छपाई करून घेणेस मान्यता देण्यात आली आहे.

**अ) पुस्तके छपाई**

| अ.नं | पुस्तकाचे नांव | भाषा | छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईसत्चरित्र | कन्नड | १०,००० | २३.०० | २,३०,०००/- |
| ०२ | साईसत्चरित्र | तेलगू | १,००,००० | २३.०० | २३,००,०००/- |
| ०३ | साईसत्चरित्र | तामिळ | १५,००० | ४०.०० | ६,००,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०४ | श्री सदगुरू साईनाथ सगुणोपासना आरती | मराठी | १,००,००० | २.०० | २,००,०००/- |
| ०५ | श्री साईस्तवन मंजरी | मराठी | २५,००० | २.०० | ५०,०००/- |
| ०६ | श्री साई रूद्राध्याय (११ अध्याय) | मराठी | ५,००० | २.०० | १०,०००/- |
| ०७ | श्री साईंचे सत्य चरित्र | मराठी | १०,००० | ६५.०० | ६,५०,०००/- |
| ०८ | श्री साईबाबांची शिकवण व तत्वज्ञान | मराठी | ५,००० | १२.०० | ६०,०००/- |
| ०९. | चिल्डेन श्रीसाईबाबा प्रथम आवृत्ती-लेखक-विकास मेहेता | हिन्दी | ५,००० | १००.०० | ५,००,०००/- |
| | | | | एकूण रूपये | ४६,००,०००/- |

**ब) फोटो**

| अ.नं | फोटोचे नांव | साईज | छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | द्वारकामाई ४ रंगात | १४"X २०" | १,००,००० | २.०० | २,००,०००/- |
| ०२ | द्वारकामाई त बसलेले बाबा ४ रंगात | १४"X २०" | १,००,००० | ३.०० | ३,००,०००/- |
| ०३ | श्री साईबाबा मुर्ती फोटो ४ रंगात | १४"X २०" | २,००,००० | २.०० | ४,००,०००/- |
| ०४ | श्री साईबाबा मुर्ती फोटो ४ रंगात | ०२"X ०३" | ५,००,००० | ०.१० | ५०,०००/- |
| ०५ | श्री साईबाबा मुर्ती फोटो ४ रंगात | ०४"X ०६" | ५०,००० | ०.२५ | १२,५००/- |
| | | | | एकूण रूपये | ९,६२,५००/- |

उपरोक्त पुस्तके/फोटोंची छपाई करून घेणेस व त्यासाठी एकूण अंदाजे रूपये ५५,६२,५००/- मात्र अपेक्षित खर्चास मंजूरी मिळाली असून, संबंधीत पुस्तके/फोटोंची छपाई करून घेणेकामी संबंधीत खालील २० निवडक प्रेसधारकांकडून कोटेशन्स मागविणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार खालील २० निवडक प्रेसधारकांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/ १३०४२/२००५ दि.१२.११.२००५ अन्वये कोटेशन पाठवून ते भरून दि.३०.११.२००५ पर्यंत जमा करणेविषयी कळविण्यात आले आहे.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.युनायटेड प्रिंटर्स,पुणे |
| ०२ | मे.अमल ऑफसेट प्रा.लि.दादर, मुंबई |
| ०३ | मे.रविक आर्टस् अॅन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा, मुंबई |
| ०४ | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. |
| ०५ | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |
| ०६ | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ०७ | मे.सुमंगल आरटेक, मुंबई |
| ०८ | मे मॅग्ना ग्रॉफिक्स (इंडिया) प्रा.लि.मुंबई. |
| ०९ | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे |
| १० | मे.प्रिंटोग्राफी फोर्ट, मुंबई |
| ११ | मे.प्रिंटमन, मुंबई |
| १२ | मे.विकास इले.(सकाळ पेपर्स) सातपूर, नाशिक |
| १३ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे |
| १४ | मे.प्रिंट पॅक बिजनेस फॉमर्स प्रा.लि. लातूर |
| १५ | मे.माणिकचंद नंदादीप पेपर प्रॉ.प्रा.लि., पुणे |
| १६ | मे.मौज प्रिंटींग ब्युरो, मुंबई |
| १७ | मे.चिराग प्रिंटर्स, मुंबई |
| १८ | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग अॅण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर |
| १९ | निर्मल ऑफसेट प्रा.लि.,नाशिक रोड. |
| २० | दि.प्रिमियर को-ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे |

त्यानुसार खालील निविदासादरकर्त्यांनी आपल्या निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.रविक आर्टस् अॅन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा, मुंबई |
| ०२. | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई |
| ०३. | मे.ब्ल्यू बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. |
| ०४. | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे |
| ०५. | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे |
| ०६ | मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,पुणे |
| ०७. | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग अॅण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर |
| ०८. | निर्मल ऑफसेट प्रा.लि.,नाशिक रोड. |
| ०९. | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडणेत आले असता निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

(अ) पुस्तके

| अ.नं. | तपशिल | मे.रविक आर्टस् अॅन्ड | मे.कमर्शियल बुक बायडींग | मे.ब्ल्यु बर्ड | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे | मे.अजय ऑफसेट | मे.महाराष्ट्र सहकारी | मे.चेरी ऑफसेट प्रिटींग अॅण्ड पॅकेजिंग | मे.निर्मल ऑफसेट | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | प्रिंटर्स प्रा. लि.वडाळा, मुंबई | वर्क्स, मुंबई | (इंडिया) प्रा.लि. पुणे. | | प्रा.लि.पुणे | मुद्रणालय,पुणे | इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर | प्रा.लि., नाशिक रोड. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | साईसत्चरित्र कन्नड ११वी आवृत्ती | --- | २७.१५ | **१८.००** | -- | २३.०१ | ३१.५५ | २५.१० | --- | २५.०० |
| ०२. | साईसत्चरित्र - तेलगू १८ वी आवृत्ती | --- | ३२.८५ | **२१.००** | --- | २६.९७ | ३८.२८ | २८.९६ | --- | ३०.०० |
| ०३. | साईसत्चरित्र-तामिळ ८ वी आवृत्ती | --- | ३०.७५ | **३२.००** | --- | ३२.०३ | ४१.९८ | ३२.६२ | --- | ३४.३५ |
| ०४. | श्री साईंचे सत्यचरित्र - मराठी ३री आवृत्ती | --- | ७९.६० | **६०.००** | ८९.८० | ७२.०० | ८९.२९ | ६५.३० | --- | ७७.०० |
| ०५. | श्री सदगुरू साईनाथ सगुणोपासना आरती-मराठी ४४ वी आवृत्ती | --- | १.९० | २.७५ | --- | १.७९ | १.९५ | **१.७०** | --- | १.९० |
| ०६. | श्री साईस्तवन मंजरी व सुमनांजली-मराठी २७ वी आवृत्ती | --- | १.७० | २.५० | --- | **१.५५** | १.६६ | १.६५ | --- | १.७५ |
| ०७. | श्री साईबाबांची शिकवण व तत्वज्ञान ३री आवृत्ती | --- | १०.४० | ९.९० | --- | **९.८३** | १..८६ | १..८५ | --- | ५९.०० |
| ०८ | श्री साई रूद्राध्याय (११ अध्याय)-मराठी | --- | २.१५ | २.८० | --- | २.६५ | २.०४ | **१.८५** | --- | ३.०० |
| ०९. | चिल्ड्रेन साईबाबा लेखक विकास मेहता-हिंदी प्रथम आवृत्ती | --- | ७०.८० | ६३.०० | --- | ६४.०० | ६८.९८ | ६०.४० | --- | **५९.००** |

(अ) फोटो

| अ.नं. | तपशिल | मे.रविक आर्टस् ॲन्ड प्रिंटर्स प्रा.लि.वडाळा, मुंबई | मे.कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | मे.ब्ल्यु बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे. | मे.बळवंत प्रिंटर्स, पुणे | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे | मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे | मे.चेरी ऑफसेट प्रिंटींग ॲण्ड पॅकेजिंग इंडस्ट्रीज प्रा.लि. सोलापूर | मे.निर्मल ऑफसेट प्रा.लि., नाशिक रोड. | मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | द्वारकामाई ४ रंगात - १४"X २०" | ३.२५ | २.४५ | २.१५ | २.३४ | २.३१ | २.४६ | **१.९९** | ३.२० | २.३५ |
| ०२. | द्वारकामाई त बसलेले कानाला हाता लावलेले बाबा ४ रंगात -१४"X २०" | ३.२५ | २.४५ | २.१५ | २.३४ | २.३१ | २.४६ | **१.९९** | ३.२० | २.३५ |
| ०३. | श्री साईबाबा मुर्ती फोटो ४ रंगात १४"X २०" | ३.२५ | २.४५ | २.१० | २.३६ | २.३१ | २.४३ | **१.९९** | ३.०५ | २.३५ |
| ०४. | श्री साईबाबा मुर्ती फोटो ४ रंगात-०२"X ०३" | --- | ०.०८ | ०.५० | --- | **०.०८** | ०.८७ | ०.१५ | ०.११ | --- |
| ०५. | श्री साईबाबा मुर्ती फोटो ४ रंगात-०४"X ०६" | --- | ०.३६ | ०.७० | --- | **०.२३** | ०.३७ | ०.२५ | ०.४८ | --- |

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील अधोरेखित निम्नतम दर मान्य करण्यात यावेत असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२७. श्री साईलीला नियतकालीकांच्या वार्षिक वर्गणीत वाढ करणेबाबत.**

**निर्णय क्र.७५७.** मुंबई कार्यालयाकडील दि.२८.१०.२००५ रोजीचे फॅक्स पत्रानुसार संस्थान प्रकाशित श्री साईलीला (इंग्रजी-हिंदी) व साईलीला मराठी नियतकालिकाचे वर्तमान सदस्यसंख्या व जमा-खर्च तक्ता व तत्संबंधीत साईलीला नियतकालिकांच्या वर्तमान असंतुलीत जमा-खर्चात संतुलन साधनेसाठी खालील दर्शविलेप्रमाणे तपशिलात्मक अहवाल सादर केला आहे.

अ) श्री साईलीला अंक मराठी सदस्य संख्या व तत्संबंधीत जमा-खर्च :- यात श्री साईलीला कार्यालयाकडील अहवालाद्वारा श्री साईलीला वार्षिक सदस्य संख्या आजीवन सदस्य संख्या व परदेशस्त वार्षिक सदस्य संख्या मिळून एकूण ११,१७१ सभासद संख्या असल्याचे कळवून याबाबत सध्याच्या वर्गणीनुसार वर्षभरातील एकूण जमा वर्गणी रुपये ५,५८,५००/- मात्र जमा असून त्यासाठी एकूण वार्षिक खर्च यात छपाई, टपाल, मानधन,एन्व्हलप्स, स्टीकर्स खर्च, कॉम्प्युटरप्रिंट आऊटसाठी टोनर/पेपरादि खर्च,हमाली खर्च इत्यादी मिळून रुपये ११,६९,०३२/- इतका खर्च असून तो जमेपेक्षा रुपये ६,१०,५३२/- ने जास्त असल्याचे दिसून येते. सदरची वर्षभरातील भरुन काढणेसाठी तसेच वर्तमान असंतुलीत जमाखर्चात संतुलन साधनेसाठी वार्षिक वर्गणी प्रत्येकी रुपये १०५/- ठेवण्यात यावी अशी साईलीला कार्यालयाची सूचना आहे.वार्षिक वर्गणी रुपये १०५/- केल्यास संभाव्य जमा वर्गणी रुपये ११,७३,८५०/- इतकी होणार असून, त्यासाठी खर्च रुपये ११,६९,२४७/- इतका होईल यामुळे जमा रकमेतून खर्च वजा जाता वर्षभरातील संभाव्य एकूण जमा रक्कम रुपये ४,६०३/- मात्र एवढी शिल्लक राहते.

ब) श्री साईलीला अंक (हिंदी-इंग्रजी) सदस्य संख्या व जमा-खर्च :- याबाबत श्री साईलीला कार्यालयाकडील तपशिलात्मक अहवालानुसार वार्षिक सदस्य, आजीवन सदस्य, परदेशस्य वार्षिक सदस्य मिळून एकूण सदस्य संख्या १६,५६९ इतकी असून,चालू वर्गणीनुसार रुपये ८,२५,५५०/ इतकी रक्कम जमा होत असून,यासाठी वार्षिक खर्च यात छपाई, टपाल, मानधन,एन्व्हलप्स, स्टीकर्स खर्च, कॉम्प्यूटरप्रिंट आऊटसाठी टोनर/पेपरादि खर्च,हमाली खर्च इत्यादी मिळून एकूण रुपये १७,००,७१८/- इतका खर्च होत असून तो जमेपेक्षा रुपये ८,७५,१६८/- ने जास्त असल्याचे दिसून येते. सदरची वर्षभरातील रकमेची तूट भरुन काढणेसाठी तसेच वर्तमान असंतुलीत जमाखर्चात संतुलन साधनेसाठी वार्षिक वर्गणी प्रत्येकी रुपये १०५/- ठेवण्यात यावी अशी साईलीला कार्यालयाची सूचना आहे. वार्षिक वर्गणी रुपये १०५/- केल्यास संभाव्य जमा वर्गणी रुपये १७,९१,६५५/- इतकी होणार असून, त्यासाठी एकूण खर्च रुपये १७,११,८१९/- इतका होईल यामुळे जमा रकमेतून खर्च वजा जाता वर्षभरातील संभाव्य एकूण जमा रक्कम रुपये ७९,८३६/- मात्र एवढी शिल्लक राहते.

तरी वरील ''अ'' व ''ब'' यात दर्शविल्याप्रमाणे श्री साईलीला (मराठी) व श्री साईलीला (हिंदी-इंग्रजी) नियतकालीकांच्या वर्तमान असंतुलीत जमा-खर्चात संतुलन साधण्यासाठी वार्षिक वर्गणी प्रत्येकी रुपये १०५/- ठेवल्यास होणा-या जमेतून खर्च वजा जाता खालील ''अ'' व ''ब'' यात दर्शविलेप्रमाणे रक्कम शिल्लक राहील.

तरी वरील ''अ'' व ''ब'' नुसार श्री साईलीला संभाव्य वार्षिक वर्गणी रुपये १०५/- मात्र ठेवल्यास जमा होणाऱ्या एकूण रकमेतून वर्षभरातील एकूण साधारण खर्च वजा जाता खालील प्रमाणे एकूण संभाव्य रक्कम जमा रहात असल्याचे दिसून येते.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) श्री साईलीला (मराठी) करीता वर्षभरातील संभाव्य जमा | | रु. | ४,६०३/- |
| ब) श्री साईलीला (हिंदी-इंग्रजी) करीता वर्षभरातील संभाव्य जमा | + | रु. | ७९,८३६/- |
| | | | ---------------- |
| दोन्ही आवृत्तींची मिळून वर्षभरातील संभाव्य एकूण जमा | | रु. | ८४,४३९/- |

**क) श्री साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी अंक विक्री**

| अ.नं | तपशील | छपाई दर रुपये पैसे | अंकात ४ पानाने घट किंवा वाढ झाल्यास प्रती प्रत छपाई दर रुपये पैसे | **संस्थानद्वारा २०% वाढ धरुन संस्थान प्रती अंक विक्री दर रुपये पैसे** |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला अंक मराठी ३२ +४ पाने =३६ पाने | ११.६८ | १.३७ | **१५.००** |
| ०२ | साईलीला अंक हिंदी/इंग्रजी ३२+४=३६ पाने | ११.६८ | १.३७ | **१५.००** |
| ०३ | दसरा विशेषांक मराठी ६४+४=६८ पाने | २०.०३ | १.३७ | **२५.००** |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी ६४+४ =६८ पाने | २०.०३ | १.३७ | **२५.००** |

वर दर्शविलेल्या तपशिलानुसार श्री साईलीला नियतकालीकांच्या वर्तमान असंतुलीत जमा-खर्चात संतुलन साधनेसाठी तसेच श्री साईलीला व्दैमासिकाचे नवीन स्वरुप त्यासाठी वापरणेत येणारा कागद यांचा खर्च वाढला आहे. जवळजवळ त्यात दुपटीने वाढ झालेली आहे.यास अनुसरुन उपरोक्त

उल्लेखित ''अ'' व ''ब'' यात दर्शविल्याप्रमाणे दोन्ही आवृत्त्यांकरीता प्रत्येकी वार्षिक वर्गणी रु.१०५/- मात्र,ठेवणे ऐवजी '' ना नफा ना तोटा '' या तत्वावर जरी व्दैमासिक देणे असलेस तरी वार्षिक वर्गणी रुपये ५०/- वरुन १००/- करणे त्याचप्रमाणे आजीवन सदस्य वर्गणी रुपये १०००/- वरुन १,५००/- करणे आवश्यक आहे. तसेच श्री साईलीला व्दैमासिक परदेशाकरीता एका वर्षासाठी वर्गणी रुपये १,०००/- मात्र आहे. याबाबत साईलीला व्दैमासिकाच्या वर्गणीच्या कालावधीत वाढ होऊन एका वर्षाऐवजी ३ व ५ वर्षांसाठी वाढविल्यास भक्तांना सोयीचे होईल अशी सुचना आहे.सध्या परदेशासाठी वार्षिक वर्गणी रुपये १,०००/- आहे.त्यात वाढ करु नये अशी साईलीला कार्यालयाची सुचना आहे.त्या अनुरोधाने तीन व पाच वर्षाची वर्गणी ठेवता येईल.असे मत आहे. याचबरोबर वरील ''क'' यात दर्शविलेप्रमाणे साधारण दोन्ही आवृत्त्यांची सर्वसाधारण अंकांची किरकोळ विक्रीची किंमत रुपये १५/- व श्री साईलीला दसरा दिवाळी विशेषांकांची किंमत रुपये २५/-ठेवण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या असलेल्या साईलीलाचे वार्षिक वर्गणीत तूर्त वाढ करु नये असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षका,मुंबई कार्यालय/प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२८. टी.शैलेजा, हैद्राबाद लिखित "मातृ साई" हे तेलगू भाषेतील पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत.**

**निर्णय क्र.७५८.** टी.शैलेजा, हैद्राबाद यांनी त्यांचे दि.२८.०२.२००५ रोजी दाखल झालेले पत्राअन्वये त्यांचेद्वारा लिखीत " मातृ साई " हे तेलगू भाषेतील पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेसाठी दाखल केले आहे.

टी.शैलेजा, हैद्राबाद लिखीत " मातृ साई " हे तेलगू भाषेतील पुस्तक गोष्टीरूप असून, ते हेमाडपंतांच्या साईसत्चरितावर अधारित असल्याचे कळविले आहे. सदरचे पुस्तक हे गोष्टीरूप असल्याने ते लहान मुलांसाठी अधिक उपयुक्त असल्याचे कळविले आहे. सदरचे पुस्तक हे ११ भागात विभागलेले असून, पुस्तकातील प्रत्येक भागातील गोष्टींचा सार हा साईसत्चरिताचे आधारे घेण्यात आला असून, तो लहान मुलांसाठी खुपच उपयुक्त ठरणार असल्याने सदरचे पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित केलेस त्याचा तेलगू भाषिक लहान मुलांसाठी चांगलाच उपयोग होईल असे मत त्यांनी प्रकट केले आहे.

टी.शैलेजा, हैद्राबाद लिखीत " मातृ साई " हे तेलगू भाषेतील पुस्तक प्रकाशनास योग्य असलेबाबत डॉ. के. निलकंठम, असोसिएट प्रोफेसर संस्कृत डिपार्टमेंट, ओस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद यांचेकडून प्राप्त झालेले शिफारस पत्र या पत्रासोबत अवलोकनार्थ जोडले आहे. सदरचे शिफारस पत्रात टी.शैलेजा, हैद्राबाद ह्या साईभक्त असून, उपरोक्त पुस्तकात लिहीलेल्या श्री साईबाबांचे जीवनावर आधारित असलेल्या संग्रहीत गोष्टी ह्या तेलगू भाषेत चांगल्या प्रकारे वर्णील्या असून, कौतुकास्पद आहेत असा उल्लेख केला आहे.

सध्या संस्थानद्वारा प्रकाशित मुलांचे साईबाबा- हे तेलगू भाषेतील गोष्टीरूप रेखांकित चित्र असलेले पुस्तक विक्रीस उपलब्ध आहे.

टी.शैलेजा, हैद्राबाद यांनी " मातृ साई " हे तेलगू भाषेतील पुस्तक प्रकाशनाबाबतचे हक्क संस्थानला देण्यास तयार असलेबाबत पत्राद्वारे कळविले आहे.

तरी टी.शैलेजा, हैद्राबाद लिखीत " मातृ साई " हे मुलांसाठी असलेले तेलगू भाषेतील पुस्तक हे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत प्रकाशित करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, टी.शैलेजा, हैद्राबाद लिखीत " मातृ साई " हे पुस्तक श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत प्रकाशित करणेपूर्वी ते पुणे विद्यापीठातून तपासणी करुन घेऊन त्याचा अहवाल व्यवस्थापन समितीचे सभेसमोर ठेवण्यात यावा त्यानंतर निर्णय घेण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२९. तेलगू भाषेतून श्री साईलीला प्रकाशित करणे बाबत.**

**निर्णय क्र.७५९.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.०९.२००५ चे सभेतील विषय नं.३५ निर्णय क्रमांक ५११ नुसार श्री साईलीला द्वैमासिक तेलगू भाषेतून प्रकाशित करणेबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

श्री.एम्.कृष्णकुमार, ॲडव्होकेट, सिकंदराबाद यांनी त्यांचे दि.१८.०४.२००५ चे पत्राद्वारे श्री साईलीला द्वैमासिक संस्थानने तेलगू भाषेतून प्रकाशित करणेसाठी प्रस्ताव सादर केला असून,तत्संबंधीत सर्वस्वी कार्यवाहीची संपूर्ण जबाबदारी ते स्वीकारण्यास तयार असून, त्यात ते निश्चितपणे यशस्वी होतील असा आत्मविश्वास त्यांनी प्रकट केला आहे.यासाठी मासिकाचे संपादन, छपाई,प्रुफरिडींग, सभासद नोंदणी, अंकाचे वितरण अशा कामासाठी श्री.एम्.कृष्णकुमार, ॲडव्होकेट, सिकंदराबाद मार्गदर्शन व मदत करणेस तयार आहेत.श्री साईबाबांचे भक्त आंध्र प्रदेशात मोठ्या संख्येने असल्याने श्री साईलीला मासिक तेलगू भाषेतून प्रकाशित केल्यास त्याचा तेलगू भाषिक भक्तांना चांगला फायदा होऊ शकेल.

वरीलप्रमाणे साईलीला तेलगू भाषेतून प्रकाशित करणेकामीची संपूर्ण जबाबदारी श्री.एम्.कृष्णकुमार, ॲडव्होकेट सिकंदराबाद यांनी स्वीकारण्याची तयारी दर्शविली असल्याने, साईलीला तेलगू भाषेतून प्रकाशित करण्याच्या कार्यवाहीसाठी संपादक म्हणून त्यांचे नियुक्ती करणेसाठी तसेच त्यांना सदर कामाचे मानधनाबाबत चर्चेसाठी समक्ष बोलावून निर्णय होणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत श्री.एम्.कृष्णकुमार, ॲडव्होकेट सिकंदराबाद हे सभेपूढे उपस्थित होते त्यांचेशी व्यवस्थापन समितीचे सदस्यांनी चर्चा केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईलीला तेलगू भाषेत प्रकाशित करणेकामी तेलगू प्रकाशकांशी संपर्क करणेत यावा व या विषयी संबंधी चर्चा करण्यात यावी. त्या बाबतचा सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३०. श्रीसाईबाबा समाधीचे बाजूने असलेल्या मार्बलचे पट्टीला चांदीकाम करणेबाबत.**

**निर्णय क्र.७६०.** समाधी मंदीरमध्ये असलेल्या साईबाबांच्या समाधीचे बाजूने समाधीवरील स्नानाचे पाणी बाजूला पसरु नये म्हणून मार्बलची ८० इंच लांब व ४० इंच रुंद व २.५ इंच जाड या आकाराची मार्बलची पट्टी बसविण्यात आलेली आहे.

श्री.गिरधर सोनी, श्रीसाईनाथ ज्वेलर्स, नसरुलागंज, जि.सिहोर, मध्यप्रदेश यांनी दिनांक २२.७.२००५ च्या पत्राने सदरील मार्बलच्या पट्टीला चांदीचा पत्रा देणगीदाखल बसवून देण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

समाधीच्या बाजूने असलेल्या मार्बल पट्ट्यांना चांदीचे काम करावयाचे झाल्यास याकामी अंदाजे १० किलो चांदी लागेल. सदर चांदी व मजूरी काम असे दोन्ही मिळून एकूण अंदाजे रक्कम रुपये १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) पर्यंत खर्च अपेक्षित असून हा सर्व खर्च श्री. गिरधर सोनी हे करणार आहेत, तरी त्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग)

**विषय नं.३१. १५० ग्रॅम वजनाचे लाडूस मागणी नसल्याने बंद करणेबाबत.**

**निर्णय क्र.७६१.** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.६/८/२००५ मधील आयत्या वेळेचा विषय क्र.१७ वरील निर्णय क्र.४६६ नुसार ५० ग्रॅमचे ३ व १५० ग्रॅमचा १ लाडू बनवून प्रति पॅकेट रु.१०/- प्रमाणे विक्रीसाठी ठेवण्यात आलेले आहेत. त्यानुसार माहे ऑगस्ट २००५ व सप्टेंबर २००५ मध्ये खालीलप्रमाणे लाडू विक्री झालेली आहे.

| अ.नं. | महिना | ५० ग्रॅमचे ३ नुसार | १५० ग्रॅमचा १ नुसार |
|---|---|---|---|
| ०१. | ऑगस्ट २००५ | १७,५३,५४२ | १,८०० |
| ०२. | सप्टेंबर २००५ | १३,७४,८५५ | १,५०० |

वरीलप्रमाणे लाडू विक्रीचे अवलोकन करता ५० ग्रॅमचे लाडूचे प्रमाणात १५० ग्रॅम लाडूंचे विक्रीचे प्रमाण अत्यंत नगण्य असल्याचे दिसून येते. साईभक्तांचे माहितीसाठी १५० ग्रम लाडू पॅकेटबाबत माहितीचे मजकूराची संगणकावर प्रिंट काढून लाडू विक्री काउंटरवर लावण्यात आलेली आहे. तरीही १५० ग्रॅम वजनाचा १ लाडू पॅकेटला मागणी अत्यल्प आहे.

वरीलप्रमाणे २ महिन्यांमध्ये १५० ग्रॅमचे लाडू बनवून विक्रीसाठी ठेवले असता अशी अडचण आलेली आहे की, सदर लाडूस मागणी नसल्यामुळे शिल्लक रहातात. ५० ग्रॅमचे मानाने १५० ग्रॅमचा लाडू लवकर सुकत नाही. १५० ग्रॅमचे लाडू आतमध्ये ओले रहातात. त्यामुळे ५० ग्रॅमचे लाडूचे मानाने १५० ग्रॅमचे लाडू लवकर खराब होतात. अशाप्रकारे खराब लाडूंची विक्री झाल्यास भक्तांना त्रास होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरीता १५० ग्रॅम लाडूचे विक्रीचे अत्यल्प प्रमाण व संभाव्य त्रास विचार करता ते तयार करणेचे काम बंद करण्यात यावे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रसादालय प्रमुख)

**विषय नं.३२. सौर उर्जा प्रकल्पाकरीता स्वतंत्र पाणी शुध्दीकरण यंत्रणा खरेदी करुन बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.७६२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.३३. रुग्णालय - संगणकीय जाळयाची उभारणीसाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर चर्चा-तथा-वाटाघाटीअंती निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.७६३. (अ)** मा. व्यवस्थापन समितीच्या विविध निर्णयांनुसार संस्थानच्या वैद्यकीय सेवांचे विभाजन करुन सध्याचे जनरल हॉस्पीटल ( धर्मशाळा इमारतीमध्ये ) व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल (नुतनीकरण झालेल्या इमारतींमध्ये) असे दोन विभाग होत आहेत. रुग्णांना अधिक कार्यक्षमतेने उच्च दर्जाच्या वैद्यकिय सुविधा मिळणेच्या दृष्टीने या दोन्ही रुग्णालयांमध्ये सर्वंकष संगणकीय व्यवस्थापन प्रणाली (Comprehensive-Computarised Hospital Management System ) राबविणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

दिनांक १३ मार्च,२००५ चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रमांक १०१ अन्वये रुग्णालयासाठी संगणक कार्यप्रणाली तयार करणेसाठी Sofcript Systems & Services LTd.,

Mumbai यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने त्यांचेबरोबर दिनांक २५ ऑक्टोबर,२००५ रोजी करारनामा करणेत आलेला आहे. सॉफ्स्क्रिप्ट यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या रुग्णालय संगणक कार्यप्रणालीचे प्राथमिक प्रात्यक्षिक रुग्णालय विभागाकडे दाखविण्यांत आलेले असून, आपल्या आवश्यकतेनुसार सॉफ्टवेअरमध्ये बदल करणेचे कामकाज सुरु आहे.

**(ब)** श्री साईनाथ रुग्णालय व सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये संगणक कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यासाठी संगणक जाळयाची (NETWORKING) उभारणी करणे आवश्यक आहे. दिनांक १३ मार्च,२००५ चे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रमांक ९५ (ब) अन्वये हार्डवेअर व नेटवर्कींग साहित्य खरेदीसाठी अंदाजे रक्कम रुपये ६५,१०,१००/- मात्र ढोबळ खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेली आहे. त्यास अनुसरुन, मा.कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २७ ऑक्टोबर,२००५ व दिनांक १५ नोव्हेंबर,२००५ चे माहिती तंत्रज्ञान विभागाचे मंजूर केलेल्या टिपणीनुसार हार्डवेअर व नेटवर्कींग साहित्य खरेदी व संगणकीय जाळे उभारणीसाठी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत, स्थानिक मानद तांत्रिक सल्लागार श्री.विजय नायडू, कोपरगांव व रुग्णालय प्रकल्पासाठीचे तज्ञ तांत्रिक सल्लागार श्री.दिपक शेळके, मुंबई याचे मार्गदर्शनाखाली विहित पध्दतीने निविदा तयार करण्यात आलेल्या होत्या. त्यानंतर साहित्य खरेदी व संगणक जाळे उभारणीसाठी इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रांमध्ये दिनांक ०७ नोव्हेंबर,२००५ ते १३ नोव्हेंबर, २००५ अखेर जाहिरात प्रसिध्दीस देण्यात आलेली होती. या जाहिरातीचा थोडक्यात गोषवारा पुढीलप्रमाणे :

| | | |
|---|---|---|
| ०१ | कोऱ्या निविदा विक्री | दिनांक १४ नोव्हेंबर,२००५ ते दिनांक २१ नोव्हेंबर, २००५ अखेर सायंकाळी ५ वाजेपर्यन्त. |
| ०२ | सिलबंद निविदा स्वीकारणे | दिनांक ३० नोव्हेंबर,२००५ अखेर सायंकाळी ५ वाजेपर्यन्त. |
| ०३ | को-या निविदेची किंमत | रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) |
| ०४ | निविदेसोबत भरावयाची बयाणा रक्कम | रुपये १,००,००० /- (रुपये एक लाख ) |

उपरोक्त जाहिरातीस अनुसरुन एकुण २८ इच्छुक निविदाधारकांनी कोरे निविदा अर्ज विकत घेतले होते. या सर्व इच्छुक निविदाधारकांची तांत्रिक पूर्व प्राथमिक बैठक मा.कार्यकारी अधिकारी व इतर संस्थान अधिकाऱ्यांचे उपस्थितीत दिनांक २४ नोव्हेंबर,२००५ रोजी शिर्डी येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस एकुण ११ इच्छुक निविदाधारकांचे प्रतिनिधी हजर होते.

**(क)** दिनांक २४ नोव्हेंबर,२००५ रोजी पूर्व प्राथमिक बैठकीस हजर असणारे इच्छुक निविदाधारकांचे बैठकीत, निविदाधारकांच्या तांत्रिक व अन्य बाबींच्या शंकाचे निरासन स्थानिक मानद तांत्रिक सल्लागार श्री.विजय नायडू व रुग्णालय प्रकल्पाचे तज्ञ तांत्रिक सल्लागार श्री. दिपक शेळके यांनी केले. तसेच हजर असणाऱ्या इच्छुक निविदाधारकांच्या प्रतिनिधींना रुग्णालय विभागाचे प्रत्यक्ष कार्यस्थळाची पाहणी करण्यास सांगण्यात आले. या तांत्रिक पूर्व-प्राथमिक बैठकीत उपस्थित इच्छुक निविदाधारकांनी सादर केलेल्या तांत्रिक कागदपत्रांचा अभ्यास करुन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

वर निर्देशीत केल्यानुसार, तांत्रिक पूर्व प्राथमिक बैठकीस जे ११ इच्छुक निविदाधारक हजर होते, त्यापैकी एकूण ०३ निविदाधारकांनी दिनांक ३० नोव्हेंबर,२००५ अखेर सिलंबद निविदा सादर केलेल्या आहेत. तसेच, उपरोक्त तांत्रिक पूर्व प्राथमिक बैठकीस हजर नसणाऱ्या ०१ निविदाधारकानेही सिलबंद निविदा सादर केलेली आहे. त्यांचा तपशील थोडक्यात पुढील प्रमाणे :

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव | शेरा |
|---|---|---|
| ०१ | ALLIED DGITAL SERVICES PVT.LTD., Mumbai | तांत्रिक पूर्व-प्राथमिक बैठकीस हजर व सिलबंद निविदा मुदतीत सादर. |
| ०२ | UMMA VISION, HYDERABAD | तांत्रिक पूर्व-प्राथमिक बैठकीस गैरहजर असल्याने तांत्रिक माहिती घेता आलेली नाही. |
| ०३ | TEAM ONE COMPUTER (INDIA) PVT.LTD., Mumbai | तांत्रिक पूर्व-प्राथमिक बैठकीस हजर व सिलबंद निविदा मुदतीत सादर. |
| ०४ | MULTIPLE ZONES INDIA PVT.LTD., Mumbai | तांत्रिक पूर्व-प्राथमिक बैठकीस हजर व सिलबंद निविदा मुदतीत सादर. |

वरील एकुण ०४ सिलबंद निविदांपैकी, तांत्रिक पूर्व प्राथमिक बैठकीस हजर असलेल्या व विहित मुदतीत सादर करण्यांत आलेल्या अ.क्र. ०१, ०३ व ०४ च्या सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उघडणेस मान्यता मिळणेस विनंती आहे. अ.क्र. ०२ चे निविदाधारक तांत्रिक पूर्व प्राथमिक बैठकीस गैरहजर असल्याने तसेच त्यांचेकडून तांत्रिक माहिती उपलब्ध न झाल्याने, संबंधीताची सिलबंद निविदा उघडून त्यातील फक्त बयाणा रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट काढून, संबंधीतांस परत पाठविणेस मान्यता मिळणेस विनंती आहे.

**(ड)** उपरोक्त परिच्छेद क मध्ये नमुद केलेल्या एकुण **०३** निविदाधारकांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अंतिम निर्णय घेणेकामी चर्चा-तथा-वाटाघाटीसाठी निमंत्रित करण्यात आलेले आहे. या उपस्थित असणाऱ्या निविदाधारकांशी चर्चा-तथा-वाटाघाटी करुन अंतिम निर्णय होणेस विनंती आहे.

**(इ)** श्री साईनाथ रुग्णालय व सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलसाठी संगणक कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यासाठी, संगणक जाळे हे एकेमेकांशी सर्व्हरच्या साहाय्याने जोडण्यात येणार आहे. सदर

सर्व्हरकरीता सुपर स्पेशालीटी हॉस्पीटलमध्ये तळघरातील एक खोली निवडण्यात आली असून, सर्व्हर रुम तयार करण्याची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत करणेस मान्यता घेण्यात आलेली आहे. या सर्व्हर रुममध्ये सर्व्हर ठेवण्यासाठी अद्ययावत अशी मांडणी करावी लागणार आहे. या खोलीमध्ये यदाकदाचित पाणी, धुळ, केरकचरा येऊन, सर्व्हरचे अथवा इतर अनुषंगिक तांत्रिक साहित्याचे नुकसान होऊ नये यासाठी साधारणतः दिड फुट उंचीचे Raisefloor तयार करावे लागणार आहे. या सर्व्हर रुमची साईज अंदाजे १५ फुट बाय १५ फुट (२२५ चौरस फुट) आहे. Raisefloor बनविणेचा दर प्रती चौरस फुटास अंदाजे रक्कम रुपये ४२५/- मात्र असून, ही सर्व्हर रुम (अंदाजे २२५ चौरस फुट) Raisefloor बनविणेसाठी अंदाजे रक्कम रुपये १,००,०००/- मात्र खर्च अपेक्षीत आहे. Raisefloor चे काम उपरोक्त परिच्छेद ड मध्ये निर्देशीत ज्या निविदाधारकांची निविदा अंतिम मान्य होईल, त्यांचेकडून प्रचलित बाजारभावानुसार योग्य दर अदा करुन काम पूर्ण करुन घेता येईल. यासाठी येणारे योग्य त्या खर्चास ही मान्यता मिळणेस विनंती.

उपरोक्त परिच्छेदांमध्ये नमुद केलेनुसार, रुग्णालयासाठी संगणकीय जाळे उभारणी व कार्यान्वीकरण करणेसाठीचे प्राप्त झालेल्या निविदांवर (परिच्छेद क व ड नुसार) चर्चा-तथा-वाटाघाटीअंती निर्णय होणेस व परिच्छेद इ मध्ये नमुद केलेप्रमाणे सर्व्हर रुमसाठी Raisefloor बनविणेस व त्यासाठी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

निविदाधारकांनी सादर केलेल्या निविदा आजचें सभेपुढे उघडण्यात आले असता निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव | ब्रॅण्ड | निविदेत देऊ केलेली एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | ALLIED DGITAL SERVICES PVT.LTD., Mumbai | IBM | 1,18,86,030.00 |
| ०२ | TEAM ONE COMPUTER (INDIA) PVT.LTD., Mumbai | HP | 1,30,90,845.00 |
| ०३ | MULTIPLE ZONES INDIA PVT.LTD., Mumbai | IBM | 1,42,75,000.00 |

यावर सविस्तर चर्चा होऊन, गुणवत्ता, दर्जा व संगणकीय क्षेत्रातील कामाचा अनुभव यांचा सर्वांगीण विचार होऊन ALLIED DIGITAL SERVICES PVT.LTD.,Mumbai यांची रु. १,१८,८६,०३०.०० या निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन, त्यांना रुग्णालयासाठी संगणकीय जाळे उभारण्याचा कार्यादेश देण्यात यावा, त्याचप्रमाणे संगणकीय सर्व्हर रुममध्ये आवश्यक असणारे Raisefloor चे काम स्वीकृत निविदाधारक ALLIED DIGITAL SERVICES PVT. LTD., Mumbai यांचेकडून करुन घेणेस व याकामी रुपये १ लाख पर्यन्तचे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाने मा.कार्यकारी अधिकारी यांना सादर केलेल्या दिनांक १५ नोव्हेंबर,२००५ च्या मंजूर केलेल्या टिपणीप्रमाणे रुग्णालयाचे संगणकीय जाळ्याची उभारणीसाठी रुपये १.१९ कोटीच्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**विषय नं.३४. ANTI VIRUS पॅकेज खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.७६४.** मा.व्यवस्थापन मंडळाचे ई-टेम्पल संदर्भीत विविध निर्णयांनूसार कार्यालयीन संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संस्थान परिसरातील विविध कार्यालये, काऊंटर्स इ. एकमेकांशी जोडणारे संगणकीय जाळे आणि २००० लाईन्स क्षमतेची अद्ययावत अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा यांची उभारणी व कार्यान्वीकरण करणेकामी अनुक्रमे मे. युनिकॉम इंफोटेल प्रा.लि., मुंबई व सिमेन्स इंडिया लि., मुंबई यांना कार्यादेश देण्यात आलेले होते. कार्यालयीन संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संस्थानचे विविध परिसर (Campuses) एकमेकांना O.F.C. व्दारे जोडले गेले असून, त्यावरच दूरध्वनी यंत्रणाही कार्यान्वीत करण्यात आली आहे.

कार्यालयीन संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संस्थानचे विविध विभाग उदा. देणगी कार्यालये, खोली वाटप कार्यालये, प्रशासकीय कार्यालये आदि. ठिकाणी संगणके माहिती-तंत्रज्ञान विभागातील दोन सर्व्हरच्या सहाय्याने एकमेकांशी जोडण्यात आलेले आहेत. साधारणतः ही संख्या ११०/११५ च्या दरम्यान आहे. विविध विभागांतून वापरण्यात येणाऱ्या सीडी फ्लॉपी यांमुळे संगणक, सर्व्हर यांमध्ये, VIRUS येवून सर्व संगणकीय जाळे बंद पडण्याची शक्यता आहे. यासाठी सुरक्षिततेचा उपाय म्हणून NORTON ANTI VIRUS पॅकेज वापरण्यात येत आहे. परंतु; सदरील ANTI VIRUS पॅकेज हे कालबाह्य झालेले असल्यामुळे, नव्याने येणारे VIRUSES संगणकातून काढता येत नाही. यासाठी सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या ANTI VIRUS पैकी TRAEND MICRO ANTI VIRUS ५० युझरचे पॅकेज खरेदी करावे, असे नम्र मत आहे. सदरील ANTI VIRUS पॅकेज खरेदी करणेकामी अंदाजे रुपये १,९०,०००/- (कर अतिरिक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरील पॅकेज विहीत पध्दतीने दरपत्रके मागवून खरेदी करता येईल.

तरी, उपरोक्त प्रमाणे TRAEND MICRO ANTI VIRUS पॅकेज खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रुपये १,९०,०००/- (कर अतिरिक्त) मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, TRAEND MICRO ANTI VIRUS पॅकेज नामांकित कंपन्यांकडून कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,९०,०००.०० (कर अतिरिक्त) चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी विभागप्रमुख)

**विषय नं.३५. भक्तनिवासस्थानकडील (५०० रुम) उपहारगृह चालविणेकामी आलेल्या निविदा उघडून निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.७६५.** भक्तनिवासस्थान (५०० रुम्स) येथील इमारतीत असलेले उपहारगृह चालविणेकरीतां परवाना प्राप्ती साठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन फीच्या देकाराबाबत निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

याकामी खालील निविदासादरकर्त्यांनी आपल्या निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | श्री.एस.गोपीचंद, हैद्राबाद |
| ०२. | श्री.डि. रविंद्र, हैद्राबाद |
| ०३. | भगवती केटर्स, मुंबई |
| ०४. | शिवालय केटर्स, मीरा रोड पूर्व जि.ठाणे |
| ०५. | श्री.साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि.,शिर्डी |

उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी सादर केलेल्या निविदा आजचे सभेपुढे मा.विश्वस्तांचे उपस्थितीत उघडण्यात आल्या. या निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटी करण्याकरीता उपस्थित रहाणेबाबत कळविण्यात आले होते. उपस्थित निविदासादरकर्त्यांशी आजचे सभेत चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्या असता त्यांनी पुढीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर प्रति माह रुपये | वाटाघाटीनंतरचे दर प्रति माह रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.एस.गोपीचंद, हैद्राबाद | ३,००,००६.०० | ३,००,००६.०० |
| ०२. | श्री. राधाकृष्ण के शेट्टी, पुणे | धर्मशाळेसाठी | ---- |
| ०३. | श्री.डि. रविंद्र, हैद्राबाद | ३,६९,९९९.०० | ३,६९,९९९.०० |
| ०४. | भगवती केटरर्स, मुंबई | ५,९१,०००.०० | **६,०८,५००.००** |
| ०५ | जया कृष्णा शेट्टी, पुणे | धर्मशाळेसाठी | ---- |
| ०६. | शिवालय केटरर्स, मीरा रोड पूर्व जि.ठाणे | ६,००,५५१.०० | ६,००,५५१.०० |
| ०७. | श्री.साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को ऑप. सोसायटी लि.,शिर्डी | ४,५४,५००.०० | ४,५४,५००.०० |

भक्तनिवासस्थान (५०० रुम्स) इमारतीसाठी उपरोक्तप्रमाणे निविदासादरकर्त्यांनी दिलेल्या दराचा विचार करता अ.नं.४ मे.भगवती केटरर्स, नवी मुंबई, यांनी रुपये ६,०८,५००.०० प्रतिमाह ही उच्चतम परवाना फी देऊ केलेली आहे. तथापि सदरहू विषय तूर्त स्थगित ठेवण्यात यावा व सध्या साईभक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी असल्याने पूर्वीचे ठेकेदार श्री डी.रविंद्र, हैद्राबाद यांना सध्याचेच आहे त्या अटी शर्तीवर दोन महिन्यांसाठी (फेब्रुवारी,२००६ अखेर ) मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक, भक्तनिवासस्थान विभाग)

**विषय नं.३६. धर्मशाळा विभागाकडील (२०० रुम) (अ)उपहारगृह, (ब) गादी चादर (क) शौचालय व स्नानगृह चालविणेकामी आलेल्या निविदा उघडून निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.७६६.(अ)उपहारगृह-** धर्मशाळा (२०० रुम्स) इमारती येथील कॅंटीन इमारतीत असलेले उपहारगृह चालविणेकरीतां परवाना प्राप्ती साठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन फीच्या देकाराबाबत निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

याकामी खालील निविदासादरकर्त्यांनी आपल्या निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | श्री.साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि.,शिर्डी |
| ०२. | डी. रविंद्र, हैद्राबाद |
| ०३. | भगवती केटरर्स, मुंबई |
| ०४. | शिवालय केटरर्स, मीरा रोड (पूर्व ) जि.ठाणे |
| ०५. | जया कृष्णा शेट्टी, पुणे |
| ०६. | श्री. राधाकृष्ण शेट्टी, पुणे |

उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी सादर केलेल्या निविदा आजचे सभेपुढे मा.विश्वस्तांचे उपस्थितीत उघडण्यात आल्या. या निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटी करण्याकरीता उपस्थित रहाणेबाबत कळविण्यात आले होते. उपस्थित निविदासादरकर्त्यांशी आजचे सभेत चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्या असता त्यांनी पुढीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर प्रति माह रुपये | वाटाघाटीनंतरचे दर प्रति माह रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि.,शिर्डी | २१,६००.०० | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२. | डि. रविंद्र, हैद्राबाद | ४१,९९९.०० | अनुपस्थित |
| ०३. | भगवती केटरर्स, मुंबई | २७,१००.०० | २७,१००.०० |
| ०४. | शिवालय केटरर्स, मीरा रोड (पूर्व )जि.ठाणे | ५१,५५१.०० | **५१,५५१.००** |
| ०५. | जया कृष्णा शेट्टी, पुणे | ४१,६६६.०० | ४२,०००.०० |
| ०६. | श्री. राधाकृष्ण शेट्टी, पुणे | रक्कम लिहीलेली नाही | अपात्र |

धर्मशाळेच्या एका इमारतीसाठी उपरोक्तप्रमाणे निविदासादरकर्त्यांनी दिलेल्या दराचा विचार करता मे.श्री शंकर शेट्टी,प्रो.शिवालया केटरर्स,ठाणे यांनी रुपये ५१,५५१/- प्रतिमाह ही उच्चतम परवाना फी देऊ केलेली असल्याने त्यांची उच्चतम दराची निविदा एक वर्षाचे कालावधीसाठी स्वीकारणेत यावी असें ठरलें.

**(ब) गादी चादर-** धर्मशाळा (२०० रुम्स) इमारती येथील इमारतीत उतरणाऱ्या भक्तांना गादी चादर, बेडशीट, रग, उशी (कव्हरसह) पुरविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन फीच्या देकाराबाबत निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

याकामी खालील निविदासादरकर्त्यांनी आपल्या निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | श्री.भाऊसाहेब विश्वनाथ भोसले, शिर्डी |
| ०२. | साईराज कॉन्ट्रॅक्ट, श्री.एन.व्ही.गोविंदराव, शिर्डी |
| ०३. | श्री.साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि.,शिर्डी |
| ०४. | सिद्धीविनायक एन्टरप्राईजेस, सोलापूर |

उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी सादर केलेल्या निविदा आजचे सभेपुढे मा.विश्वस्तांचे उपस्थितीत उघडण्यात आल्या. या निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटी करण्याकरीता उपस्थित रहाणेबाबत कळविण्यात आले होते. उपस्थित निविदासादरकर्त्यांशी आजचे सभेत चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्या असता त्यांनी पुढीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर प्रति माह रुपये | वाटाघाटीनंतरचे दर प्रति माह रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.भाऊसाहेब विश्वनाथ भोसले, शिर्डी | ३०,०००.०० | **३७,५००.००** |
| ०२. | साईराज कॉन्ट्रॅक्ट, श्री.एन.व्ही.गोविंदराव, शिर्डी | ३५,५५५.०० | ३७,०००.०० |
| ०३. | श्री.साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि.,शिर्डी | ३१,५००.०० | ३१,५००.०० |
| ०४. | सिद्धीविनायक एन्टरप्राईजेस, सोलापूर | ३०,८००.०० | ३५,८००.०० |

उपरोक्तप्रमाणे निविदासादरकर्त्यांनी दिलेल्या दराचा विचार करता श्री.भाऊसाहेब विश्वनाथ भोसले यांनी रुपये ३७,५००/-प्रतिमाह ही उच्चतम परवाना फी देऊ केलेली असल्याने त्यांची उच्चतम दराची निविदा एक वर्षाचे कालावधीसाठी स्वीकारणेत यावी, असें ठरलें.

**(क) शौचालय व स्नानगृह-** धर्मशाळा (२०० रुम्स) इमारती येथील इमारतीत उतरणाऱ्या भक्तांना शौचालय व स्नानगृह सुविधा पुरविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन फीच्या देकाराबाबत निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

याकामी खालील निविदासादरकर्त्यांनी आपल्या निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | श्री.भाऊसाहेब विश्वनाथ भोसले, शिर्डी |
| ०२. | साईराज कॉन्ट्रॅक्ट, श्री.एन.व्ही.गोविंदराव, शिर्डी |
| ०३. | श्री.साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि.,शिर्डी |
| ०४. | सेवा फौन्डेशन, अहमदनगर |
| ०५. | सिद्धीविनायक एन्टरप्राईजेस, सोलापूर |

उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी सादर केलेल्या निविदा आजचे सभेपुढे मा.विश्वस्तांचे उपस्थितीत उघडण्यात आल्या. या निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटी करण्याकरीता उपस्थित रहाणेबाबत कळविण्यात आले होते. उपस्थित निविदासादरकर्त्यांशी आजचे सभेत चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्या असता त्यांनी पुढीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर प्रति माह रुपये | वाटाघाटीनंतरचे दर प्रति माह रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.भाऊसाहेब विश्वनाथ भोसले, शिर्डी | ३१,०००.०० | ३३,०००.०० |
| ०२. | साईराज कॉन्ट्रॅक्ट, श्री.एन.व्ही.गोविंदराव, शिर्डी | ३५,७७७.०० | **३७,०००.००** |
| ०३. | श्री.साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑप.सोसायटी लि.,शिर्डी | ३१,५००.०० | ३१,५००.०० |
| ०४. | सेवा फौन्डेशन, अहमदनगर | २०,५५१.०० | २०,५५१.०० |
| ०५. | सिद्धीविनायक एन्टरप्राईजेस, सोलापूर | ३०,८५०.०० | ३६,३५०.०० |

उपरोक्तप्रमाणे निविदासादरकर्त्यांनी दिलेल्या दरांचा विचार करता श्री साईराज कॉन्ट्रॅक्ट, श्री.एन.व्ही.गोविंदराव, शिर्डी यांनी रुपये ३७,०००/-प्रतिमाह ही उच्चतम परवाना फी देऊ केलेली असल्याने त्यांची उच्चतम दराची निविदा एक वर्षाचे कालावधीसाठी स्वीकारणेत यावी असें ठरलें.

(कार्यवाही-धर्मशाळा विभागप्रमुख)

**विषय नं.३७. पेस्ट कन्ट्रोल कामी आलेल्या निविदा उघडून निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.७६७.** श्री साईबाबा संस्थान शिरडीचे विविध निवासस्थानांचे इमारतींमधुन किटकनाशक फवारणी (पेस्ट कंट्रोल) करणेकामी दि. ०२/१०/२००५ चे व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ६०६ नुसार कोटेशन (दरपत्रक) मागविणेस मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार मुदतीअखेर खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं | निवीदाधारकाचे नांव |
|---|---|
| १ | पेस्टोमॅटिक कंट्रोल, श्रीरामपुर, जि. अहमदनगर |
| २ | एक्सेल पेस्ट कंट्रोल, ब्रॅच पिंपळस रोड, राहाता. |
| ३ | औरंगाबाद अॅन्टी पेस्ट सर्व्हिस ,औरंगाबाद |

उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी सादर केलेल्या निविदा आजचे सभेपुढे मा.विश्वस्तांचे उपस्थितीत उघडण्यात आल्या. या निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटी करण्याकरीता उपस्थित रहाणेबाबत कळविण्यात आले होते. उपस्थित निविदासादरकर्त्यांशी आजचे सभेत चर्चा/वाटाघाटी करण्यात आल्या असता त्यांनी पुढीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर प्रति चौ.फुट | वाटाघाटीनंतरचे दर प्रति चौ.फुट |
|---|---|---|---|
| ०१ | पेस्टोमॅटिक कंट्रोल, श्रीरामपूर, जि. अहमदनगर | ०.५० पैसे | ०.५० पैसे |
| ०२ | एक्सेल पेस्ट कंट्रोल, ब्रॅच पिंपळस रोड, राहाता. | खोली ०.१५ पैसे<br>हॉल ०.२५ पैस | खोली ०.१५ पैसे<br>हॉल ०.२५ पैसे |
| ०३ | औरंगाबाद अॅन्टी पेस्ट सर्व्हिस ,औरंगाबाद | ०.१० पैसे | ०.१० पैसे |

उपरोक्त दराबाबत कीटक नाशक फवारणी केल्यानंतर प्रभावी काळ व द्यावयाचा दर याबाबत सविस्तर चर्चा होऊन, कीटक नाशक चौ.फुटावर न देता वर्षभरासाठी इमारतीच्या आकारमानानुसार दर देणेबाबत निविदासादरकर्त्यांना सांगण्यात यावे, असे ठरलें. त्यानुसार वरील तीनही निविदासादरकर्ते तसेच, मा. विश्वस्त कॅप्टन वासुदेवा यांनी सुचविलेले मे. पेस्ट कंन्ट्रोल एम. वॉल्श, मुंबई यांना समक्ष बोलावून त्यांना संस्थान इमारतींची पहाणी करुन प्रत्येक इमारतीचा वर्षभरासाठीचा कीटकनाशक फवारणीकामी दर देणेबाबत सांगण्यात आले. (कार्यवाही- अधिक्षक, भक्तनिवासस्थान)

**विषय नं.३८. भक्तनिवाससाठी ब्लँकेट (रग ) खरेदी करणेबाबत**

**निर्णय क्र.७६८.** साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडे सध्या ११९९ रग शिल्लक आहेत. सदरचे रग दिनांक २२.०७. १९९५ रोजी १११२ नग व दिनांक २३.०१.२००३ रोजी १०० नग असे देणगी दाखल जमा झालेले आहे. सदरचे रग जवळजवळ १० वर्षापासून आहेत.

दिनांक २५.११.२००५ ते दिनांक ०३.१२.२००५ अखेर प.पुज्य स्वामी रामदेव बाबा यांचे योग साधना निवासी शिबीर साईबाबा भक्तनिवासस्थान येथे आयोजित करण्यात आलेले आहे. शिबीरार्थींना निवासस्थान म्हणून साईबाबा भक्तनिवासस्थान कडील संपूर्ण खोल्या त्यांना देण्यात येणार आहेत. त्याकरीता व सध्या थंडीचा कालावधी असलेने २००० नग रग खरेदी करणे आवश्यक असून त्याकामी अंदाजे रुपये ६,००,०००.०० मात्रचे खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यानी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तनिवाससाठी आवश्यक असणारे २००० नग खरेदी कामी रेमंड, ओसवाल या नामांकित कंपन्यांचे रग खरेदी करण्यात यावे. त्यासाठी विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग यांनी लुधियाना येथे समक्ष जाऊन पहाणी करुन खरेदी करण्यात यावेत, असे ठरले. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६,००,०००.०० (अक्षरी रुपये सहा लाख मात्र ) चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग/अधिक्षक,भक्तनिवासस्थान )

**विषय नं.३९. सहा.धर्मादाय आयुक्त यांचे समोरील अर्ज क्र.८१६/०५. श्री साईलाल हिरालालजी जेधिया, शिर्डी यांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.७६९.** श्री साईलाल हिरालाल जेधिया रा.शिर्डी यांनी उपरोक्त अर्ज मा.सहा.धर्मादाय आयुक्त अ.नगर यांचेकडे दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये प्रतिवादी नं. १ श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डी यांना सामनेवाले नं. १, श्री भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, कार्यकारी अधिकारी , प्रतिवादी नं.२ मा. अध्यक्ष यांना प्रतिवादी नं.३ मा.उपाध्यक्ष यांना प्रतिवादी नं.४ व प्रतिवादी नं. ५ ते १९ मा. सदस्य असे पक्षकार केलेले आहेत. अर्ज बॉम्बे पब्लीक ट्रस्ट ॲक्ट १९५० चे कलम ४१ अे अन्वये असल्याचे अर्जात कथन केले असून खालील बाबी अर्जात नमूद केलेल्या आहेत.

१)	अर्जदार शिर्डी येथे राहात आहे. श्री साईबाबा व येथील समाजाची सेवा करण्याचा त्यांनी संकल्प सोडलेला आहे.

२)	संस्थान बॉम्बे पब्लीक ट्रस्ट १९५० खाली नोंदलेले असून नोंदणी क्रमांक ई ६९ अ.नगर असा आहे. महाराष्ट्र शासनाने नियुक्त कलेले व्यवस्थापन समितीचे मार्गदर्शनाखाली ट्रस्टचा कारभार चालतो.

३)	ट्रस्टचे घटनेत नमूद केल्याप्रमाणे अनेक ध्येय व उद्देश अंमलबजावणी करण्याची जबाबदारी व दायीत्व संस्थानचे कमेटी सदस्यांवर आहे. श्री साईबाबांच्या जुन्या पध्दतीने परंपरा व त्यांचे कार्य पुढे चालू ठेवावे असे अधिनियमात आहे.

अर्जदार यांचे माहितीप्रमाणे कमेटी सदस्य ट्रस्टचे उद्दिष्टा प्रमाणे कारभार चालवित नाहीत असे अर्जात म्हटले असून श्री साईबाबांचे काळात श्रीचे व्दारकामाईतील भिंतीचे देवळात दिवे लावण्याची प्रथा होती व आहे. त्यावरील श्री साईबाबांचा नेहमी आग्रह असे. त्याबाबद श्री साईबाबांचे चरित्रात अनेक दृष्टांत दिले आहेत. परंपरा अनेक वर्षे चालू होती. तसेच व्दारकामाईत ग्रंथाचे वाचन व पारायणांस अनुमती होती. चालू विद्यमान सदस्य व्दारकामाई येथे पारायणास विरोध करतात. परंतु शास्त्राधार नसतांना गुरुस्थान इमारतीमधील पिंडीवर अभिषेक पात्र काढून टाकणेत आलेले आहे. एका साधूस दवाखाण्यात दाखल करुन घेणेस कर्मचाऱ्यांनी नकार दिला संस्थानचे वतीने गरीब लोकांना व साधूना मोफत वैद्यकीय सुविधा देणे आवश्यक आहे. संस्थानचे कारभारात सुधारणा व्हावी असे प्रस्तुतचे अर्जात म्हटले आहे.

शेवटी मा.सहा.धर्मादाय आयुक्त यांचेकडेस खालील कार्यवाही (सामनेवाला कडून) होणेबाबत विनंती केली आहे.

१)	व्दारकामाईतील भिंतीचे देवळात दिवे लावण्यात यावेत.

२)	व्दारकामाईत साईभक्तांना ग्रंथाचे वाचनास अनुमती द्यावी.

३)	रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचे वर्तनात सुधारणा व्हावी साधूंना व गरीब लोकांना मोफत उपचार व्हावेत यासाठी त्यांनी विनंती केलेली आहे.

उपरोक्त अर्जाची प्रत संस्थानला प्राप्त झालेनंतर श्री गाडेकर, ॲडव्होकेट अ.नगर यांचे मार्फत दिनांक ३१/१०/२००५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे सहीचे वकीलपत्र दाखल करुन प्रकरणी हजर रहाणेची कार्यवाही झालेली आहे. व अर्जावर म्हणणे देणेसाठी मुदत मागणी केलेली आहे. प्रकरणी पुढील तारीख १०/११/२००५ नेमलेली आहे.

प्रस्तुतचे प्रकरणात अर्जदार यांनी दिपावली उत्सवासांठी व्दारकामाई मंदिरात दिवे लावून दिपोत्सव त्यांचे खर्चाने करणेस परवानगी मिळावी असा अर्ज दिला असल्याचे ही दिसून आले असून सदर अर्जावर Other party to say असा हुकूम झाला आहे. त्याच बरोबर मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी प्रस्तुत प्रकरणी निशाणी नं. १ मुळ अर्जावर दिनांक ३/११/२००५ रोजी सोबतचे हुकूमाप्रमाणे हुकूम केलेला असून शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदी मुळे सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे तरतुदीवर परिणाम होत नाही असे आदेशांत म्हटले असून " More over the ordinance in question is very veg so far as giving directions as required are concerned at this stage in view of section २ D of the ordinance in question permits the juridiction of the Bombay public Trust Act. Hence it is desirable to issue notices to the opponents allong with cpies of the application. असा मा.सहा.धर्मादाय आयुक्त यांचा आदेश झालेला दिसून येतो.

अर्जदार यांनी मा.सहा.धर्मादाय आयुक्त यांचेकडे दाखल केलेले उपरोक्त तक्रारी सन २००३ पासून सातत्याने करीत आहे. त्यांना याबाबद दि. ३०/ ०६/ २००३ रोजी उत्तरही पाठविणेत आलेले आहे. त्याच प्रमाणे त्यांची प्रतही मा.सहा.धर्मादाय आयुक्त यांचेकडे इकडील एसएसएस वशी- मंदिर /५६९८/२००३ दि. ३०/६/२००३ने पाठविलेली आहे. त्यामध्ये व्दारकामाई मधील भिंतीचे कोनाड्यात दिवे लावण्याची प्रथा कधीही नव्हती असे कळविलेले आहे. भक्तांची गर्दी पहाता जागेचा व्याप पहाता तसेच स्वच्छता, आरोग्य याचा विचार करता दिवे लावणेस परवानगी देणे योग्य होणार नाही. अशा आशयाचे उत्तर त्यांना पाठविलेले आहे.

व्दारकामाईत ग्रंथाचे वाचन व पारायण बाबतही अशाच अर्थाचे उत्तर त्यांना पाठविलेले आहे.

गुरुस्थान मंदिरातील पिंडीवर अभिषेक पात्राची व्यवस्था करणे बाबत प्रथा नसल्याचेही त्यांना पुर्वीच कळविण्यात आलेले आहे.

यापुर्वी मा.धर्मादाय आयुक्त यांनी दि. २५/६/२००३ चे पत्राने प्रस्तुतची बाब संस्थानचे अधिकारांत येत असल्याचे कळविलेले आहे.

तथापि अर्जदाराने आता पुर्वीचेच मागणीचा आग्रह मा.सहा.धर्मादाय आयुक्त यांचेकडे करीत आहे. रुग्णालयाचे कर्मचाऱ्यांचे तक्रार हेतुपुरस्स र मुद्दाम केलेली दिसून येते कारण संस्थान गरीब रुग्णास मदत देतच आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केले होते.

१) अर्जदाराचे अर्जातील मागणी / म्हणणे चुकीचे आहे, ते पुन्हा पुन्हा पुर्वीचेच मागणी करीत आहेत, त्यांचे म्हणणे कबूल नाही मान्य करता येणार नाही, अर्जदाराचा अर्ज फेटाळण्यात यावा, अशा आशयाची कैफीयत वकीलांचे सल्ल्यानुसार वरील चौकशी अर्जाचे कामी मा. सहा.धर्मादाय आयुक्त यांचेकडे दाखल करणे .

२) अर्जदाराने दिपोत्सवाचा खर्च करणेस तयारी दर्शविली आहे. तसेच व्दारकामाई येथे दिपोत्सव करणेस परवानगी मागीतली आहे. तशी परवानगी त्यांना देवू नये. आता दिपावलीचा सणही होऊन गेला आहे. अर्ज फेटाळण्यात यावा. असे संस्थानचे म्हणणे त्यांचे मध्यंतरीचे अर्जावर देणे.

३) Bombay Public Trust Act.१९५०, संस्थानची पुर्वीची नियमावली व आताचा अधिनियम २००४ श्री साईबाबा संस्थान, विश्वस्त व्यवस्था, शिर्डी. याचा विचार करता Bombay Public Trust Act.१९५० कलम ४१ ड खाली मा. सहा.धर्मादाय आयुक्त यांना संस्थानला Direction देता येईल किंवा कसे ? याबाबतही वकीलाचे मार्गदर्शन घेऊन त्या प्रमाणे इतर काही कायदेशीर कार्यवाही करणे असल्यास संबंधीत अर्जदार यांचे विरुध्द सहा.धर्मादाय आयुक्त किंवा इतर कोर्टात त्याप्रमाणे कार्यवाही करणे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अ.नं.०३ प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी )

**विषय नं.४०. शिर्डी पोस्ट ऑफिससाठी भाडेतत्वावर (पाच वर्षासाठी)जागा देणेबाबत.**

**निर्णय क्र.७७०.** मा. अधिक्षक, पोस्ट ऑफीस शिर्डी यांना साईउद्यान इमारतीतील तळमजल्यावरील दोन हॉल्स, जे एकमेकांना जोडून आहेत ते पोस्ट ऑफीसला तूर्त ११ महिन्यांसाठी लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर मा. व्यवस्थापन समितीचे मंजूरीस अधिन राहून इकडील पत्र क्रमांक एसएसएस/वशी-०२/१०४५५/२००३ दिनांक ०८/१२/२००३ ने देण्यांत आला आहे. व त्याप्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १३/१२/२००३ चे सभेतील विषय क्रमांक २३ निर्णय क्रमांक ५९० नुसार जागा लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर देणेस मान्यता दिली आहे. सदर जागेचा प्रत्यक्ष ताबा पोस्ट खात्यास दिनांक १८/१२/२००३ रोजी देण्यांत आला आहे.

वरीलप्रमाणे पोस्ट ऑफीस शिर्डी यांना संस्थानचे साईउद्यान इमारतीतील जागा ११ महिनेच्या लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर देण्यात आला आहे. पोष्ट ऑफीस, शिर्डी यांनी त्यानंतर जागा ५ वर्षाचे भाडेपट्टयाने दयावी म्हणून संस्थानला वारंवार विनंती केली आहे. संस्थानने त्यांची विनंती फेटाळलेली आहे. मान्य केलेली नाही तसेच ११ महिन्यांचा करारनामा करून दिलेला नाही. त्यामुळे शेवटी इकडील पत्र क्रमांक एसएसएस/वशी-०२/११६१६/२००४ दिनांक ०९/११/२००४ ने मा. अधिक्षक डाकघर, श्रीरामपूर यांना संस्थानची साईउद्यान इमारत मोकळी करून देणेस कळविणेत आलेले आहे. तसेच एसएसएस/वशी-०२/११५६६/२००५ दिनांक ११/०७/२००५ ने रजिस्टर एडीने ॲड. श्री.डी.डी. कुलकर्णी यांचे मार्फत नोटीस पाठविलेली आहे.

सदर वकीलांमार्फत पाठविलेल्या नोटीसीचा मसुदा खालीलप्रमाणे आहे.

" शिर्डी येथे साईउद्यान या इमारतीत संस्थानने पोष्ट खात्यास जागा दिलेली असून त्या जागेचा लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर ११ महिन्यांचा करार करण्यास संस्थान तयार आहे. ११ महिन्यापेक्षा जास्त कालावधीचा करार संस्थान करू शकत नाही. तुम्हांस संस्थानचे शर्तीप्रमाणे करार करावयाचा असल्यास तुम्ही त्यानुसार करारपूर्ती करावी. अन्यथा तुम्हांस जागेची गरज नाही. असे समजून जागा दुस-यांस दिली जाईल संस्थान भाडेतत्वावर कोणासही जागा देत नाही. तसेच दीर्घ मुदतीचे करार करीत नाही. याची तुम्हांस यापूर्वी लेखी सूचना वारंवार दिलेली आहे. "

उपरोक्त संस्थानचे मालकीची साईउद्यान इमारतीतील जागेची लिव्ह ॲन्ड लायसेन्स ची मुदत दिनांक १७/१०/२००५ रोजी संपलेली आहे.

मा. अधिक्षक डाकघर, श्रीरामपूर विभाग, श्रीरामपूर यांचे कार्यालयाकडून पत्र क्रमांक डी-४७/इमारत शिर्डी / २००४ - श्रीरामपूर दिनांक ०६/१०/२००५ चे पत्राने इकडेस कळविले आहे की, पोष्ट ऑफीस इमारत भाडे तत्वावर घेवून तिचा फक्त पाच वर्षाचा करार करण्याचा केंद्र सरकारचा नियम आहे. त्यामुळे ११ महिन्यांचा लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर करार करून देणे शक्य नाही तरी कृपया पाच वर्षाचा भाडेपट्टा करार त्वरीत करून दयावा अशी विनंती केलेली आहे.

त्याचप्रमाणे मा अधिक्षक डाकघर, श्रीरामपूर विभाग, श्रीरामपूर यांचे पत्र क्रमांक डी-४७/ इमारत/ शिर्डी/२००४ श्रीरामपूर दिनांक १०/११/२००५ चे विनंती पत्राने इकडेस कळविले आहे की, पोस्ट कार्यालय हे केंद्र सरकारच्या अखत्यारीतील डाक विभागामार्फत चालविले जाते. केंद्र सरकारच्या भाडे तत्वावर घेणा-या इमारतीचा करार हा पाच वर्षाचा आहे. हा करार पूर्ण भारतांत त्याच तत्वावर लागू आहे. त्यानुसार शिर्डी पोष्ट ऑफीसचे लिज-डीड पाच वर्षाचे करण्यात यावे.

उपरोक्त पत्रात मा. अधिक्षक, डाकघर श्रीरामपूर विभाग, श्रीरामपूर यांनी असेही कळविलेले आहे की, दिनांक ०९/११/२००५ रोजी संस्थानने त्यांचे वरिष्ठ कार्यालय, मे. पोस्ट मास्तर जनरल

पुणे यांचेशी दूरध्वनीव्दारे काही दुस-या बाबतीत चर्चा झालेली आहे सध्या साईबाबा संस्थान, शिर्डी हे महाराष्ट्र शासनामार्फत नियुक्त विश्वस्त मंडळामार्फत काम करत आहे. संस्थानने महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करून शिर्डी पोष्टाचे लिज डीड पाच वर्षासाठी करण्याबाबत प्रस्ताव घेतल्यास याबाबतीत संस्थान नियमांत शिथिलता करून भाडेपट्टा पाच वर्षाचा करता येईल. आपण याबाबतीत समक्ष लक्ष दिल्यास ही बाब आपल्या मार्फत नियमांत शिथिलता करून सहज करता येईल. अशी त्यांना १०० टक्के खात्री आहे. कृपया मा. केंद्र सरकारच्या कार्यालयास आपण सहकार्य करावे ही आपणांस नम्र विनंती. अशा प्रकारचा विनंती अर्ज पाठविलेला आहे.पत्रात ५ वर्षाचे भाडेपट्टयासाठी ते मासिक भाडे किती देणार याबाबत खुलासा नाही.तसेच

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम -२००४ चे कलम १७ (३) नुसार " विश्वस्त व्यवस्थ्ेसाठी विहीत कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजूरीने असेल त्या खेरीज समितीकडून , एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता भाडेपट्ट्याने देण्यात येणार नाही. किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही. किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही.

तरी उपरोक्त अधिनियम - २००४ कलम १७ (३) नुसार सदर जागा १ वर्षापेक्षा जास्त मुदतीसाठी संस्थानला भाडेपट्टयाने देता येणार नाही. तसेच जास्त मुदतीसाठी देणे झाल्यास तशी महाराष्ट्र शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, अधिक्षक, डाकघर, श्रीरामपूर पोष्ट खाते यांना पोष्ट कार्यालय, शिर्डी साठी साईउद्यान इमारतीतील जागा पी.डब्लू डी कडून ठरवून दिलेल्या दराने ५ वर्षासाठी भाडेपट्ट्याने जागा देणेबाबत करारनामा करण्यात यावा व त्यानंतर महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी )

**विषय नं.४१. मौजे शिर्डी येथील श्रीमती ठकूबाई एकनाथ शेलार यांचे स.नं.३/३ क्षेत्र हे.०-१/२ आर व श्रीमती फातमाबी बक्षू शेख यांची जमीन स.नं.३/२ क्षेत्र हे.०-१/२ आर जमीन भूसंपादनाने घेणेबाबत.**

**निर्णय क्र.७७१.** पिपंळवाडी रस्त्याच्या उत्तर बाजूस असणारे संस्थानचे जनरल टॉयलेट व साईप्रसाद यांचे दरम्यान खालील व्यक्तींच्या जागा ( जमीनी ) आहेत.

| अ.नं | नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र<br>हेक्टर आर चौ मीटर |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती फातमाबी बक्षू शेख | ३/२ | ०-०१-५० |
| २ | श्रीमती ठकुबाई एकनाथ शेलार | ३/३ | ०-००-५० |
| | | एकूण | ०-०२-०० |

यापैकी अ.नं १ च्या श्रीमती फातमाबी बक्षू शेख यांनी त्यांची जागा विकणेबाबत पूर्वी संस्थानकडे अर्ज दिला होता. श्रीमती ठकूबाई एकनाथ शेलार यांना त्यांची जागा विकणेबाबत अर्ज दिलेला नाही मात्र समक्ष भेटीत जागा विक्री करणेस तयार असलेबाबत त्यांनी सांगितले होते.याबाबत दिनांक ३०/०५/२००४ चे मा. व्यवस्थापन मंडळाचे सभेत विषय सादर करणेत आला होता.

मा. व्यवस्थापन मंडळाच्या दिनांक २९-३०/०५/२००४ रोजीच्या सभेत जमीन मालक हजर होत्या. त्यांनी त्यांचे मुलाला किंवा नातवाला संस्थानमध्ये नोकरी द्यावी अशी मागणी केली सभेने त्यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांचे मुलाला किंवा नातवाला नोकरी देणे या सारख्या अटी मुळीच मान्य करता येणार नाहीत. असे सांगितले. तरी जमिनीच्या किंमतीबाबत त्यांच्या काय अपेक्षा आहेत. याबाबत त्यानी आपसात विचारविनिमय करून पुढील बैठकीत प्रस्ताव द्यावा. असे त्यांना संस्थानकडून सांगण्यात आले.

श्रीमती फातमाबी बक्षू शेख यांना त्यांची जागा किती किमंतीत संस्थानला देऊ इच्छितात याबाबत संस्थानला कळविणेबाबत दिनांक १७/०६/२००४ रोजी तसेच याच आशयाचे पत्र श्रीमती ठकूबाई शेलार यांना दिनांक १७/०६/२००४ रोजी देण्यात आलेले आहे. परंतु त्यांनी प्रतिसाद दिलेला नाही.

उपरोक्त जागा संस्थानला प्राप्त झाल्यास प्रसादालयाचा परिसर एकसंघ होणार आहे. तसेच त्या ठिकाणी विद्युत कार्यालयाचे विस्तारीकरण, प्रसादालयाचा एखाद्या भाग उदा. लाडू तयार करणे, नाष्टा तयार करणे यासाठी इमारत बांधणे किंवा साईभक्तांच्या सुविधेच्या दृष्टीने बांधकाम करता येईल. त्यादृष्टीने सदर जागा आवश्यक आहे. करिता सदर जागा मिळण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे भूसंपादनाचा प्रस्ताव पाठविणे उचित होईल असे नम्र मत आहे.
याबाबत खालील बाबीवर निर्णय होणेस विंनती आहे.

श्रीमती फातमाबी बक्षू शेख यांची शिर्डी येथील स.नं ३/२ क्षेत्र हेक्टर ०-१-५० आर व श्रीमती ठकूबाई एकनाथ शेलार हेक्टर ०-००-५० चौमी जागा ( जमीन भूसंपादनाने प्राप्त करून घेणेबाबत त्याकामी) मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचंकडेस भू संपादन कायदा १८९४ प्रमाणे भूसंपादनाचा

प्रस्ताव पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.४२. कर्मचाऱ्यांचे आगमन-निर्गमन वेळेकरिता फिंगर प्रिंट सिस्टम (बायो मेट्रीक) इन्स्टॉल करणेकामी आलेल्या निविदा उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.७७२.** संस्थानच्या कायम कर्मचा-यांचे कामावर आगमन-निर्गमनाचे नियंत्रण सध्या कार्ड पंचिंग सिस्टिम पध्दतीने करण्यात येत आहे. कर्मचा-यांच्या आगमन, निर्गमनाचे वेळेची नोंद करण्यासाठी सध्या प्रशासन शाखा (शांतिनिवास इमारत), चौकशी व निवासस्थान कार्यालय, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान, श्री साईबाबा कन्याशाळा इमारत व श्री साईनाथ रुग्णालय अशा पाच ठिकाणी इलेक्ट्रॉनिक कार्ड पंचिंग मशिन्स बसविण्यात आलेली आहेत. त्याप्रमाणे कार्ड पंच करतांना त्यावेळची नोंद संगणकामध्ये केली जाते.तथापि, ब-याच वेळा कर्मचा-यांचे आगमन-निर्गमन वेळेची नोंद तंतोतंत व अचूक होत नसल्याचे दिसून आलेले आहे. म्हणून संस्थान कर्मचा-यांचे कामावर येण्याचे व जाण्याचे (आमगन व निर्गमन) वेळेबाबत नोंद ठेवण्यासाठी फिंगर प्रिंट सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् इन्स्टॉल करण्यात यावी व त्याकरीता फिंगर प्रिंट मशीन खरेदीकामी नामांकित कंपन्यांकडून कोटेशन मागविणेत यावेत असा आयत्या वेळेचा निर्णय क्र.४६९ मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६-०८-२००५ रोजीचे सभेमध्ये पारीत करणेत आलेला आहे.

संस्थान कर्मचा-यांचे कामावर आगमन व निर्गमन वेळेकरीता फिंगर प्रिंट सिस्टीम (बायोमेट्रीक) मशीन्स् खरेदी करणेकामी माहे ऑक्टोबर २००५ मध्ये वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन कोटेशन्स/निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यानुसार खालीलप्रमाणे २९ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | कंपनीचे नांव | गांव |
|---|---|---|
| १ | ॲक्सीस सॉप्टवेअर प्रा.लि.<br>ॲक्सीस सॉप्टवेअर प्रा.लि. | पुणे.<br>पुणे. |
| २ | ज्योती टेल्कॉम | -- |
| ३ | मे.सुदर्शन इलेक्ट्रॉनिक्स | पुणे. |
| ४ | वेस बायोमेट्रीक्स सिस्टिम्स् प्रा.लि.<br>वेस बायोमेट्रीक्स सिस्टिम्स् प्रा.लि. | पुणे.<br>पुणे. |
| ५ | एक्स्ट्रीम सोलूशन्स | पुणे |
| ६ | इंटरप्राईज सॉप्टवेअर सोलुशन्स लॅब | बेंगलोर |
| ७ | एम-टेक इनोव्हेशन प्रा.लि. | पुणे |
| ८ | हिरल टेक्ट्रोनिक्स प्रा.लि. | मुंबई |
| ९ | अेलाक्रेटी टेक्नोलॉजीस प्रा.लि.<br>अेलाक्रेटी टेक्नोलॉजीस प्रा.लि. | मुंबई<br>मुंबई |
| १० | स्वॅन इलेक्ट्रो मेक सिस्टीम्स् | नासिक |
| ११ | निर्मळ टेक्नॉलॉजिस | पुणे |
| १२ | ओसीयानिक एंटरप्रायझेस | मुंबई. |
| १३ | झेनॉन सिंडीकेट | कोल्हापूर |
| १४ | डॅनलॉ टेक्नॉलॉजीस इंडिया | ठाणे, मुंबई |
| १५ | बार ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेड | हैद्राबाद. |
| १६ | सिल्व्हर बाईट सोल्यूशन्स | मुंबई |
| १७ | स्नेहपद्मा सॉप्टवेअर टेक्नॉलॉजीस प्रा.लि. | पुणे |
| १८ | प्रिंट इलेक्ट्रॉनिक्स इक्वीपमेंटस् प्रा.लि. | वडाळा, मुंबई |
| १९ | अमेक्स इन्फरमेशन टेक्नॉलॉजीस लि. | अंधेरी (ई )मुंबई |
| २० | गॅमा- सॉप्ट इन्फरमॅटीक्स प्रा.लि. | बांद्रा (ई )मुंबई |
| २१ | इव्हीस्का इन्फोटेक प्रा.लि. | अंधेरी (ई )मुंबई |
| २२ | फ्युजन टेक | बोरीवली (वेस्ट )मुंबई |
| २३ | ॲबाकस सॉप्टेक लिमिटेड | दिल्ली |
| २४ | प्रतिभा इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड | ठाणे, मुंबई. |
| २५ | कार्डकॉम (इं )प्रा.लि. | मुंबई |
| २६ | लॅबकॉल बायोमेट्रीक टेक्नॉलॉजीस प्रा.लि. | हैद्राबाद |
| २७ | सिक्युरा सिस्टीम्स | ठाणे (वेस्ट ) |
| २८ | झेनॉन सिंडीकेट | कोल्हापूर |
| २९ | झीकॉन इलेक्ट्रॉनिक सिक्युरिटी सिस्टीम लिमिटेड<br>झीकॉन इलेक्ट्रॉनिक सिक्युरिटी सिस्टीम लिमिटेड | बांद्रा (वेस्ट ), मुंबई<br>बांद्रा (वेस्ट ), मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. या निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, असे ठरले. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.४३. परिवीक्षाधीन कालावधी संपुष्टात आलेल्या वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**निर्णय क्र.७७३.**खालील वर्ग-४ चे कर्मचाऱ्याचा परिवीक्षाधीन कालावधी त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या तारखेस संपत असल्याने, त्यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत संबंधित विभागप्रमुखांनी अभिप्राय दिल्याने त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या तारखेपासून रुपये २५५०-५५-२६६०-६०-३२०० ही वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करावे, असें ठरलें.

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नाव | नेमणूक तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपण्याची तारीख | संस्थान सेवेत कायम करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्रीमती मंदाकिनी बाळू गोंदकर, स्त्री मदतनीस,प्रसादालय | १८.१२.२००३ | १७.१२.२००५ | १८.१२.२००५ |
| ०२. | श्री.शौकत बशीर शेख, मदतनीस, प्रसादालय | २४.१२.२००३ | २३.१२.२००५ | २४.१२.२००५ |
| ०३. | श्री.प्रसाद मुरलीधर सोनवणे, मदतनीस, चौकशी व निवासस्थान | २४.१२.२००३ | २३.१२.२००५ | २४.१२.२००५ |

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना)

**विषय नं.४४. संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नियुक्ती होणेसंदर्भात ॲडव्होकेट नाईक, ॲडव्होकेट गोंदकर व ॲडव्होकेट कोते यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.७७४.**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीचे कोपरगांव अहमदनगर व औरंगाबाद खंडपीठ येथे वेगवेगळया प्रकारची दिवाणी,फौजदारी,तसेच कामगार विषयक न्यायालयीन प्रकरणे चालू आहेत.

सदरचे कामी मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने खालील प्रमाणे ॲडव्होकेटस्च्या,ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

**०१.कोपरगांव कोर्ट :-**ॲड.पी.डी.गुजराथी,ॲड.डी.डी.कुलकर्णी,ॲड.जे.के.गोंदकर,ॲड. रमेशचंद्र ठोळे, ॲड.एस.एम.वाघ

**०२.अहमदनगर कोर्ट :-** ॲड.अशोक पाटील,ॲड.एन.जी.तांबोळी,ॲड.ए.आर.गाडेकर

**०३.मुंबई हायकोर्ट (बेंच औरंगाबाद ) :-** ॲड.आर.एन.धोर्डे,ॲड.अनिल बजाज,ॲड.विनायक होन,ॲड.राजेंद्र रघुवंशी,ॲड.नितीन भवर,ॲड.बाबासाहेब वाघ.

**आता, ०१) ॲड.राजेश विनायक नाईक,** मु.पो.लोणी ता.राहाता जिल्हा अहमदनगर यांनी **दि.०७/१०/२००५** रोजी अर्ज करुन त्यात "मी १९९२ पासून वकीली व्यवसाय करीत आहे.मी श्रीरामपूर येथील सिव्हील जज्ज (ज्यु.डी) व (सि.डी) व तसेच ॲडीशनल डिस्ट्रिक्ट व सेशन्स जज्ज साहेब व सहकार कोर्ट या विविध कोर्टात कामे करीत आहे तसेच आता नुकत्याच झालेल्या राहाता कोर्ट व राहाता कोर्टाच्या निकालावर कोपरगांव येथील ॲडीशनल डिस्ट्रीक्ट सेशन्स कोर्टात कामे करण्यास सुरुवात केलेली आहे व मी लोणी येथे रहात असल्याने मला राहाता कोर्ट व कोपरगांव येथील सेशन्स कोर्टात कामे करणे शक्य होईल. तरी माझी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक व्हावी "अशी विनंती केली आहे.

०२) ॲड.संदिप एकनाथ गोंदकर पाटील, रा.शिर्डी सध्या मु.पो.औरंगाबाद यांनी दि.०३/१०/२००५ रोजी अर्ज करुन त्यात,"I am Presently practicing as a lawyer at Bombay High Court bench at Aurangabad. Being a citizen of Shirdi I will be highly pleased to work as a member on the panal of Lawyers (Aurangabad High Court) representing Shri Saibaba Sansthan Trust,Shirdi.

If being appointed I promise to be loyal,sincere and honest with the Trust.Hoping for best co-operation."अशी विनंती केली आहे.

**तसेच**

०३) ॲड. बाळासाहेब विठोबा कोते पाटील मु.पो.शिरडी यांनी दि.१०/११/२००५ रोजी अर्ज करुन त्यात "मी शिरडी येथील कायमचा रहिवाशी असून अहमदनगर, कोपरगांव व राहाता कोर्टात गेल्या २५ वर्षापासून फौजदारी व दिवाणी कोर्टात वकील म्हणून काम पहात आहे. श्री साईबाबांच्या चरणी सेवा रुजू व्हावी या सद्हेतूने श्री साईबाबा संस्थानचे, कायदेशीर सल्लागार म्हणून विना मोबदला काम करणेस मी तयार आहे. "अशी विनंती केली आहे.

तरी ॲड.राजेश विनायक नाईक,लोणी यांची राहाता कोपरगांव अहमदनगर व ॲड.संदिप एकनाथ गोंदकर पाटील,रा.शिर्डी सध्या मु.पो.औरंगाबाद, यांची मुंबई हायकोर्ट (बेंच औरंगाबाद ) या ठिकाणी संस्थानची कामे पहाणेसाठी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक होणेबाबतचे विनंती अर्जावर तसेच ॲड. बाळासाहेब विठोबा कोते पाटील मु.पो.शिरडी यांची राहाता कोपरगांव अहमदनगर या ठिकाणी संस्थानची कामे विनामोबदला पहाणेसाठी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक होणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना/विधी अधिकारी)

**विषय नं.४५. कवी संमेलन भरविणेबाबत.**

**निर्णय क्र.७७५.** श्री धनंजय सोलंकर,पुणे यांनी त्यांचे दिनांक ०८ जून २००५ रोजीचे पत्राने साईदरबारात आपल्या नियोजनाप्रमाणे नजीकच्या भविष्यात एक कवी संमेलन भरवावे अशी विनंती केलेली होती.श्री सोलंकर यांचे पत्र मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६.०८.२००५ रोजीचे सभेत विचारार्थ ठेवण्यात आले होते.त्यावर निर्णय क्रमांक ४४९ मध्ये ,"शिरडी येथे लहान स्वरुपाचे कवी संमेलन आयोजित न करता राज्य पातळीवरील कवी संमेलन आयोजित करण्यात यावे.याकामी सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करण्यात यावा," अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

मा.व्यवस्थापन मंडळाचे निर्णयातील तरतूदीनूसार शिरडी येथे राज्य पातळीवरील कवी संमेलन आयोजित करणेबाबत प्रसिध्द जेष्ठ साहित्यीक श्री रामदास फुटाणे यांचेशी दुरध्वनीवरुन संपर्क साधून त्यांचे मार्गदर्शन घेण्यात आले. त्यावेळी श्री रामदास फुटाणे यांनी ,"कवी संमेलन हे डिसेंबर महिन्यात आयोजित करणे योग्य राहील.या कवी संमेलनासाठी येणा-या व्यक्ती कोणत्याही प्रकारचे मानधन घेणार नाहीत फक्त त्यांची जाण्या-येण्याची व्यवस्था संस्थान मार्फत करण्यात आली तर उत्तमच होईल.तथापि याकामी एकूण ११ लोकांना जाण्या-येण्यासाठी अंदाजे रु.३०,०००/-एवढा खर्च अपेक्षित आहे.तसेच संमेलनाची वेळ ही सायंकाळी ७.०० ते १०.०० अशी मर्यादीत असावी.कारण सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयानुसार रात्री १०.०० वाजेनंतर ध्वनीक्षेपक वापरण्यास बंदी आहे," असे सांगितलेले आहे.

तरी श्री रामदास फुटाणे यांनी सांगितलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

**यानंतर आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१. श्री एन.साईबाबा, सिकंदराबाद यांच्या विनामूल्य लेखाविषयक सेवा घेणे बाबत.**

**निर्णय क्र.७७६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२. सि.टी.स्कॅन साठी लागणारे इंजेक्शन खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.७७७.** श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये नुकतेच नवीन ६४-Slices सी.टी.स्कॅन मशिन खरेदी करुन बसवून कार्यान्वीत करण्यात आलेले आहे.

सदर मशिनवर रुग्णांचे सी.टी.स्कॅन करणेपूर्वी रुग्णांना इंजेक्शन द्यावी लागतात. सदरची इंजेक्शन आपण ठेवत नाही. कारण आपणाकडे आतापर्यत सी.टी.स्कॅन मशिन नव्हते. रेडीओलॉजी विभागाने दिनांक ३.८.२००५ चे पत्रान्वये सदर इंजेक्शनची मागणी केलेली आहे. सदरची इंजेक्शनप नवीनच खरेदी करावी लागणार आहेत. त्यासाठी अंदाजे रुपये २,१९,१००/- खर्च अपेक्षित असून, मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.९.२००५ चे सभेतील निर्णय क्र.५५० अन्वये अधिकृत विक्रेत्यांकडून कोटशन मागवून सदरची इंजेक्शन खरेदी करण्यास व येणारे अंदाजे रक्कम रुपये २,१९,१००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इंजेक्शन खरेदीकामी एकूण सहा कंपन्या/अधिकृत विक्रेत्यांकडून कोटेशन्स मागविण्यात आले असून, खालील तीन कंपन्या/अधिकृत विक्रेते यांनी कोटेशन्स पाठविलेली आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.अनिता मेडिकल सिस्टीम, मुंबई |
| ०२ | मे.युनिव्हर्सल ट्रेडर्स, पुणे |
| ०३ | मे.निर्मल एजन्सी अहमदनगर (फॅक्सद्वारे ) |

वरीलपैकी अ.नं.३ मे. मे.निर्मल एजन्सी अहमदनगर यांचे कोटेशन फॅक्सद्वारे मिळालेले असून, उर्वरित दोन कोटेशन्स दिनांक ३.१२.२००५ रोजी स्थानिक विश्वस्तांसमोर उघडण्यात आली असून, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | तपशील | मे.अनिता मेडिकल सिस्टीम, मुंबई | मे.युनिव्हर्सल ट्रेडर्स, पुणे | मे.निर्मल एजन्सी अहमदनगर (फॅक्सद्वारे ) |
|---|---|---|---|---|
| ०१ | Inj Iomeran 400mg 200 Nos | Ultravist 100ml 1082.54<br>Ultravist 50ml 584.91<br>Above rates are inclusive of scheme i.e. 1 vial free on 5 vial | Bracco –100ml 1505.40<br>Bracco-50ml 829.62 | Dyanavu 100ml 1027.52<br>Dyanavu 50ml 557.44 |
| ०२ | Inj Iomeran 3500mg 50 Nos | Ultravist 100ml 1204.75<br>Ultravist 50ml 689.68 | Bracco –100ml 1383.02<br>Bracco-50ml | Gastrovu 100ml 393.12<br>Gastrovu 30ml 125.84 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | inclusive of scheme i.e. 1 vial free on 5 vial | 738.14 | |
| ०३ | Oral Contrast Gastrovideo-100 Nos | N.Q | Bracco –100ml 449.76<br>Bracco –30ml 115.000 | N.Q |

उपरोक्त तक्त्यानुसार मे.युनिव्हर्सल ट्रेडर्स, पुणे यांचे दर जरी जास्त असले तरी ते स्वीकारणेबाबत शिफारस करण्यात आली आहे. कारण सी.टी.स्कॅन हा विभाग रुग्णालयात नवीनच सुरु करण्यात आलेला आहे. त्यासाठी लागणारे इंजेक्शनबाबतचा आपणास कोणताही अनुभव नाही. म्हणून पुणे येथील दिनानाथ मंगेशकर रुग्णालय,रुबी हॉल क्लिनीक यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी Bracco कंपनीचे इंजेक्शन चांगल्या दर्जाचे असून इतर कंपनीबाबत ते समाधानी नाहीत. तसेच वरील इंजेक्शन त्यांचे म्हणणेनुसार, आपण आपले रुग्णालयात मशिनचे चाचणीचे वेळेस वापरले असून आपणास देखील त्याचा समाधानकारक रिझल्ट मिळालेला आहे. तेंव्हा तूर्तास तरी Bracco कंपनीचे १०० मीली इंजेक्शन घेण्यात यावे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.९.२००५ चे सभेतील निर्णय क्र.५५० अन्वये सदरची इंजेक्शन खरेदीकामी अंदाजे रक्कम रुपये २,१९,१००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. तरी मे.युनिव्हर्सल ट्रेडर्स, पुणे यांचे दराने सदरचे खरेदीकामी रुपये ४,१५,२०७/- खर्च येणार आहे. म्हणजे सदरचे खरेदीकामी रुपये १,९६,१०७/-इतका जादा खर्च येणार आहे. या येणारे जादा खर्चास व मे.युनिव्हर्सल ट्रेडर्स, पुणे यांचेकडून इंजेक्शन खरेदीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये )

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३. श्री मधूकर भिवाजी डोखे, वॉर्डबॉय रुग्णालय, यांचे मुलीचे उपचारासाठी आर्थीक मदत देणे बाबत**

**निर्णय क्र.७७८.** श्री मधूकर भिवाजी डोखे यांची मुलगी कु.योगीता मधुकर डोखे वय वर्ष ३ हिस Central Idio Pathic Precocious Puberty चा त्रास आहे. श्री डोखे यांनी प्रथम आपल्या रुग्णालयात बालरोग विभागात डॉ.नमीता जाजू यांना दाखविले. श्री डोखे यांना पुढील तज्ञ सल्ला व उपचारासाठी जे.जे.रुग्णलय, मुंबई येथे पाठविले.

जे.जे.रुग्णालयातील डॉक्टरांनी सर्व तपासण्या व उपचार केल्यानंतर त्यांना Inj Decapeptyl ३.७५mg हि इंजेक्शन एक वर्षासाठी प्रत्येक महिन्यांच्या अंतराने घ्यावयाचे सांगीतले आहे. पहिला डोस हा दिनांक २६.०१.२००६ पासून सुरु होणार आहे.

सदरच्या एका इंजेक्शनची किंमत ही अंदाजे रुपये ५,०००.०० इतकी आहे म्हणजे श्री डोखे यांना १२ इंजेक्शनसाठी रुपये ६०,०००.०० इतका खर्च येणार आहे.

सदरची इंजेक्शन श्री डोखे ही संस्थानचे रुग्णालयात प्रत्येक महिन्यास घेणार आहे. तेव्हा त्यांना प्रत्येक महिन्यास एक इंजेक्शन आवश्यकतेनुसार संस्थानकडून खरेदी करुन द्यावे असे मत आहे. सदरच्या खरेदीकामी अंदाजे रुपये ६०,०००.०० पर्यन्त खर्च येणार असल्याने सदर विषय मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांना प्रथम दाखवून घेतलेला असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४. संस्थान कर्मचाऱ्यांना जादा वैद्यकीय बीलांचा परतावा देणेबाबत.**

**निर्णय क्र.७७९.** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबूत असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने मंजूर होतो. पण ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्य मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा. गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नांव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|
| १. | श्री. सतिष गंगाधर बकरे | ७५२.०५ | ७५२.०० |
| २. | श्रीमती गिता आप्पासाहेब शिंदे | १,६७५.०० | १,६७५.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री मधुकर बापूसाहेब साळवे | १,००४.५० | १,००४.५० |
| ४. | श्रीमती सौदामिना नसीर शेख | ५,००३.७९ | ३,७१३.०० |
| ५. | श्री किशोर के.क्षीरसागर | ७,९३४.०० | ५,२२७.०० |
| ६. | श्री मधुकर भिवाजी डोखे | ५,१०४.०० | ५,१०४.०० |
| ७. | श्री अशोक गणपत कुरणे | ६,८२८.०० | ५,८०३.०० |
| ८. | श्री गोपीनाथ काशिनाथ चव्हाण | ५,३४६.०० | ५,३४६.०० |
| ९. | श्रीमती सुरेखा सुरेश ठाकूर | ७,३७८.०० | ७,३७८.०० |
| १०. | श्री शांताराम लक्ष्मण कांबळे | २३,९४२.०० | २०,३५०.०० |
| ११. | श्री गणपत मुरलीधर गोंदकर | १,६३,७९८.४१ | ३०,२०१.०० |

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५. रुग्णालय कर्मचारी कॉन्फरन्सबाबत.**

**निर्णय क्र.७८०.** वैद्यकीय ज्ञानात होणारे नवनवीन बदलांची माहिती रुग्णालयातील कर्मचा-यांना व्हावी व त्या ज्ञानाचा उपयोग रुग्णालयातील रुग्णांना व्हावा या उद्देशाने पुर्वीचे व्यवस्थापन मंडळाने रुग्णालयातील कर्मचा-याकरिता संस्थान मार्फत (संस्थान खर्चाने) वर्षातून एकदा देशात कोठेही कॉन्फरन्स /परिषद/ परिसंवादास हजर राहणेकामी अनुमती दिलेली आहे त्याप्रमाणे कर्मचारी संस्थान खर्चाने परिषदेस उपस्थीत राहत असतात व या नवीन वैद्यकीय ज्ञानाचा फायदा रुग्णांना होत असतो.

संस्थानचे मुख्य लेखाधिकारी यांनी सदर ठराव पुर्वीचे व्यवस्थापन मंडळाचा असल्याने सदर प्रस्तावास नवनियुक्त व्यवस्थापन समितीची श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ ला अधिन राहून नियमावली तयार करुन मान्यता घेणे गरजेचे असलेबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्याप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ ला अधिन राहून, अधिनियमात नमूद केल्याप्रमाणे अधिनियम पान नं. १४ वरील १७ (२-घ) नुसार समितीची कर्तव्य व अधिकार यानुसार समितीच्या सदस्यांना व कार्यकारी अधिका-याला व इतर अधिकारी व कर्मचारी यांना व्यवस्थापन निधीतून वेतन, मानधन, फी व भत्ते आणि इतर देय्य रक्कमा नियमित प्रदान करिल अशी तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासन अधिनियम पान नं. १५ वरील १७ (२-ण) नुसार समितीची कर्तव्य व अधिकार यानुसार मानव जातीचे कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्ती मध्ये सहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा स्पष्ट उल्लेख अधिनियमात करण्यात आलेला आहे.

त्यास अनुसरुन यापुढे कर्मचा-यांना परिसंवादास हजर राहणेकामी खालील प्रमाणे नियमावलीस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

०१) एकाच प्रकारच्या परिसंवादास एकाच कर्मचा-यास कामाच्या सोईनुसार पाठविणेत येईल.

०२) एका कर्मचा-यास दोन वर्षातून एकदा संस्थान मार्फत परिसंवादास हजर राहता येईल व परिसंवादास संस्थान मार्फत उपस्थितीत राहिल्यास किमान एक वर्ष संस्थान सेवा सोडता येणार नाही. संस्थान सेवा सोडल्यास परिसंवादासाठी संस्थानने केलेला खर्च कर्मचा-याने संस्थानला अदा करावा लागेल.

०३) परिसंवादाची रजिस्ट्रेशन फि ही पहिल्या मुदतीत जी असेल तीच परिसंवादाहून आल्यानंतर संस्थान मार्फत अदा करण्यात येईल व संस्थान नियमाप्रमाणे प्रवास व वास्तव्य भत्ता अदा केला जाईल.

०४) ही सुविधा फक्त रुग्णालय सेवेत कायम असणा-या कर्मचा-यांना दिली जाईल.

०५) परिसंवादास हजर रहाणे अगोदर संबंधित कर्मचा-याने कमीत कमी एक महिना अगोदर रुग्णालय अस्थापनेकडे परवानगी अर्ज दाखल करणे गरजेचे आहे.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय/वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६. सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाविषयी वसंतदादा शुगर इन्स्टीट्यूट यांचेकडील प्रस्तावाबाबत.**

**निर्णय क्र. ७८१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७. जुना पिंपळवाडी रस्ता सुशोभिकरण करणेबाबत.**

**निर्णय क्र.७८२.** भारतीय जीवन विमा निगमचे शाखा प्रबंधक श्री.गवळी यांनी जुना पिंपळवाडी रस्ता करीता कास्ट आर्यन रेलींगसह संपूर्ण सुशोभिकरणासाठी जीवन विमा निगम कंपनीची जाहिरात लावणेस संस्थानने परवानगी दिल्यास त्यांचे कंपनीची याकामाकरिता प्रायोजोकत्व स्वीकारण्याचे तयारी असल्याचे कळविले होते. यावर मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ६.०८.२००५ रोजीचे बैठकीत चर्चा होऊन निर्णय क्र.४०६ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

दिनांक ६.१२.२००५ चे पत्रान्वये भारतीय जीवन विमा निगमचे प्रबंधक श्री.गवळी यांनी कळविले आहे की, भारतीय जीवन विमा निगम जुना पिंपळवाडी रस्ता सुशोभिकरणाचे कामाबाबत सकारात्मक विचार करत आहे. पिंपळवाडी रस्ता सुशोभिकरणाचे काम पूर्ण झालेनंतर इलेक्ट्रीकल व मेन्टेनन्स चार्जेस शिर्डी संस्थान अथवा शिर्डी नगरपंचायत यांनी करावे. याबाबत खुलासा मागविला आहे. तरी सदरचे चार्जेस संस्थानमार्फत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८. शिर्डी साई ट्रस्ट, पट्टीपुलम, तामिळनाडू यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.७८३.** शिर्डी साई ट्रस्ट, तामीळनाडू चे विश्वस्त श्री. के.व्ही. रमणी हे शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनार्थ आले असता, त्यांनी काही साईभक्तांशी सोयी सुविधांबाबत चर्चा केली. त्यावेळी भक्तांना गर्दीच्या वेळेस संस्थानचे असलेले धर्मशाळा, भक्तनिवास येथील खोल्या अपु-या पडतात. त्या अनुषंगाने शिर्डी साई ट्रस्ट हे खालील प्रकल्प देणगी स्वरुपात करुन देण्यास तयार असलेबाबत दि. २४/११/२००५ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

०१) <u>**निवासस्थानाबाबत :-**</u> सध्या साईभक्तांच्या सोयीकरीता साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) यांनी बांधलेल्या धर्मशाळा व भक्तनिवासस्थान इमारतीसारख्या आणखी २ ते ३ धर्मशाळाचे बांधकाम करुन त्यास **"साई आश्रम"** नाव देण्यात यावे .

**०२)** <u>**वृध्दाश्रम व अनाथालय**</u> **:-** ज्या व्यक्ती वृध्द, वयस्कर असतात, ज्यांची रहाण्याची व्यवस्था नसते, अशा वृध्द व्यक्तीकरीता वृध्दाश्रम तसेच अनाथालयाचे बांधकाम करुन त्यास **"साई विश्राम"** नाव देण्यात यावे तसेच अशा वृध्द व्यक्तींना व अनाथांना संस्थानतर्फे मोफत वैद्यकीय सुविधा व प्रसादालयामध्ये मोफत भोजनाची व्यवस्था करण्यात यावी.

**०३)** <u>**ध्यानमंदीर (मेडिटेशन हॉल )**</u> **:-** साईभक्तांकरीता शांततेने बसून ध्यान करणेकरीता एक हॉल बांधून त्यास **"साईध्यान"** असे संबोधण्यात यावे.

सध्या साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) मार्फत नवीन प्रसादालय इमारत गट नं. ८०, ८५ मध्ये नियोजीत असून सदर प्रसादालयाचे जवळच उपरोक्तप्रमाणे दर्शविलेल्या **"साई आश्रम"** धर्मशाळा इमारत बांधकामासाठी शेती महामंडळाकडून ताब्यात घेण्यात आलेल्या गट नं. ८७,८८ अथवा भक्तनिवास इमारती मागील स.नं. १०७ मधील प्रस्तावित डॉरमिटरीचे बांधकामाचे जागेत साई आश्रम निवासस्थानाचे बांधकाम करता येईल.

गट नं.२१८ (१ हेक्टर ) जागेमध्ये **"साई विश्राम"** हया इमारतीचे बांधकाम करता येईल. तसेच ध्यान मंदीर हॉल (मेडिटेशन हॉल ) हा सध्याच्या प्रसादालयाच्या जागेत मंदीरा शेजारी बांधण्यात यावा." अशी विनंती श्री. के.व्ही. रमनी यांनी केली आहे. नवीन प्रसादालय इमारतीचे बांधकाम गट नं. ८०,८५ मध्ये प्रस्तावीत आहे. या बांधकामासाठी कालावधी लागेल. त्यामुळे सध्या प्रसादालयाचे परीसरात ध्यान मंदीराचे बांधकामासाठी जागा उपलब्ध नाही. ध्यान मंदीराचे बांधकामाबाबत चर्चा करुन निर्णय घेता येईल

श्री के.व्ही. रमनी, विश्वस्त, शिर्डी साई ट्रस्ट, तामीळनाडू यांनी संदर्भिय पत्रान्वये सदरचे प्रकल्प उभारणेकरीता येणारा खर्च शिर्डी साई ट्रस्ट करण्यास तयार असून सदर प्रकल्पांकरीता लागणारे प्लॅन व एस्टिमेट तयार करणेसाठी संस्थानने सहाय्य करावे, असे कळविले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली सर्व्हे नं. "साई विश्राम" गृहाचे बांधकाम करण्यात यावे व याकामी कायदेशिर करारनामा करुन घेण्यात यावा असे ठरले.

याबाबत सविस्तर चर्चा होऊन शिर्डी साई ट्रस्ट पट्टीपूलम, तामिळनाडू यांना पहिल्या टप्प्यात भक्तांचे निवासासाठी साईआश्रम इमारत बांधकामाकरीता स.नं.१०७ मध्ये जागा उपलब्ध करुन देण्यात यावी. दुस-या टप्प्यातील बांधकामासाठी श्री साईबाबा संस्थान मालकीचे सर्व्हे नं.१०९ पैकी तसेच सर्व्हे नं.१०८ पैकीचे शेजारील मे.साई गोपी असोसिएटस व साई गोपी रिसॉर्ट प्रा.लि. (श्री बच्छानी) यांचे मालकीचे सर्व्हे नं. १०८/१/१ ते सर्व्हे नं.१०८/१/४ क्षेत्र अदमासे ७८ आर १७ चौ.मी.भूसंपादनाने प्रस्तावित असलेले उपलब्ध करुन द्यावी.

सदर जमिन घेणेबाबत शासनाकडे प्रस्ताव पूर्वीच दाखल केलेला आहे. पूर्वीचे व्यवस्थापन मंडळाचे दिनांक १३.०७.२००३ चे निर्णयास अनुसरुन सदरचे प्रकरण सोडून देण्याचे /रद्द करण्याचे ठरले होते. त्यावेळी निवाड्याची किंमत रुपये ८,५९,२०,२२४.०० मोठ्या प्रमाणात होत असल्यामूळे प्रकरण मागे घेण्याबाबत ठरले होते. त्यावर शासनाकडून आस्थापना खर्चाची मागणी करणेत आलेली असून त्याबाबत शासनाशी पत्रव्यवहार चालू आहे. मात्र शिर्डी साई ट्रस्ट पट्टीपूलम,तामिळनाडू यांनी प्रस्तावित केलेल्या योजना तसेच संस्थानने हाती घ्यावयाच्या योजना उदा.अनाथाश्रम, वृध्दाश्रम, ध्यानमंदिर तसेच शैक्षणिक संकुलाचा विचार करता प्रस्तूतची जागा नगर मनमाड रस्त्यालगत येत असल्यामूळे सदर जागा भूसंपादनाने अथवा खरेदीने घेण्यास पुनश्च मान्यता देण्यात आली. याचवेळी श्री प्रभाकर गोविंद कोते व इतर तसेच परिसराजवळील इतर देखील जमीन प्राप्त होत असल्यास सदर जमीनी देखील भूसंपादनाने अथवा विकत घेण्यात यावी. शिर्डी साई ट्रस्ट, पट्टीपूलम,तामिळनाडू संस्थानतर्फे जागा उपलब्ध करुन देणे व बांधकामाचा सर्व खर्च शिर्डी साई ट्रस्ट पट्टीपूलम,तामिळनाडू यांनी करणे, सदर बाबतीत मालकी हक्क संस्थानचा राहील. दुरुस्ती व देखभाल, प्रशासन सर्व जबाबदारी संस्थानची राहील यासाठी आवश्यक करारनामा करुन घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९. लक्ष्मीनगर येथील रहिवाशी वसाहत स्थलांतर करणेबाबत.**

**निर्णय क्र. ७८४.** शिर्डी नगरपंचायत हद्दीत लक्ष्मीनगर वसाहत असून सदर वसाहती खालील जागा ही महाराष्ट्र शासनाचे मालकीची आहे. सदर ठिकाणी ग्रामपंचायतीच्या काळात १०१ नागरीकांना अधिकृत घरकुलांसाठी जागा

वाटप करताना त्यांना सदर जागेच्या सनद दिलेल्या आहेत. त्यावेळेपासून सदर ठिकाणी नागरीक राहत आहे. सदर जागेवर तदनंतर १०१ नागरीकांव्यतीरिक्त जवळजवळ २१३ नागरीकांनी अतिक्रमण केलेले आहे. सदर वसाहत प्रसादालयाचे उत्तरेस नाल्याचे कडेस आहे. नाला पूर्वी पासून असून पुढे तो निमगांव निघोज हद्दीतून वाहतो. ७/१२ उता-याप्रमाणे सदर जागा ही खालीलप्रमाणे सर्व्हे क्रमांकामध्ये आहे.

०१. सर्व्हे क्र. - ३/४ - मालकी - महाराष्ट्र सरकार भूमिहीन शेतमजूर घरकूल योजना- क्षेत्र - १.४८ हेक्टर. (पैकी ४८ आर स्मशानभुमीसाठी )

०२. सर्व्हे क्र. - २/३ मालकी - महाराष्ट्र - सरकार भूमिहीन शेतमजूर- घरकुले क्षेत्र - १५ आर.

०३. सर्व्हे क्र. - २/२ मालकी-महाराष्ट्र सरकार भुमिहीन घरकुले - क्षेत्र - २१ आर

**एकूण क्षेत्र ७/१२ प्रमाणे १.३६ हेक्टर**

शिर्डी विकास योजनेतील आरक्षणात वसाहती अंतर्गत पूर्व पश्चिम १८ मिटर रुंदीचा रस्ता प्रस्तावीत आहे. सदर रस्त्यास जोडून १२ मी. रुंदीचा पूल नाल्यावरुन स्मशान भुमीकडे प्रस्तावीत केलेला आहे. सदर वसाहतीची जागा ही साईबाबा संस्थानच्या साईप्रसाद परीसरालगत व मुख्य रस्त्यावर आहे. हया जागेचा साईभक्तांसाठी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी संस्थानला उपयोग करता येईल. भविष्यातील नियोजनासाठी सदर जागेची आवश्यकता आहे. विस्थापितांचे पुनर्वसन करणेसाठी आरक्षण क्र.२३ मध्ये १ हेक्टर ८९ आर क्षेत्र आरक्षित आहे. तेथे विस्थापितांचे पुनर्वसन करता येईल. सदर आरक्षण विकसित करणेसाठी सध्या शिर्डी नगरपंचायत विकसन यंत्रणा आहे.

लक्ष्मीनगर येथील रहीवाशी यांना सदर जागेतून स्थलांतरीत करुन आरक्षण क्र. २३ मध्ये पक्के घरकुलाचे संस्थानमार्फत बांधकाम करुन देता येईल. याकरीता लक्ष्मीनगर वसाहतीचे एकूण क्षेत्र स्मशानभुमीचे क्षेत्र वगळता १.३६ आर संस्थानला देण्याचे दृष्टीने तसेच आरक्षण क्र.२३ मध्ये लक्ष्मीनगर येथील विस्थापितांचे पुनर्वसन करणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) विकसन यंत्रणा म्हणून नेमणूक करणे आवश्यक आहे. याकरीता शिर्डी नगरपंचायत यांनी शिर्डी विकास आराखडयात तसा फेरबदल करणेबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर करणे आवश्यक असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०. श्रीसाईबाबा हॉस्पिटल इमारतीमध्ये वाढीव सुविधा बांधकामाबाबत.**

**निर्णय क्र. ७८५.** संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल (सुपरस्पेशालीटी ) इमारतीमध्ये वाढीव सुविधा बांधकामाचे काम ठेकेदार नितीन बी. औताडे, पाहेगांव यांचेमार्फत करण्यात येत आहे. सदर कामापैकी लिफ्ट मशिन रुमची किरकोळ कामे व काही ॲल्युमिनीयम दरवाजांची कामे बाकी आहेत. याव्यतिरिक्त इतर काम जवळजवळ पूर्ण झालेले आहे. सदर कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **कामाचे नांव** | :-श्री साईबाबा हॉस्पिटल इमारतीमध्ये वाढीव सुविधा बांधकाम करणे. |
| **ठेकेदाराचे नांव** | :-नितीन बी. औताडे, पोहेगांव |
| **मंजूर निविदा रक्कम:-** | अ)रु.६५,७६,७०३.००(नि.क्र.९२ दि०८/०२/२००५)रु.१७,७१,९३५.०० (कॅन्टीन व फार्मसी इमारतीवरील पहिल्या व दुस-या मजल्यासाठी नि.क्र. ३४५ दिनांक १८/०७/२००५ ) एकूण रु. ३,४८,६३८.०० ब) चारी नं. १२ साठी आर.सी.सी. पाईप लाईन व कम्पाउंड भिंत बांधकामासाठी रु. ३,०२,४००.०० (नि.क्र. ५७४ दिनांक १८/०९/२००५ ) क) रिसेप्शन काउंटर व सी.टी. स्कॅन कक्षातील इंटेरीअर कामांसाठी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता (नि.क्र. ५७८ दिनांक १८/०९/२००५) |
| **कार्यादेश क्रमांक** | :- एसएसएसटी/वशी-बांधकाम/२७५८/२००५ दिनांक १४/०३/२००५ |
| **काम पूर्ण करण्याची मूदत :-** | ०३ महिने (दि. ०४/०६/२००५ अखेर मूळ कामासाठी ) |
| **पूर्ण झालेल्या कामाची रक्कम :-** | रु. ६३,८४,७६७.०० (तिसरे रनिंग बिल) (ठेकदार यांनी एकूण रु. ९६,३८,२३४.०० मात्र रकमेचे चौदावे रनिंग बिल सादर केलेले असून त्यापोटी त्यांना रु. १८,३६,९००.०० मात्र इतका ॲडव्हान्स अदा करण्यात आलेला आहे.) |

सदर प्रकल्पापैकी रिसेप्शन काउंटर, सी.टी. स्कॅन रुम इंटेरीअर काम व चारी नं. १२ आर.सी.सी. पाईप्स ही कामे वगळता इतर कामांसाठी वरीलप्रमाणे एकूण रु.८३,४८,६३८.०० मात्र इतकी रक्कम मंजूर आहे. तथापि काम सुरु केलेनंतर साईटवरील आवश्यकतेनुसार मा. विश्वस्त डॉ.

तिवारी व वरिष्ठ प्रशासक डॉ. टाकळकर यांनी वेळोवेळी केलेल्या सूचनांप्रमाणे खालीलप्रमाणे वाढीव कामे करण्यात आली.

**वाढीव कामे :-**
१. इमारत 'ए'- कॅथलॅब व कार्डियाक ओ.टी. नूतनीकरण (सिमेन्स कंपनी ड्रॉईंगनुसार) सेंट्रल ए.सी.साठी आवश्यक बांधकामे.
२. रक्तपेढी इमारतीतील तळमजल्यावरील ओ.टी. नुतनीकरण
३. जुनी वॉर्ड इमारत - (a) कॅज्युअल्टी पार्टीशन (b) कॅज्युअल्टी एंट्रन्स व नूतनीकरण (c)जिना तोडून नवीन स्लॅब टाकणे इत्यादी
४.सी.टी स्कॅनसाठी केबल ट्रेंच, दरवाजा व इतर आवश्यक कामे करणे.
५.प्रामुख्याने जुनी हॉस्पिटल इमारत, ब्लड बँक इमारत जनरल वार्ड इमारत व कॅटीन फार्मसी जवळची स्टाफ क्वॉर्टर इमारत इ.इमारतींमध्ये वाढलेल्या कामांमुळे अंदाजपत्रकीय खर्चात वाढ झालेली आहे.

वरीलप्रमाणे वाढीव कामांमुळे इमारतींमधील सिव्हील कामासाठी प्राथमिक अंदाजानुसार एकूण रु. ९३,७७,९५९.०० मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. म्हणजेच मंजूर रकमेपेक्षा अंदाजे रु. १०,८०,७८७.०० मात्र (५% कन्टीन्जंसीज सह) इतका जादा खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे येणारे रु. १०,८०,७८७.०० मात्रचे अपेक्षित वाढीव खर्चास व ठेकेदार नितीन बी. औताडे यांचेकडून सदरहू काम निविदादराने व Non- tender items चे काम DSR अथवा आर्किटेक्ट यांनी प्रमाणित केलेल्या दरांनी करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे विश्वस्त मा.डॉ.प्यारेलाला तिवारी यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे जुन्या दरवाजांचे शटर्स काढून त्याठिकाणी नवीन लॅमिनेटेड फ्लश डोअर्स बसविणे व नवीन ओ.टी. जवळ तळमजला व दुस-या मजल्यावर ॲल्युमिनीयम पार्टीशन्स करणे, सिंचन चारीसाठी आर.सी.सी. पाईप्स टाकणे इ. ही कामे ठेकेदार मे. नितीन बी.औताडे यांचेकडून दि. १५.०१.२००६ पर्यंत करुन घेण्यास व त्याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मंजुरी देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११. रुग्णालय नवीन इमारत व भक्तनिवासस्थान इमारतीकरिता लिफ्ट बसविणे बाबत.**

**निर्णय क्र.७८६.** दि. २९-०१-२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेत मे. थायसेन क्रुप एलेव्हेटर्स, पुणे यांचेकडून एलेव्हेटर (लिफ्ट) खरेदी करण्यास निर्णय क्र. ०९ अन्वये मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार जा.नं. एसएसएसटी/ वशी- बांध/२७५७/२००५ दि. १४/०३/२००५ व्दारे मे. थायसेनक्रुप एलेव्हेटर्स यांना कार्यादेश देण्यात आला. काम पूर्ण करण्यासाठी ठेकेदार यांना वर्क ऑर्डर दिल्यानंतर १६ आठवड्यांचा कालावधी देण्यात आला होता. त्यानुसार दि. ०४/०७/२००५ पर्यंत काम पूर्ण होणे आवश्यक होते.

ठेकेदार मे. थायसेनक्रुप इलेव्हेटर्स, पुणे यांना जा.नं.एसएसएसटी/वशी-बांध/८९५०/२००५ दि. १९/०८/२००५ अन्वये तसेच जा.नं. एसएसएसटी/वशी-बांध/१४२५०/२००५ दि. ०८/१२/२००५ अन्वये लिफ्ट बसविण्याचे काम लवकरात लवकर चालू करणेबाबत कळविण्यात आले होते. थायसेनक्रुप यांचेकडील श्री. नंद कुमार पंडीत, Dy. General Manager - West Zone यांनी दि. ०८/११/२००५ रोजी कार्यकारी अधिकारी यांचेशी शिर्डी येथे समक्ष चर्चा केली. त्यावेळी रुग्णालयातील लिफ्टचे काम दि. २०/१२/२००५ अखेरपर्यंत पूर्ण करुन देण्याचे त्यांनी कबूल केले होते. त्यानंतर सदर ठेकेदार यांना वेळोवेळी दूरध्वनी करुन काम सुरु करण्याबाबत सांगण्यात आले. परंतू अद्याप ठेकेदार यांनी काम सुरु केलेले नाही. आता ठेकेदार यांनी दि. १९/१२/२००५ रोजी काम सुरु करुन २० दिवसात काम पूर्ण करण्यात येईल असे दूरध्वनीवरुन कळविले आहे. आजचे सभेत मे. थायसेनक्रुप इलेव्हेटर्स, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. औसेकर उपस्थित होते, त्यांचेशी चर्चा केली असता त्यांनी रुग्णालयातील एका लिफ्टचे काम दिनांक ०१.०१.२००६ पर्यंत व उर्वरित लिफ्टचे काम माहे ३१ जानेवारी, २००६ पर्यन्त पूर्ण करुन देऊ असे समक्ष सांगितले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. थायसेनक्रुप इलेव्हेटर्स, पुणे यांचेकडून लिफ्टचे काम पूर्ण करणेस रुग्णालयाकरीता माहे ३१ जानेवारी, २००६ पर्यन्त व भक्तनिवास करीता ३१ मार्च २००६ पर्यन्त मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१२. नवीन सुपरस्पेशालिटी रुग्णालयाच्या ऑपरेशन थिएटर्स आणि आय.सी.सी.यु साठी यु.पी. एस. खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.७८७.** नवीन श्री साईबाबा रुग्णालयाच्या इमारतीत असलेले ऑपरेशन थिएटर्स आणि आय.सी.सी.यु.मध्ये मे.फिलिप्स मेडीकल सिस्टीम, मुंबई आणि इतर कंपन्याचे अत्यावश्यक मशिनरी बसविण्यात येणार

आहेत. सदरच्या मशिनरीसाठी इलेक्ट्रीकल पॉवर सप्लाय अखंडीत व सतत मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी या विभागामध्ये असणा-या एकूण मशिनरी / इक्वीपमेंटचा एकूण लोड विचारात घेता प्रत्येकी १० के.व्ही.ए. क्षमतेचे खालीलप्रमाणे एकुण ०५ ( पाच ) यु.पी.एस.ची आवश्यकता आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | कार्डीयाक ओ.टी. | - | १० के.व्ही.ए. |
| ०२ | आय.सी.सी.यु. | - | १० के.व्ही.ए. |
| ०३ | गायनिक ओ.टी. | - | १० के.व्ही.ए. |
| ०४ | एन. आय.सी.यु. | - | १० के.व्ही.ए. |
| ०५ | आय.सी.यु. | - | १० के.व्ही.ए. |

तरी सदरचे क्षमतेचे एकूण ०५ यु.पी.एस. खरेदी करुन मिळावेत, असे वरिष्ठ प्रशासक. (रुग्णालये) श्री. साईबाबा रुग्णालय,शिरडी यांनी त्यांचे दि. २६/११/२००५ चे पत्रान्वये कळविले आहे.

उपरोक्त १० केव्हीए ऑन - लाईन थ्री फेज यु.पी.एस साठी प्रत्येकी रुपये ७५,०००.०० प्रमाणे एकूण रु.३,७५,०००.०० इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रत्येकी १० के.व्ही.ए. क्षमतेचे एकूण ०५ यु.पी.एस. कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,७५,०००. ०० चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३.** **शिर्डी शहरातील रथ पालखी रस्त्यावरील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या वीज वितरण वाहिन्या भूमिगत करणेबाबत.**

**निर्णय क्र.७८८.** "श्री "च्या दर्शनासाठी शिरडीत येणाऱ्या श्री साईभक्तांना सर्व सुखसोयी पुरविण्याचा संस्थानचा प्रयत्न असतो. तसेच वर्षभर व उत्सवात संस्थानमार्फत विविध धार्मिक कार्यक्रम होत असतात, यातील एक म्हणजे प्रत्येक उत्सवात निघणारी रथ - पालखीची मिरवणूक ! आताच्या काळात श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांची संख्या दररोज वाढतच आहे त्यामुळे या कार्यक्रमांत व मिरवणूकीत सहभागी होणाऱ्या साईभक्तांची वाढ होत आहे व पर्यायाने या रथ - पालखी रस्त्याचे रूंदीकरण करणे गरजेचे झाले होते. व हे रूंदीकरण करताना रस्त्यात अडथळा करणाऱ्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या वीजवितरण वाहिन्या भूमिगत करणेबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी वारंवार तसेच शिर्डी नगरपंचायतीचे मा. मुख्याधिकारी यांनी संस्थानकडे पाठपुरावा केला होता. वेळोवेळी यासंबंधी संस्थानचे वरिष्ठ अधिकारी व शिर्डी नगरपंचायतीचे मा. मुख्याधिकारी यांचेसमवेत झालेल्या चर्चेतही रस्त्यात अडथळा करणाऱ्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या वीजवितरण वाहिन्या भूमिगत करणेबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी मत प्रदर्शित केले होते.

श्री साईबाबा संस्थानमार्फत रथ - पालखी रस्त्याचे सुशोभिकरण करण्यात येत आहे. यामध्ये ड्रेनेज लाईन नविन टाकणे, फुटपाथ तयार करणे , रस्त्याचे डांबरीकरण करणे, स्ट्रीटलाईट टाकणे, ही सर्व कामे करण्यात येत आहेत. या सर्व कामासाठी श्री साईबाबा संस्थानमार्फत मे. एम.आर. मुथा, कॉन्ट्रॅक्टर , अहमदनगर याची नेमणुक करण्यात आली आहे. या कामाच्या वेळी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या वीजवितरण ओव्हरहेड वाहिन्या शिफ्ट करून देणेसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना संस्थानमार्फत विनंती करण्यात आली होती.

आता मे. एम.आर. मुथा, कॉन्ट्रॅक्टर , अहमदनगर यांचे काम चालू आहे. या कामात येणाऱ्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या ओव्हरहेड लाईन शिफ्ट करणेसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे विनंती केली असता या कामासंबंधी झालेल्या संस्थान अधिकारी, शिर्डी नगरपंचायतीचे अधिकारी, रस्त्याचे कॉन्ट्रॅक्टर मे.एम.आर. मुथा, अहमदनगर व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शिर्डीचे मा.कनिष्ठ अभियंता याचे झालेल्या बैठकीत मा.कनिष्ठ अभियंता ,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, शिर्डी यांनी रस्त्याच्या कडेला खेटून असलेल्या बिल्डींगमुळे ही लाईन शिफ्ट करणे अशक्य असून ही ओव्हरहेड लाईन काढून टाकून त्या पूर्ण रस्त्याकरीता भूमिगत वाहिन्या टाकाव्या लागतील असे सांगितले . व यासाठीचा लागणाऱ्या खर्चाचा प्रस्ताव सादर केला आहे. या पूर्ण रथ- पालखी रस्त्याकरीता भूमिगत वाहिन्या टाकण्याच्या कामाकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी एकुण रु. २९,८६,४४७.०० + १५ टक्के सुपरव्हिजन चार्जेस रु. ०४,४७,९६७.०० मिळून रु.३४,३४,४१४.०० इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४.** **पाणीपुरवठा विभागासाठी चेंबर्स झाकणे खरेदी कामी आलेल्या जादा खर्चास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.**

**निर्णय क्र.७८९.** संस्थान परिसरामध्ये मंदिराचे बाजूस असलेल्या रोडवरील ड्रेनेज चेंबरसाठी तसेच नवीन धर्मशाळा परिसरातील चेंबर्सवर टाकणेसाठी आवश्यक असणारे २ फुट बाय २ फुट साईजची कॉंक्रीट हेवी असलेली २९ चेंबर्स झाकणे कोटेशन्स मागवून खरेदीस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३२,७००.०० चे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०७.२००५ चे सभेत निर्णय क्र. ३७७ अन्वये मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार कोटेशन्स मागवून तसेच संबंधितांशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून दरपत्रके मागविणेत आलेली होती. प्राप्त झालेल्या दरपत्रकातील न्यूनतम दरधारक मे.अमित कॉंक्रीट वर्क्स, कोकमठाण ता.कोपरगांव यांचेकडून हेवी ड्युटी, फुल साईज व फ्रेम कव्हर असलेले २९ नग ड्रेनेज चेंबर्स झाकणे खरेदी करण्यात आलेली आहे. याकामी एकूण रुपये ३५,८१५.०० इतका खर्च आलेला आहे. म्हणजेच मंजूर रकमेपेक्षा रुपये ३,०४५.०० इतका खर्च आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५.** **ड्रेनेज चेंबर्स झाकणे तयार करणेकामी साहित्य खरेदी कामी आलेल्या जादा खर्चास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.**

**निर्णय क्र.७९०.** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०२.१०.२००५चे सभेतील निर्णय क्र.६२१ अन्वये साईप्रसाद परिसर, कारपार्किंग परिसर व साईनिवास परिसर या ठिकाणी एकूण १० नग लोखंडी फ्रेमची झाकणे बसविणेकामी आवश्यक असणारे साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रुपये ३४,७२०.०० चे खर्चास मान्यात देण्यात आलेली होती.

त्यानुसार संस्थान जा.नं. ११८२४ दिनांक १७.१०.२००५ अन्वये दरपत्रके मागविणेत आलेली होती. प्राप्त झालेल्या दरपत्रकातील न्यूनतम दराने मे. हिंदूस्तान टूल्स ॲण्ड इंजिनिअरिंग कंपनी, मुंबई यांना जा.नं. १३४२१ दिनांक २१.११.२००५ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. याकामी एकूण रुपये ४२,७२६.०० अधिक ४ टक्के वॅट असा एकूण खर्च रुपये ४४,४३६.०० इतका येणार आहे. साहित्याचे वजन कि.ग्रॅम मध्ये असल्याने वजनात वाढ/घट होणे शक्य असल्याने अंदाजे रुपये ४५,०००.०० पर्यत खर्च येईल. त्यानुसार मंजूर रकमेपेक्षा रुपये १०,२८०.०० जादा खर्च येणार असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६.** **लिनन खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.७९१.** व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०७.२००५ चे सभेतील निर्णय क्र.३७४ नुसार श्री साईनाथ रुग्णालयासाठी आवश्यक असणारे लिनन खरेदीकामी दरपत्रके मागविण्यात आलेली होती. मुदतीअंती प्राप्त झालेल्या दरपत्रकांपैकी मे.परिधान, मुंबई व मे.एम.एस.सर्जीवेअर, सोलापूर यांनी नियमाप्रमाणे बयाणा रक्कम भरलेली नसल्याने त्यांचे निविदेचा विचार केलेला नाही. दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता सर्व सदस्यांना पुरविणेत आला आला होता, तो सोबत परिशिष्ट "अ" म्हणून सोबत ठेवण्यात आलेला होता. त्यानुसार अ.नं. १,२,४ व ९ साठी मे.आर.के.कलेक्शन, नाशिक व अ.नं. ३,५,८ व १० करीता मे.आदिनाथ टेक्स केम लिमीटेड, सुरत यांचे दर न्यूनतम येतात. न्यूनतम दराने सर्व लिनन खरेदीस रुपये २,५०,०३०.०० खर्च येईल. प्राप्त झालेले नमूने डॉ.सौ.आशा पेंडसे, अधिक्षीका,रुग्णालय यांना दाखविलेले असून त्यांनी मे.अदिनाथ टेक्स केम लिमिटेड, सुरत यांचेकडील कापड योग्य असलेबाबतचा अभिप्राय दिलेला आहे.

मे.आदिनाथ टेक्स केम लिमिटेड, सुरत यांनी क्र.१ व ९ साठी दर दिलेले नसल्याने सदरचे लिनन न्युनतम दरधारक मे.आर.के. कलेक्शन,नाशिक यांचेकडून खरेदी करावे लागतील. त्याकरीता रुपये ६८,३८०.०० खर्च येईल. उर्वरित लिनन रुग्णालय विभागाचे अभिप्रायानुसार मे.आदिनाथ टेक्स केम लिमीटेड सुरत यांचेकडून खरेदी करावयाचे झाल्यास त्याकरीता रुपये १,९४,४५०.०० खर्च येईल. त्यानुसार सर्व लिनन खरेदीस रुपये २,६२,८३०.०० र्च येईल. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८.०७.२००५ चे सभेतील निर्णय क्र.३७४ नुसार लिनन खरेदीस रुपये ३,३२,५००.००चे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. मे.आदिनाथ टेक्स केम लि. सुरत यांचेकडील कपड्याचा नमूना योग्य असल्याने त्यांना क्र.०१ व ०९ चे लिनन देऊ केल्यास त्यांचेकडून खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग/वैद्यकीय अधिक्षिका,रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७. सत्संग सोहळयासाठी देण्यात आलेल्या मिठाईस कार्योत्तर मान्यता देणे बाबत.**

**निर्णय क्र.७९२.** श्री योग वेदांत सेवा समिती, कोपरगांव यांनी प.पूज्य संत श्री आसारामजी बापू याचे साधक शिष्य श्री वासूदेवानंदजी यांचा दिनांक १७.११.२००५ ते दिनांक २०.११.२००५ अखेर गीता भागवत सत्संग सोहळा आयोजित केलेला होता. सदर सत्संग सोहळयानिमित्त हजर असलेल्या भाविकांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी तर्फे आर्थिक योगदान मिळावे अशी विनंती केलेली आहे.

उपरोक्त विनंती पत्रानुसार मा.श्री अशोक भि.खांबेकर यांनी सूचित केले की, कोपरगांव येथील सत्संग सोहळयानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी मार्फत गोड पदार्थ म्हणून मिठाई , प्रसादालयातील बर्फी (खोबरे, रवा, मैदा, साखरेची) देण्यात यावी त्यानुसार मा.कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार मिठाई देण्यात आलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे ५००० पॅकेटस (प्रती पॅकेट १२५ ग्रॅम वजनाचे) दिलेले आहेत त्यांची किंमत रुपये १७,०००.०० होत आहे तरी सदरचे सत्संग सोहळया निमित्त देण्यात आलेल्या मिठाईस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, प्रसादालय विभाग/प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८. स्नेहसंमेलना निमीत्त मोफत जेवण मिळणेबाबत मुख्याध्यापक, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, शिर्डी यांचे पत्र.**

**निर्णय क्र.७९३.** उपरोक्त विषयास अनुसरुन, मुख्याध्यापक, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, शिरडी, जि.अहमदनगर यांनी दि.११/११/२००५ रोजीचे पत्राने सदर विद्यालयाचे स्नेहसंमेलन कार्यक्रम दि.१९/१२/२००५ रोजी होणार असून सदरच्या कार्यक्रमासाठी संस्थानमार्फत सोमवार, दि.१९/१२/२००५ रोजी २१६८ विद्यालय कर्मचारी व विद्यार्थी यांना मोफत भोजन देण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

दरवर्षी संस्थानमार्फत श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय,शिरडी, यांना वार्षिक पारितोषिक वितरण समारंभासाठी म्हणून खाऊ वाटप करीत असतो. मागीलवर्षी म्हणजे २००४-०५ या शैक्षणिक वर्षी पार पडलेल्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या आश्वासनानुसार सदरच्या शाळेस संस्थानमार्फत शालेय विद्यार्थी, अध्यापक, कर्मचारी व पाहुणे असे एकूण २,००० जणांना मोफत भोजन देण्यात आले होते.

श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, शिर्डी, या शाळेच्या दि.२२/१२/२००५ रोजी होणा-या स्नेहसंमेलनानिमित्त शालेय विद्यार्थी व कर्मचारी असे एकूण २,१६८ एवढ्यांना संस्थानमार्फत मोफत भोजन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक, प्रसादालय विभाग/प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९. श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००६ भेट देणेबाबत.**

**निर्णय क्र. ७९४.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित श्री साईबाबा दैनंदिनी/दिनदर्शिका २००५ मागील वर्षी २००५ च्या मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांना श्री साईबाबा दैनंदिनी ५० नग व दिनदर्शिका १०० नग भेट म्हणून देण्यात आल्या होत्या यास अनुसरुन चालू वर्षीही दैनंदिनी व दिनदर्शिका २००६ मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांना भेट म्हणून देणे आहे.

सन.२००६ च्या श्री साईबाबा दैनंदिनी-१०० नग व दिनदर्शिका (सिंगल शिटर) १०० नग व दिनदर्शिका (सिक्स शिटर) १०० नग याप्रमाणे देण्यात याव्या असे वाटते.याप्रमाणे व्यवस्थापन समितीचे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व मा.सदस्य १५ असे १७ व मा.कार्यकारी अधिकारी याप्रमाणे एकूण १८ यांना दैनंदिनी प्रत्येकी १०० नग X १८ =१८०० नग,दिनदर्शिका (सिंगल शिटर) १०० नग X १८ =१८०० नग व दिनदर्शिका (सिक्स शिटर) १०० नग X १८ =१८०० नग याप्रमाणे श्री साईबाबा दैनंदिनी व दिनदर्शिका २००६ भेट म्हणून देणेस व भेट म्हणून देण्यात येणारे दैनंदिनी व दिनदर्शिका २००६ चे संभावना खाते खर्ची टाकणेस मान्यता देणेबाबतचा प्रंस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-प्रकाशने विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०. संस्थानद्वारा प्रकाशित मराठी पुस्तकांचा गुजराथी अनुवाद तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र. ७९५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१. मा.सदस्यांचे भाडोत्री वाहनांचे बिलाबाबत.**

**निर्णय क्र. ७९६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२. संस्थानकरीता नवीन वाहन खरेदी कामी आलेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**निर्णय क्र. ७९७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३. गोदावरी खोरे दूध उत्पादक संघ लि.सहजानंदनगर पो.शिंगणापूर ता.कोपरगांव यांना संस्थान परिसरात जागा देणे बाबत.**

**निर्णय क्र. ७९८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४. श्री साईबाबा यांचे भक्तांचे समाधीजवळ दक्षिणा पेट्या बसविणे बाबत.**

**निर्णय क्र. ७९९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५. गुरुकृपा सेल्स, कोपरगांव यांना भक्तनिवास येथील (स्टॉल) साईगंगाची विक्री करणेकामी चालविणेस मिळणेबाबत.**

**निर्णय क्र. ८००.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६. नवीन भक्तनिवासस्थान इमारतीतील गाळयास लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर मुदतवाढ देणेबाबत श्री.संदिप अशोक जगधनी,श्रीरामपूर यांचा अर्ज.**

**निर्णय क्र. ८०१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७. शिधा सामुग्री मिळणेबाबत,भजनी मंडळ, समस्त ग्रामस्थ मंडळी, श्री महालक्ष्मी तरुण मंडळ काकडवाडी ता.संगमनेर व जयबाबाजी खानेश्वर भक्त परिवार मोठेबाबावाडी, सायखिंडी ता.संगमनेर जि.अहमदनगर, ग्रामस्थ मौजे पिंपळस, ता.राहाता जि.अहमदनगर व श्री.गोसावी पी.एस.अध्यक्ष, सदगुरु रामगिरी महाराज सेवा संस्थान, मु.पो. वावी, ता.सिन्नर जि.नाशिक यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र. ८०२.** खालील संस्थांनी/ग्रामस्थांनी श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे

**(अ)**

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | भजनी मंडळ, समस्त ग्रामस्थ मंडळी व श्री महालक्ष्मी तरुण मित्र मंडळ, काकडवाडी,ता.संगमनेर, जि.अ.नगर | श्री क्षेत्र काकडवाडी येथे श्री महालक्ष्मी प्राणप्रतिष्ठा, अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा कार्यक्रम दि.१५/१२/२००५ ते दि.२२/१२/२००५ अखेर होणार आहे. | शिधा - वस्तुरुपाने मिळणेबाबत. रु.२५,०००/- ची मागणी केली आहे. |

**(ब)**

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | जयबाबाजी खानेश्वर भक्त परिवार मोठेबाबावाडी, सायखिंडी, ता.संगमनेर, जिल्हा अहमदनगर | श्रीक्षेत्र खानेश्वर मंदीर, मोठेबाबावाडी (सायखिंडी) येथे अखंड हरिनाम सप्ताह व सामुदायिक जपानुष्ठान कार्यक्रम सोहळा दि.२७.११.२००५ ते दि.१२.१२.२००५ अखेर | शिधा - तांदूळ १५ पोते, साखर १५ पोते, तूप २० डबे, साबुदाना ५ पोते इ. वस्तूरुपाने मिळणेबाबत रुपये ५० हजारची मागणी केलेली आहे. |

**(क)**

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | ग्रामस्थ मौजे पिपळस, ता.राहाता, जिल्हा अहमदनगर | मौजे पिंपळस येथे अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा कार्यक्रम दिनांक २४.१२.२००५ ते दिनांक ३१.१२.२००५ अखेर होणार आहे. | शिधा - हरभरा डाळ, तांदूळ, तूप, साखर, तेल, इ.वस्तूरुपाने मिळणेबाबत |
| ०२. | श्री.गोसावी पी.एस.,अध्यक्ष, सद्‌गुरु रामगिरी महाराज सेंवा संस्थान, मु.पो. वावी, ता.सिन्नर, जि.नाशिक | सद्‌गुरु रामगिरी महाराज सेंवा संस्थान, मु.पो. वावी, येथे भागवत कथा व गाथा पारायण सोहळा, दिनांक २४.१२.२००५ ते दिनांक ३१.१२.२००५ अखेर होणार आहे. | दि.३१.१२.२००५ रोजी होणाऱ्या महाप्रसादास भंडाऱ्यास शिधा स्वरुपात मदत मिळणेबाबत. |

यावर सविस्तर चर्चा होऊन भजनी मंडळ, समस्त ग्रामस्थ मंडळी व श्री महालक्ष्मी तरुण मित्र मंडळ, काकडवाडी,ता.संगमनेर, जि.अ.नगर यांना श्री महालक्ष्मी प्राणप्रतिष्ठा, अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा कार्यक्रमासाठी रुपये २१,०००/-पर्यन्त वस्तुरुपाने मदत देण्यात यावी, ग्रामस्थ मौजे पिपळस, ता.राहाता, जिल्हा अहमदनगर यांना अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी

पारायण सोहळा आणि श्री.गोसावी पी.एस.,अध्यक्ष, सद्‌गुरु रामगिरी महाराज सेंवा संस्थान, मु.पो. वावी, ता.सिन्नर, जि.नाशिक यांना भागवत कथा व गाथा पारायण सोहळा कार्यक्रमासाठी प्रत्येकी रुपये १५,०००/-पर्यन्त वस्तुरुपाने मदत देण्यात यावी. तसेच जयबाबाजी खानेश्वर भक्त परिवार मोठेबाबावाडी, सायखिंडी, ता.संगमनेर, जिल्हा अहमदनगर यांचा श्रीक्षेत्र खानेश्वर मंदीर, मोठेबाबावाडी (सायखिंडी) येथे अखंड हरिनाम सप्ताह व सामुदायिक जपानुष्ठान कार्यक्रम सोहळा होऊन गेलेला असल्याने सदरहू कार्यक्रमास वस्तुरुपाने अर्थिक मदत देण्यात येऊ नये असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८. शिर्डी महोत्सव-२००५ बाबत**

**निर्णय क्र. ८०३.** उपरोक्त विषयानुसार सन २००४ सालात दि.२७/१२/२००४ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.४१, निर्णय क्र. १६८ अन्वये " शिर्डी महोत्सव - २००४ हा दि.२९/१२/२००४ ते दि.३१/१२/२००४ अखेर साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचा उद्देश हा चालू वर्षाचा शेवट व नवीन वर्षाची सुरुवात चांगल्यारितीने व्हावा असा आहे. मागील वर्षी सदरच्या कार्यक्रमास साधारणपणे रु. ९७,६१६/- (अक्षरी रु. सत्याण्णव हजार सहाशे सोळा मात्र) खर्च आलेला आहे. सन २००४ मध्ये सदरचा कार्यक्रम तीन दिवस साजरा करण्यात आला होता.

याहीवर्षी मागील वर्षाप्रमाणे शिर्डी महोत्सव साजरा करणेबाबत व त्या अनुषंगाने ७ मान्यवर गायकांचे व कलाकारांचे दि.२९/१२/२००५ ते दि.३१/१२/२००५ रोजी गायन व नृत्य कार्यक्रमास परवानगी मिळावी म्हणून पत्रे आलेली आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे ड्ड

| अ.नं. | कलाकाराचे नांव व पत्ता | तपशील | दिनांक | मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१. | सचिदानंद अप्पा, वेस्टर्न रेल्वे कॉलनी, ७७/४, माटुंगा रोड, मुंबई | एक शाम साईके नाम - कार्यक्रम | ३१/१२/२००५ रात्रौ शेजारतीनंतर. | रु.१२,०००/-जाणे-येणे भाडे, रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद. |
| ०२. | श्री पारस सी जैन, शिर्डी | भजन संध्या कार्यक्रम. | ३१/१२/२००५ वेळ -७ ते ९.३० | रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद. |
| ०३. | श्री प्रमोद रंगनाथ मेढी, कलाकार पुजारी, शिर्डी | भजन संध्या कार्यक्रम. | ३१/१२/२००५ रात्रौ शेजारतीनंतर | रु.२१,०००/- मुंबई येथील वाद्यवृंद व साऊंड सिस्टिमसह, रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद. |
| ०४. | श्री कुमार आनन्द रंजन, संस्थापक, अध्यक्ष, सत् श्री साई अध्यात्मिक मॅनेजमेंट एण्ड नेचर क्योर ऑर्गनायझेशन, न्यु दिल्ली. | भजन संध्या कार्यक्रम | ३१/१२/२००५ | ३० साथीदार - निवास व भोजन व्यवस्था, रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद. |
| ०५. | ए सुरेशचंद्र, द्वारकामाई , ९७ & ९८, दंडमुडी इनक्लेव्ह, पेठ बशीराबाद, हैद्राबाद - | कु.अनिंदिता हिचा " भरत नाट्यम् नृत्याचा कार्यक्रम. | २९/१२/२००५ सायं.७.०० ते ९.०० | रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद. २५ साथीदार यांची निवासव्यवस्था पेमेंट बेसीसवर. |
| ०६. | आरती दिक्षीत, व विलास आडकर, तेजस थिएटर्स, ६०, नारायण पेठ, पुणे -३० | निसर्गराजा व भक्तिधारा चा मराठी व हिंदी गीतांचा कार्यक्रम. | ३०/१२/२००५ ७.०० ते ९.३० | मानधन व येण्याचा जाण्याचा खर्च मिळून रु.३५,०००/-तसेच १८ जणांची निवास व भोजन व्यवस्था संस्थानने करावयाची आहे. लाईट व साऊंड सिस्टिम सह. |
| ०७. | चारुशीला बेलसरे, स्वरगायत्री प्रतिष्ठान, बी-९, अनुदत्त सोसायटी, पौड रस्ता, रामबाग कॉलनी, पुणे - | "रंग भक्तीचे" भक्तीसंगीत कार्यक्रम | दि.३०/१२/२००५ रात्रौ १०.३० ते १२.०० पर्यंत | मानधन व जाण्या-येण्याचे भाडे मिळून रु.२०,०००/- |

उपरोक्तप्रमाणे ०७ कलाकारांनी दि.२९/१२/२००५ ते दि.३१/१२/२००५ रोजी भजन संध्या , नृत्य व गायन कार्यक्रम सादर करणेस परवानगी मागितलेली आहे. उपरोक्त कलाकारांशी फोनवरुन संपर्क साधला असता त्यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली -

अ.नं. ०१ यांनी ( रु.१२,०००/- - जाणे -येणे भाडे) , रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद.व ०२ (यांचे पत्रावर मा.अध्यक्ष यांचा " श्री. वाकचौरे परवानगी द्यावी," असा शेरा आहे) यांनी संस्थानमार्फत रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद व अ.नं. ०३ यांनी रु.२१,०००/- - वाद्यवृंद व साऊंड सिस्टिमसह, रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद श्री प्रमोद मेढी हे स्वतः काहीही घेणार नाहीत, अ.नं.०४ यांनीही ३० साथीदार - निवास व भोजन व्यवस्था, रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद , अ.नं. ०५ यांनी रु.१/-, श्रीफळ, शॉल व उदीप्रसाद. २५ साथीदार यांची निवासव्यवस्था पेमेंट

बेसीसवर, अ.नं. ०६ यांनी मानधन व येण्याचा जाण्याचा खर्च मिळून रु.३५,०००/-१८ जणांची निवास व भोजन व्यवस्था संस्थानने करावयाची आहे. लाईट व साऊंड सिस्टिम सह व अ.नं. ०७ यांनी मानधन व जाण्या-येण्याचे भाडे मिळून रु.२०,०००/- याप्रमाणे मागणी केलेली आहे.

०२) तीन दिवसांच्या या महोत्सवासाठी खालीलप्रमाणे अंदाजित खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशील | तीन दिवस खर्च रक्कम |
|---|---|---|
| ०१. | स्टेज, ड्रेसींग रुम व ५०० खुर्च्यांसह बैठक व्यवस्था | रु. ००,२०,०००.०० |
| ०२. | जाहिरात, कापडी बॅनर्स व बोर्ड | रु. ००,१५,०००.०० |
| ०३. | कलाकार मानधन व प्रवास खर्च (अंदाजे तीन दिवसाकरीता कलाकार ) | रु. ०१,५०,०००.०० |
| ०४. | कलाकार निवास व्यवस्था | रु. ००,४५,०००.०० |
| ०५. | व्हि.डी.ओ.शुटींग व फोटोग्राफी | रु. ००,२०,०००.०० |
| ०६. | इतर किरकोळ खर्च | रु. ००,२०,०००.०० |
| | एकूण खर्च | रु. ०२,७०,०००.०० |

सदरचा कार्यक्रम श्री पुण्यतिथी उत्सव २००५ चा कलाकार कार्यक्रम ज्याठिकाणी झाला त्याठिकाणी केल्यास उत्तम प्रतिसाद मिळेल. तसेच सदरचे कार्यक्रम रात्रौ ४.३० पर्यंतच ठेवावे असे नम्र मत आहे. मागीलवर्षाप्रमाणे याहीवर्षी तीन दिवस कार्यक्रम ठेवावा . वेळ सायं. ७.०० ते ९.३० पर्यंत एक कार्यक्रम व रात्रौ शेजारतीनंतर ४.३० पर्यंत दुसरा कार्यक्रम ठेवावा याबाबत योग्य तो निर्णय होणे आवश्यक आहे. तीन दिवसाच्या या महोत्सवासाठी साधारणपणे अंदाजीत रु.२,७०,०००/- (अक्षरी रु. दोन लाख सत्तर हजार मात्र) खर्च येण्याची शक्यता आहे.

तथापि, उपरोक्त दर्शविलेल्या ०७ मान्यवर कलाकांराचे कार्यक्रम तारखा व वेळ निश्चिती मा.व्यवस्थापन समितीचे सभेत करणेबाबत व त्याकामी येणा-या अंदाजीत रक्कम रु. २,७०,०००/- (अक्षरी रु. दोन लाख सत्तर हजार मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-प्रशासन शाखा, वशी-०५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९. कु.शितल महाजन, पुणे यांना दक्षिण ध्रुवावर १२००० फुटावरुन पॅराशुट जम्प करणेकरीता आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र. ८०४.** उपरोक्त विषयास अनुसरुन मंत्री,मा.श्री अजित पवार यांनी त्यांचे दि.०८/११/२००५ चे पत्रान्वये कळविले आहे की, कु.शितल महाजन, ही पुणे येथील रहिवासी असून तिने दि.१८/०४/२००४ रोजी उत्तरध्रुवावर २,४०० फुटावरुन पॅराशूट जम्प करुन जागतिक विक्रम नोंदविला आहे. आता डिसेंबर २००५ मध्ये दक्षिण ध्रुवावार १२,००० फुटावरुन पॅराशूट जम्प करण्याचा तिचा मानस आहे. अशाप्रकारे जम्प मारणारी ती जगातील पहिलीच महिला ठरणार आहे. तिला यासाठी ८० ते ९० लाख रुपये खर्च येणार असून याकामी संस्थानकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत द्यावी, अशी विनंती केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, कु.शितल महाजन,रा.पुणे यांना डिसेंबर २००५ मध्ये दक्षिण ध्रुवावार १२,००० फुटावरुन पॅराशूट जम्प करणेकामी रुपये १० लाख आर्थिक मदत देण्यात यावी, याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी ,असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-६)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०. अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्रास आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र. ८०५.** मा.श्री.उमाकांत दांगट, अध्यक्ष (जिल्हाधिकारी), अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालय, अहमदनगर यांनी दि.१६/१२/२००५ चे पत्रान्वये " जुन्या पिढीच्या अथक परिश्रमातून जमा झालेल्या वस्तुंचे प्रदर्शन नव्या पिढीला घडविण्यासाठी १ मे १९६० रोजी ऐतिहासिक वस्तु संग्रहालय सुरु झाले. संग्रहालयात पन्नास हजाराच्या वर ऐतिहासिक कागदपत्र आहे, दहा हजारांवर हस्तलिखीत ग्रंथ असून त्यात सुमारे ७०% पोथ्या व मराठीतील संत काव्यरचना आहेत. त्यातील अनेक संतकवी तरी अज्ञात आहेत वा अनेक ज्ञात कवींच्या रचना तरी अज्ञात आहेत. त्यांच्या संशोधनासाठी महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठांचे एम. फील,पी.एच.डी चे विद्यार्थी व संशोधक येथे येत असतात. परंतु आपण त्यांना सर्व सुविधा पुरवू शकत नाही आणि त्यांची अशी खंत आहे की नगर येथेच असे संशोधन केंद्र सुरु का होत नाही.

त्यातून पूढे श्री साईनाथ मध्ययुगीन,ऐतिहासिक व सांस्कृतिक प्रगत संशोधन केंद्र सुरु करण्याची महत्वाकांक्षी योजना संस्थेच्या विश्वस्त मंडळाने हाती घ्यावी, अशी मागणी केली. त्यानुसार संस्थेचे अध्यक्ष (मा.जिल्हाधिकारी) यांचे नेतृत्वाखाली उपसमीतीने तयार केलेला हा प्रस्ताव सादर केला आहे, व आपल्याच नव्हे तर उभ्या महाराष्ट्राचे भूषण ठरणारे हे केंद्र सुरु करण्यासाठी नेतृत्व स्विकारावे अशी विनंती आहे. आपल्या विश्वस्त मंडळाने वा भक्तांनी विधायक सूचना केल्यास हा उपक्रम अधिक उपयुक्त होईल. आमचा दृढ संकल्प सुमारे एक कोटी रुपयांचा असून पहिल्या टप्प्यासाठी श्री साईबाबा संस्थानने किमान ७०,००,०००/- रु.ची देणगी देऊन उपक्रमास चालना द्यावी, अशी विनंती केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्राचे नुतनीकरणास रुपये ५० लाख देण्यास तत्वता: मान्यता देण्यात आली.याकामी राज्य शासनाची परवानगी

घेण्यात यावी. मा.जिल्हाधिकारी हे अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालय व संशोधन केंद्राचे अध्यक्ष असल्याने राज्यशासनाचे मान्यतेनंतर सदरहू रक्कम मा.जिल्हाधिकारी यांचे अधिपत्याखाली ठेवण्यात येऊन त्यासाठी ती खर्च करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३१. मुला-मुलींचे निरिक्षण गृह व बालगृह (रिमांड होम) अहमदनगर यांना आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र. ८०६.** मा.श्री.उमाकांत दांगट,जिल्हादंडाधिकारी व अध्यक्ष,डिस्ट्रीक्ट प्रोबेशन ॲण्ड आफ्टर केअर असोसिएशन संचलित,मुलामुलींचे निरीक्षण गृह व बालगृह अहमदनगर यांनी दि१४/१२/२००५ चे पत्रान्वये कळविले आहे की, " शासनाच्या निकषाप्रमाणे मुलामुलींचे निरीक्षण व बालगृह व निराधार बालकाश्रम या दोन उपक्रमातील लाभार्थ्यांसाठी १२४५० चौ.फुट एवढे विस्तारीत शयनकक्ष बांधकाम सुविधा उपलब्ध करुन देणे ही संस्थेची प्राधान्याने प्राथमिक गरज आहे. मुलामुलींच्या शयनकक्ष सुविधेमध्ये विधी संघर्षग्रस्त मुलामुलींचे बंदीकक्ष,अभ्यासिका,वाचनालय कक्ष,डिस्पेन्सरी रुम, आजारी मुलामुलींपासून इतर मुलामुलींना आजार होऊ नये यासाठी मुलांना वेगळे ठेवण्यासाठी स्वतंत्र कक्ष, स्वच्छतागृह व स्नानगृहे या बांधकामासाठी अंदाजे रुपये ६८ लाख व तांत्रिक प्रशिक्षण व सामान्य ज्ञान कक्ष उभारणे, संगणक कक्षाचे बांधकामासाठी अंदाजे खर्च रुपये ११ लाख एवढा आहे. या प्राधान्यक्रमाने मुलभूत गरजांच्या पुर्ततेसाठी एकूण रुपये ७९ लाख अर्थ सहाय्य आवश्यक आहे. शासनाच्या बिकट परिस्थीतीमुळे संस्था नियोजीत बांधकाम पुर्ण करणेस असमर्थ आहे. तरी संस्थेच्या अर्जाचा सहानुभुतीपूर्वक विचार करुन संस्थेस भरीव अर्थ सहाय्य मंजूर करावे, अशी विनंती केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मुला-मुलींचे निरिक्षण गृह व बालगृह (रिमांड होम) अहमदनगर विस्तारीत शयनकक्ष बांधकामासाठी रुपये ५० लाख देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.याकामी राज्य शासनाची परवानगी घेण्यात यावी. मा.जिल्हाधिकारी हे मुला-मुलींचे निरिक्षण गृह व बालगृह (रिमांड होम) अहमदनगर अध्यक्ष असल्याने राज्यशासनाचे मान्यतेनंतर सदरहू रक्कम मा.जिल्हाधिकारी यांचे अधिपत्याखाली ठेवण्यात येऊन ती खर्च करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३२. श्री आय आर जोशी ॲण्ड कंपनी ॲडव्होकेट, सॉलीसिटर ॲण्ड नोटरी, मुंबई यांना संस्थान कामासाठी पॅनेलवर/ मानधनावर घेणे बाबत.**

**निर्णय क्र. ८०७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३३. डॉ.विद्याधर गोपाळराव टाकळकर, वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांचे कंत्राटी सेवेच्या मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र. ८०८.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०२/२००५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.८९ अन्वये डॉ.विद्याधर गोपाळराव टाकळकर यांची जा.नं.एसएसएस/वशी-१/१५१६/२००५ दि.११/०२/२००५ चे आदेशान्वये श्री साईनाथ रुग्णालय व संस्थान मार्फत नव्याने सुरु करण्यात येत असलेल्या श्री साईबाबा हॉस्पिटल या दोन्ही रुग्णालयाकरीता एक वर्ष मुदतीसाठी प्रति महिना रु.३०,०००/- (रु. तीस हजार ) मात्र एकत्रित मानधनावर वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये या पदावर नेमणूक करण्यात आलेली आहे व ते दि.१७/०१/२००५ रोजी कामावर हजर झालेले आहेत.त्यांचे १ वर्षाचा तात्पुरते सवेचा कालावधी दि.१६/०१/२००६ अखेर संपुष्टात येत आहे.

प्रशासकिय अधिकारी रुग्णालये यांनी दि.१०/१२/२००५ रोजी अहवाल सादर करुन त्यातः-

"साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी मार्फत नव्याने श्री साईबाबा हॉस्पिटल सुरु करण्यात येत आहे.डॉ.टाकळकर कामावर हजर झाले त्यावेळी सदर रुग्णालयाचे बांधकाम अपूर्ण होते.त्यानुसार आता सदर रुग्णालयास आवश्यक असणारी अद्ययावत मशिनरी खरेदी करणे तसेच शिपफ्टींग करणेचे काम जवळजवळ पूर्णत्वास आले असून त्यासाठी साधारण एक महिना कालावधी आवश्यक आहे.

मशिनरी व फर्निचर खरेदी करण्यात आले असून आणखी मशिनरी व फर्निचर खरेदी बाबत कार्यवाही चालू आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल करीता आवश्यक असलेले वैद्यकीय अधिकारी तज्ञ वैद्यकीय अधिकारी तसेच इतर पॅरामेडीकल स्टाफ बाबत आवश्यक असलेला ५४१ कर्मचा-यांचा सेवक आकृतीबंध शासनाकडे मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

श्री साईबाबा रुग्णालयासाठी संगणकीकरण करण्याचे काम चालू असून लवकरच नवीन संगणकीय प्रणाली कार्यान्वीत होईल.

सदर रुग्णालयाची क्षमता २०० खाटांची असून त्यामध्ये आय.सी.सी.यु, ऑपरेशन थिएटर, सी.टी.स्कॅन,कलर डॉपलर,क्ष-किरण, जनरल वॉर्ड,कॅथलॅब, डायलेसीस इत्यादींचा समावेश आहे. उपरोक्त बाबी विचारात घेता,पूर्ण झालेल्या व शिल्लक कामाचा विचार करता प्रकल्प पूर्णत्वाने चालू होऊन त्याचा फायदा रुग्णास मिळणे बाकी आहे. व सदर काम तातडीने पूर्ण करावयाचे आहे. डॉ.टाकळकर,वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांनी जबाबदारीने कामे पूर्ण केलेली आहेत. व शिल्लक असलेले रुग्णालयाचे कामकाज पूर्ण करणे आहे.प्रत्यक्ष रुग्णालयाची सुरुवात होणे बाकी आहे. यासाठी त्यांना एक वर्ष मुदतवाढ द्यावी असे कळविले आहे.

त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य व रुग्णालय समितीचे अध्यक्ष मा.डॉ.प्यारेलाल तिवारी यांनी "Dr.Takalkar is compitent Doctor. His services are useful to Sansthan. Therefore he may be given extention." असा शेरा दिलेला आहे.

तसेच,"हॉस्पिटल स्टाफ पॅटर्न मंजूर होणे बाकी आहे. त्यास लागणारा कालावधी तसेच चालू असलेल्या कामाचे गतीस बाधा येऊ नये म्हणून तूर्त ६ (सहा) महिनेकरीता मुदतवाढ देणेस हरकत नाही असे." मा.व्यवस्थापन समितीचे व रुग्णालय समितीचे सदस्य मा.डॉ.एकनाथ गोंदकर यांनी अभिप्राय दिले आहेत.

डॉ.विद्याधर टाकळकर यांचे कंत्राटी पध्दतीचे मुदतवाढीबाबतची टिपणी व त्यावरील मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य व रुग्णालय निवड समितीचे अध्यक्ष डॉ. प्यारेलाल तिवारी तसेच मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य व रुग्णालय समितीचे सदस्य डॉ. एकनाथ गोंदकर यांचे अभिप्राय विचारात घेता डॉ.टाकळकर यांना पूर्वीच्याच रु.३०,०००/- (रु.तीस हजार) मात्र प्रति महाच्या मानधनावर दि.१७/०१/२००६ पासून पूढे सहा महिन्यांसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३४. अ‍ॅड.कुलदीप पाटील व अ‍ॅड.विनोद शहा, मुंबई यांची अ‍ॅडव्होकेट पॅनेलवर नेमणूक होणेबाबत.**

**निर्णय क्र. ८०९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३५. वैद्यकीय अधिकारी या पदांसाठी प्रसिद्ध झालेल्या जाहीरातीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र. ८१०.** वरिष्ठ प्रशासक रुग्णालये, यांनी दि.०५/१२/२००५ रोजी सादर केलेल्या टिपणीने, मा.पी.एल. तिवारी, सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी दि.०५/१२/२००५ रोजी दूरध्वनीवरुन खालील पदांसाठी जाहीरात द्यावी अशी सूचना दिलेली आहे.पदांबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

| SRNo. | Name of the post | No.of post | Qualifications & Experience. |
|---|---|---|---|
| 01. | Sr.Radiologist | 01. | M.D. (Radiology) Min.5yrs. Experience. |
| 02. | Sr.Intensivist | 02 | M.D.(Med/Anaesthesia) Dip. in intensive care 5yrs.experience preferable. |
| 03 | Perfusionist | 02. | B.Sc.Dip.in perfusion Tech. |
| 04. | Dy.Medical Administrator | 01. | M.B.B.S.M.Phil (Hospital Administration) |
| 05. | Cardiologist (Interventional) | 02. | M.D.(Med) D.M.(Card) 2 yrs. experience preferable. |
| 06 | Gen.Surgeon | 01 | M.S.Gen.Surgery 2 yrs. experience preferable. |
| 07 | Gen.Physician | 02 | M.D.(Medician)2yrs.experience preferable. |
| 08 | Paediatrician | 02. | M.D.(Paed) Exp.preferable. |

याआधी वैद्यकीय अधिकारी या पदांसाठी खालीलप्रमाणे वर्तमानपत्रात तीन वेळेस जाहीरात प्रसिध्द केली आहे.

| अ.नं. | दिनांक | वर्तमानपत्रांचा तपशील | जाहीरातीचा आलेला खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | दि.२७/११/२००४ | ०१) टाईम्स ऑफ इंडिया,मुंबई<br>०२) इंडियन एक्सप्रेस,पुणे<br>०३) दैनिक सकाळ,सर्व आवृत्या<br>०४) दैनिक लोकमत,शॉपीयर मनीसेवर पॅकेज (औ.बाद, नाशिक पुणे) | रुपये-१,९४,०००/- |
| ०२ | दि.०१/०९/२००५. | ०१) टाईम्स ऑफ इंडिया,मुंबई (सदर वृत्तपत्राचे जाहीरातीचे बुकींग दि.०८/०९/२००५ पर्यंत पूर्ण झालेले असल्याने या वृत्तपत्राने जाहीरात प्रसिध्द केलेली नाही.<br>०२) इंडियन एक्सप्रेस,पुणे<br>०३) दैनिक सकाळ,सर्व आवृत्या<br>०४) दैनिक लोकमत,शॉपीयर मनीसेवर पॅकेज (औ.बाद, नाशिक नाशिक पुणे) | रुपये-१,६३,२००/- |
| ०३ | ०७/१२/२००५. | ०१) टाईम्स ऑफ इंडिया,मुंबई<br>०२) इंडियन एक्सप्रेस,पुणे<br>०३) दैनिक सकाळ,सर्व आवृत्या | बीले अद्याप येणे आहेत. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ०४) दैनिक लोकमत,शॉपीयर मनीसेवर पॅकेज (औ.बाद, नाशिक पुणे) | |

मा.व्यवस्थापन समितीचे सदस्य व रुग्णालय समितीचे अध्यक्ष मा.डॉ.पी.एल.तिवारी.यांचे आदेशाने,वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांचे प्रस्तावानुसार आता दि.१३/१२/२००५ रोजी उपरोक्त प्रमाणे हुद्देवारींसाठी जाहीरात प्रसिध्दीस देण्यात आलेली असून उमेदवारांना अर्ज करण्यासाठी जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून पुढे १० दिवसांची मुदत देण्यात आलेली आहे.तरी प्रसिध्दीस दिलेल्या जाहीरातीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधीक्षक, आस्थापना )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३६. आरक्षण क्र.०८ सर्व्हे न.०६ मधील श्री.अशोक कुमार मलहोत्रा यांचे १ आर जमीन भू-संपादनाने घेण्याबाबत.**

**निर्णय क्र. ८११.** मौजे शिर्डी येथील आरक्षण क्रमांक ८ स.नं मधील क्षेत्र प्राथमिक शाळा व क्रिडांगणासाठी राखीव आहे यामध्ये श्री. अशोक कुमार मल्होत्रा स. नं ६/२/२ब/१ क्षेत्र १ आर जमीन येते. सदर जमीन भू संपादनाने घेणे बाबत मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०२/१०/२००५ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्रमांक ५९८ खालील प्रमाणे झालेला आहे.

" ..... १) श्री. अशोक कुमार मल्होत्रा यांची जमीन स.नं ६/२/२ब/१ क्षेत्र ०-०१ आर भू संपादनाने घेणे बाबत प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस पाठविणे "

उपरोक्त निर्णयाप्रमाणे मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे श्री. अशोक कुमार मल्होत्रा यांची जमीन घेणेबाबत भू संपादनाचा प्रस्ताव दिनांक ०२/१२/२००५ रोजी पाठविणेत आलेला आहे.

श्री. अशोक कुमार मल्होत्रा यांनी दिनांक ०६/१२/२००५ रोजी त्यांची जमीन संस्थानने रक्कम रुपये ५५,०००/- ला विकत घ्यावी म्हणून अर्ज दिला.

मा. व्यवस्थापन मंडळाच्या दिनांक १५-१६/१०/२००२ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५०५ अन्वये आरक्षण क्रमांक ८ ( सर्व्हे नं ६ ) मधील जागा प्रती आर ५५,०००/- या दराने खरेदी करणे बाबत निर्णय झालेला आहे.

श्री अशोक कुमार मल्होत्रा यांची जमीन स.नं ६/२/२ब/१ पैकी ( नवा स.नं ६/६१ ) पैकी हेक्टर ०-०१ आर जागा रक्कम रुपये ५५,०००/- पंच्चावन्न हजाराला फक्त खरेदी घेतलेली आहे.

श्री अशोक कुमार मल्होत्रा यांनी संस्थान त्यांना त्यांच्या जमिनीच्या खरेदीसाठी फक्त ५५,०००/- पंच्चावन्न हजार रुपये देत आहे. त्यामुळे ते फक्त रक्कम रुपये ५५,०००/- एवढयाच रकमेवर इनकम टॅक्स भरणार आहेत. त्यापेक्षा जास्त रक्कम विचारात घेऊन त्या रक्कमेवर इनकम टॅक्स आकारण्यात आला तर तो संस्थानने भरावा व त्याप्रमाणे खरेदी खतामध्ये नमूद करण्यात यावे असे दिनांक ०६/१२/२००५ रोजीच्या अर्जात विनंती केली आहे. यांस अनुसरून खरेदी खतामध्ये " .... तुम्हापासून (संस्थानपासून ) घेतलेली रक्कम रुपये ५५,०००/- या रुपये पर्यंत इनकम टॅक्स लिहून देणार यांनी भरावयाचा आहे. मात्र या रकमेपेक्षा जास्त रकमेवर इनकम टॅक्स भरावा लागला तर तो तुम्ही म्हणजेच संस्थानने भरावयाचा आहे. रक्कम रु ५५,०००/- पर्यंतच येणा-या इनकम टॅक्स भरण्याची जबाबदारी लिहून देणार यांची आहे " अशी अट/कलम नमूद केलेले आहे.

श्री अशोक कुमार मल्होत्रा यांचा स.नं ६/६१ क्षेत्र हेक्टर ०-०१ आर जमिनीची खरेदी खताचे स्टॅम्प डयुटीसाठी सरकारी किंमत २,९४,०००/- होत आहे त्याप्रमाणे खरेदी खतासाठी स्टॅम्प रक्कम रुपये १४,७००/- घेण्यात आलेला आहे. व खरेदी खत जमिनीचा ताबा घेऊन पूर्ण करणेत आलेले आहे. खरेदी खतामध्ये स्टॅम्प ड्युटीसाठी जमीनीची किंमत रुपये २,९४,०००/- दर्शविलेली आहे. त्यामुळे इन्कमटॅक्स खात्याकडून सदर रकमेवर पुढे मागे इन्कमटॅक्सची आकारणी झाल्यास खरेदी खतात संस्थानने मान्य केलेल्या अटीप्रमाणे रुपये ५५,०००/- किंमतीपेक्षा जास्त रकमेवरील इन्कमटॅक्स भरणा त्या खात्यास संस्थानला करावा लागणार आहे. सदरचे अटीसह झालेले खरेदी खतास मान्यता मिळणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेले प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच, सदरचे खरेदीखतामुळे श्री.मल्होत्रा यांची जमीन संस्थानला प्राप्त झाली असल्यामुळे मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे प्रस्तुत जमीनीचा पाठविलेला भू-संपादनाचा प्रस्ताव मागे घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३७. श्रीसाई समर्थ कला-क्रिडा-सांस्कृतिक मंडळ,शिर्डी यांना आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र. ८१२.** श्रीसाई समर्थ कला-क्रिडा-सांस्कृतिक मंडळ, शिर्डी यांनी त्यांचे दिनांक १६.१२.२००५ चे पत्रानुसार, सुमारे १७ वर्षांपासून त्यांचे मंडळ श्रीसाईबाबा सस्थानच्या अमोल सहकार्याने शिर्डीचे पावनभूमीत साईनगरच्या मैदानावर क्रिकेटच्या राज्यस्तरीय भव्य अशा टेनिस बॉल डे-नाईट स्पर्धांचे आयोजन

करीत आलेले असून, याही वर्षी दिनांक १८ जानेवारी,२००६ पासून भव्य अशा "नगराध्यक्ष चषक" स्पर्धेचे आयोजन केलेले आहे.

त्यासाठी त्यांनी साईनगरच्या मैदानावर स्पर्धा घेण्यासाठी परवानगी, तसेच खेळाडूंसाठी खालीलप्रमाणे खर्च व मदत श्रीसाईबाबा संस्थानकडून मिळावी अशी विनंती केलेली आहे.

०१) साईबाबा चषक रोख रक्कम -प्रथम बक्षिस - रुपये ५१,०००/-

०२) विद्युत् खर्च-

अ) १००० वॅटस् चे १०० हॅलोजन बल्ब व उभारणी अंदाजे खर्च रुपये ४५०००/-

ब) टॉवर उभारणी एकूण ८ टॉवर, ३० फुट उंचीचे अंदाजे खर्च रुपये १५,०००/-

०३) स्टेज व पॅव्हीलीयन-

०४) ध्वनी व्यवस्था -

०५) मैदान- (टॅक्टर व जेसीबीची आवश्यकता)

०६) निवासस्थान व्यवस्था- खेळाडूंची निवास व्यवस्था-चार्जेस भरुन

०७) प्रसाद भोजन व्यवस्था- चार्जेस भरुन

०८) खेळाडूंसाठी पाणी पिण्याची व्यवस्था-

०९) स्पर्धेचे ठिकाणी कॅन्टीन व्यवस्था-

यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१८जानेवारी,२००६ पासून सुरु होणाऱ्या नगराध्यक्ष चषक स्पर्धेसाठी प्रथम बक्षिस रुपये ५१,०००/- तसेच क्र.२ ते ९ चे सोईसाठी योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. खेळाडूंची प्रसाद भोजन व निवासव्यवस्था मंडळातर्फे करण्यात येणार आहे.

(कार्यवाही-प्रशासनशाखा -वशी३/वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३८. संस्थानला देणगी देणाऱ्या भक्तांना सुविधा देणेबाबत.**

**निर्णय क्र. ८१३.** देणगी देणाऱ्या भक्तांना कोणत्या सुविधा उपलब्ध करुन देता येतील याबाबत इतर देवस्थानला भेटी देऊन त्या ठिकाणी काय काय सुविधा आहेत याची माहिती घेणेकामी मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव,मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांची समिती स्थापन करण्यात आली. या समितीने विविध देवस्थानांना भेटी देऊन आपला अहवाल व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा, असे ठरले. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३९. श्रीसाईबाबा संस्थानचे सर्व इमारतींमधील भक्तांचे निवासस्थानात श्रीसाईबाबांचा फोटो लावणेबाबत.**

**निर्णय क्र. ८१४.** श्री साईबाबा संस्थानचे बांधण्यात आलेल्या निवासस्थानांमध्ये शिरडी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणारे साईभक्त वास्तव्य करतात. या भक्तांचे वास्तव्यासाठी देण्यात येत असलेल्या इमारतीतील प्रत्येक खोल्यांमध्ये श्रीसाईबाबांचा संस्थानचा अधिकृत फोटो लावण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक,चौकशी व निवासस्थान/अधिक्षक,भक्तनिवास/धर्मशाळा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४०. पुरवठा धारकांकडून ५% सुरक्षा रक्कम जमा ठेवणेबाबत.**

**निर्णय क्र.८१५.** संस्थानला माल पुरवठा करणाऱ्या पुरवठाधारकांकडून मालाचा पुरवठा करतांना ५% सुरक्षा रक्कम अनामत म्हणून ठेऊन घेण्यात येते. यासंबधी मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी चर्चा केली व या प्रथेमुळे पुरवठाधारक अडचणीत येतात व पुरवठा करण्यास टाळाटाळ करतात. असे होऊ नये म्हणून यापुढे व या आर्थिक वर्षातील मागील प्रकरणी अशा प्रकारचे धोरण न राबविता पुरवठाधारकांकडून ५% क्षमतेचे बँक गॅरंटी पत्र घेण्यात यावे, असे ठरले. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४१. दिनांक १८.१२.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या वैद्यकीय अधिकारी (पूर्णवेळ/मानद कन्सलटंट) पदाच्या मुलाखतीचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.८१६.** दिनांक १८.१२.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या वैद्यकीय अधिकारी (पूर्णवेळ/मानद कन्सलटंट) पदाच्या मुलाखतीचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या त्याची नोंद घेण्यात आली. या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली

**अ)** सर्व मानद डॉक्टरांना एकत्र बोलावून घेण्यात आले. व त्यांच्या समोर मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांनी संस्थानची भूमिका मांडली. संस्थान तीन प्रकारच्या तज्ञांच्या सेवा घेऊ इच्छिते. प्रत्येक शाखेसाठी

०१) पूर्ण वेळ कन्सल्टंट ०२) मानद कन्सल्टंट ०३)व्हिजिटिंग कन्सल्टंट

**अ) पूर्ण वेळ कन्सल्टंट** - हे संस्थान सेवेत कायम स्वरुपी काम करतील.

**ब) मानद कन्सल्टंट** - हा स्वतःच्या शाखेत किमान ५ वर्षे जेष्ठता असणारा असावा. यांना प्रतिमाह रु.१,५००/- मानधन देण्यात येईल. व त्यांच्या कामाच्या स्वरुपानुसार मिळणा-या उत्पन्नातील

वाटा हा संस्थानच्या नियमानुसार राहील. हे नियम शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आले असून मान्यतेनंतर ते लागू करण्यात येतील व त्याची कल्पना सर्व कन्सल्टंटना देण्यात येईल. या कन्सल्टंटनी आपले रुग्णही येथे येऊन सेवा घेतील हे पहाणे जरुरीचे आहे. जेणे करुन त्यांच्या सेवांचा लाभ संस्थानला व्हावा. त्यांच्या सेवा संबंधी वर्षा अखेर फेर आढावा घेण्यात येईल व ज्यांच्या सेवा संस्थानसाठी लाभदायक ठरतील अशांच्याच सेवा पुढे चालू ठेवण्यात येतील.

क) **व्हिजिटिंग कन्सल्टंट** - या वर्गात अंतर्राष्ट्रीय किर्तीचे व या विषयात अग्रगण्य असणारे जेष्ठ व श्रेष्ठ तज्ञ असतील. त्यांच्या सेवेसंबंधी संस्थान विशेष लक्ष देईल व त्यासंबंधी खास नियोजन केले जाईल.

या प्रकारच्या विभागणी नुसार कन्सल्टंट वर्गाच्या नेमणूका करण्यात याव्यात. मानद व व्हिजिटिंग वर्गातील तज्ञांच्या सोयीचे दिवस किंवा तारखा विचारात घेऊन पुढील नियोजन करण्यात यावे. आलेल्या डॉक्टरापैकी ज्यांची जेष्ठता ५ वर्ष व त्यापेक्षा जास्त असेल त्यांचा विचार व्हावा, व त्यांना नेमणूकीचे पत्र देण्यात यावे. न्युरो सर्जरी, ऑबस्टेस्टिकस व गायनेकॉलॉजी विभाग आपण तुर्त सुरु करीत नसल्यामुळे त्यांच्या नेमणूका स्थगित ठेवाव्यात असे ठरले. खालील वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्तीसाठी निवड करण्यात आली.

**Visiting Consultant in Cardiology**

| | | |
|---|---|---|
| 1. | Dr. Ashwin B. Mehta | MD., F.A.C.C., F.C.C.P., F.I.S.E., F.I.C.P. |
| 2. | Dr. P.L. Tiwari | MD., M.R.C.P., F.R.C.P. |
| 3. | Dr. Anil Kumar | MD., DM. |

**Visiting Consultant in Cardiac Surgery**

| | |
|---|---|
| 1. | Dr. S.S. Bhattacharya |
| 2. | Dr. D.S. Saxena |
| 3. | Dr. Ramakant Panda |

**Visiting Consultant in Onco Surgery**

| | |
|---|---|
| 1. | Dr. G.T. Hegde |

**Visiting Consultant in Neuro Surgery**

| | |
|---|---|
| 1. | Dr. K.E. Turel |
| 2. | Dr. C.E. Deopujari |

**Visiting Consultant in Orthopedic Surgery**

| | |
|---|---|
| 1. | Dr. H.R. Jhunjhunwala |
| 2. | Dr. Nilen Shah |

**Visiting Consultant in Spiral Surgery**

| | |
|---|---|
| 1. | Dr. Sameer Dalvi |

**Visiting Consultant in General Surgery**

| | |
|---|---|
| 1. | Dr. A.G. Nande |

**Hon. Consultant in Cardiology**

| | | |
|---|---|---|
| 1. | Dr. M.B. Chopda | M.D., D.M. |
| 2. | Dr. V.M. Vijan | M.D., D.M. |
| 3. | Dr. Sunil Sonwane | M.D., D.N.B. |
| 4. | Dr. A. Dharmadhikari | M.D., D.N.B. |
| 5. | Dr. S.S. Deshmukh | M.D., D.M. |
| 6. | Dr. Girish Sawant | M.B.B.S., D.N.B., I.C.C.P. |
| 7. | Dr. Ajay Chaurasiya | M.D., D.M. |

**Hon. Consultant in Cardiac Surgery**

| | | |
|---|---|---|
| 1. | Dr. Anirudh Trivedi | |
| 2. | Dr. A.P. Deodhar | M.S., M.C.H., F.R.C.S. |
| 3. | Dr. R.N. Umbarkar | M.S., M.C.H. |
| 4. | Dr. Ali Behrinwalla | |
| 5. | Dr. Abhay Walia | |

**Hon. Consultant in Urology**

| | |
|---|---|
| 1. | Dr. A.D. Mahajan |
| 2. | Dr. R.R. Patni |
| 3. | Dr. Sharad Somani |
| 4. | Dr. J.V. Dhahalia |

**Hon. Consultant in Medical Oncology**

| | |
|---|---|
| 1. | Dr. S.A. Bondarde |

**Hon. Consultant in Oncosurgery**

| | |
|---|---|
| 1. | Dr. Sanjay Sharma |
| 2. | Dr. U.V. Takalkar |
| 3. | Dr. R.R. Sauji |
| 4. | Dr. Dhairyasheel N. Sawant |
| 5. | Dr.Kumthekar, Solapur |

**Honorary Consultant in Neurosurgery**

| | |
|---|---|
| 1. | Dr. Hitendra Gadkari |
| 2. | Dr. Y.B. Vargantwar |

**Honorary Consultant in Neurology**

| | |
|---|---|
| 1. | Dr. S.S. Varade |

**Honorary Consultant in Plastic Surgery**

| | |
|---|---|
| 1. | Dr. N.G. Naik |
| 2. | Dr. Manish Patel |
| 3. | Dr. J.J. Kulkarni |
| 4. | Dr. K.K. Agrawal |

**Honorary Consultant in Maxillofacial Surgery**

| | |
|---|---|
| 1. | Dr. C.R. Tambe |
| 2. | Dr. Sonia Jindal |

**Honorary Consultant in Orthopedic Surgery**

| | |
|---|---|
| 1. | Dr. D.B. Shirsath |
| 2. | Dr. Tushar Deore |
| 3. | Dr. H.A. Chiniwala |

**Honorary Consultant in Radiology**

| | |
|---|---|
| 1. | Dr. (Mrs.) Dharmadhikari |

**Honorary Consultant in General Medicine**

| | |
|---|---|
| 1. | Dr. Manohar Katkar |
| 2. | Dr. S.R. Digholkar |

**Honorary Consultant in General Surgery**

| | |
|---|---|
| 1. | Dr. D.V. Nene |
| 2. | Dr.Rajesh Mali, Kopergaon |

**Honorary Consultant in Diabetology**

| | |
|---|---|
| 1. | Dr. S. Indurkar |

**Honorary Consultant in Ophthalmology**

| | |
|---|---|
| 1. | Dr. N.B. Shah |
| 2. | Dr. Jimit N.Choudhary |

**Honorary Consultant in ENT**

| | |
|---|---|
| 1. | Dr. R.B. Jaiswal |
| 2. | Dr. Milind Nawlakhe |

**Honorary Consultant in Anaesthesiology**

| | |
|---|---|
| 1. | Dr. D.D. Lahire |

**Honorary Consultant in Pediatrics**

| | |
|---|---|
| 1. | Dr. Madhumita Agrawal |

**Honorary Consultant in Nephrology**

| | |
|---|---|
| 1. | Dr. Shrirang Bicchu |
| 2. | Dr. Devdatta Chafekar |

**Honorary Perfusionist**

| | |
|---|---|
| 1. | Mr. Jintendra Khairnar |

ब) पूर्ण वेळ कन्सलटंटपैकी तीन उमेदवार उपस्थित होते.

१) डॉ.ए.जे.कुलकर्णी,नुलकर, जनरल सर्जन असून त्यांना पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमणूक देण्यास मान्यता देण्यात आली.

२) डॉ.सौ.अनिता सी.वेगास या त्वचारोग तज्ञ असून त्यांना पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमणूक देण्यास मान्यता देण्यात आली.

३) डॉ.सचिन उन्डे हे डोळयाचे तज्ञ असून त्यांची निवड करण्यात आली असून त्यांचा योग्यवेळी नियुक्तीसाठी विचार व्हावा, असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/वरिष्ठ प्रशासक रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४२. संस्थानला अकुशल,कुशल व सुरक्षा कामगार कंत्राटी पध्दतीने पुरविणारे लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीस /करारास मुदतवाढ देणे बाबत.**

**निर्णय क्र.८१७.** संस्थानला कंत्राटी पद्धतीने अकुशल, कुशल कामगार पुरविण्यासाठी श्री.महेंद्र मोहनीराज गंधे, अहमदनगर व बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इं) लिमीटेड, नाशिक तसेच सुरक्षा कर्मचारी पुरविणेसाठी मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा. लि.,मुंबई यांची दिनांक १.८.२००३ पासून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर लेबर व सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे कराराचा/ठेकेदारीचा कालावधी दिनांक ३१.०७.२००४ अखेर संपुष्टात आल्यानंतर त्यांचे कराराची/ठेकेदारीची मूदत आहे त्याच अटी व शर्तीवर दिनांक १.०८.२००४ पासून दिनांक ३१.१२.२००५ अखेर पर्यंत वेळोवेळी वाढविण्यात आलेली आहे. संबंधीत लेबर व सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांची वाढीव मूदत दिनांक ३१.१२.२००५ अखेर संपुष्टात येत आहे.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांना पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी लागणारे अकुशल, कुशल व सुरक्षा कामगार कंत्राटी पद्धतीने पुरविणेकामी मान्यता प्राप्त कंत्राटदारांची/ठेकेदारांची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. सिलबंद निविदा फॉर्मस् विक्रीची मूदत दिनांक ६.६.२००५ पासून ते दिनांक १८.६.२००५ अखेर पर्यंत अशी होती. तसेच सिलबंद निविदा स्वीकारण्याची अंतिम मूदत दिनांक २०.६.२००५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

त्यास अनुसरुन संस्थानमध्ये लागणारे अकुशल,कुशल व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पद्धतीने पुरविणेकामी मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून एकूण ४२ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर ४२ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.९.७.२००५ रोजीचे सभेपुढे उघडणेत येऊन, त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन, निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी दिनांक १४.८.२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उपस्थित राहणेकामी कळविणेत आले होते. त्याप्रमाणे सदर सभेमध्ये उपस्थित निविदाधारकांशी/ ठेकेदारांशी त्यांचे निविदांसंदर्भात चर्चा/वाटाघाटी करणेत येऊन पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी संस्थानला कंत्राटी पद्धतीने अकुशल,कुशल कामगार पुरविणेकामी मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व क्रिस्टल ट्रेडकॉम प्रा.लि.,मुंबई तसेच संस्थानला कंत्राटी पद्धतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी मे.सुपर प्रोटेक्शन सिक्यूरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई व शिवा इंडस्ट्रियल सिक्यूरिटी एजन्सी (गुजरात) प्रा.लि.,मुंबई यांच्या निविदा निर्णय क्र.४७० अन्वये मंजूर करण्यात आलेल्या आहेत. संबंधीत चार एजन्सीज यांना वर्क ऑर्डर देणे, लेबर लायसेन्सची पूर्तता करुन घेणे, करारनामा करुन घेणे इ.कार्यवाहीस सुमारे एक महिन्यांचा कालावधी लागणार आहे.

याकरीता श्री महेंद्र मोहनीराज गंधे, अहमदनगर व बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इं) लिमिटेड, नाशिक यांचे मार्फत पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी अकुशल/कुशल कामगारांच्या ठेकेदारीस /करारास तसेच मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि. मुंबई यांचेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या ठेकेदारीस /करारास सध्याच्या कंत्राटासंबधातील करारातील अटी व शर्तीसच अनुसरुन व त्याच अटी शर्तीचे अधीन राहून दिनांक ०१.०१.२००६ पासून पुढे एक महिना मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.४३. संस्थानचे लेखाशाखेतील रोखपाल विभागात घडलेल्या घटनेबाबत.**

**निर्णय क्र.८१८.** संस्थानमध्ये लेखाशाखा विभागात रोखपाल श्री.लक्ष्मण सदाशिव चव्हाण यांचे मदतीस असलेला कंत्राटी कर्मचारी, श्री.राजेंद्र किसन चौधरी यांनी संस्थानचे रकमेचा अपहार करुन नंतर ते प्रकरण उघडकीस आल्यानंतर त्याचा भरणा संस्थानमध्ये केलेला आहे. त्यानंतर वर्तमानपत्रात याबाबत वेळोवेळी बातम्या प्रसिद्ध झाल्या व त्यामुळे संस्थानची बदनामी झालेली आहे. या प्रकरणी श्री.जयंत वझे, वरिष्ठ लेखापाल यांना जा.नं.एसएसएस-वशी७ए-३०१०-२००५ दिनांक ८.१२.२००५ व श्री. लक्ष्मण चव्हाण, मुख्य रोखपाल यांना जा.नं.एसएसएस-वशी७ए-३००९-२००५ दिनांक ८.१२.२००५ अन्वये निलंबित करण्यात आलेले असून, श्री.अशोक काळे, लेखाधिकारी व श्री.अशोक औटी, अतिरिक्त लेखाधिकरी यांना कारणे दाखवा नोटीसा देण्यात आलेल्या आहेत व श्री.राजेंद्र चौधरी, कंत्राटी कर्मचारी यांना कामावरुन बंद करणेत आलेले असून जा.नं.एसएसएस-वशी-७ए-३०९१-२००५ व जा.नं.एसएसएस-वशी-७ए-३०९३-२००५ दिनांक १६.१२.२००५ अन्वये ॲडव्होकेट श्री बी.वाय

काळवाघे यांचेकडे खातेचौकशीचे काम सोपविण्यात आलेले असलेबाबत माहिती मा.कार्यकारी अधिकारी यांनी सभेस दिली.

याबाबत सभेने श्री. चौधरी हे कंत्राटी कर्मचारी असताना देखील त्यांचेकडे संस्थानचे पैशाचा व्यवहार का दिला तसेच सदर प्रकरणाबाबत पोलीस स्टेशनला तक्रार का नोंदविण्यात आलेली नाही याबाबत विचारणा केली. त्याचप्रमाणे या घटनेस जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीसा बजावून त्यांचा खुलासा मागविण्यात यावा व त्यानुंसार या प्रकरणाची सखोल चौकशी करणेकामी अॅड.मा.श्री.रायभान गमाजी चिने, यांची नियुक्ती करण्यात यावी. त्यांना कडक शासन करण्यात यावे. या प्रकरणाचा मुख्य आरोपी कंत्राटी कर्मचारी श्री.राजेंद्र चौधरी यांचेवर शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये त्वरीत एफ.आय.आर.दाखल करण्यात यावा, तसेच यापुढे देणगी काऊंटर व कॅश संबंधित व्यवहार असतील अशा सर्व ठिकाणचे कंत्राटी कर्मचारी काढून घेण्यात यावे. त्याचेऐवजी सध्या पुरेसे कायम कर्मचारी उपलब्ध नसल्याने उपलब्धतेनुसार कायम कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना/कामगार अधिकारी/मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४४. सर्जीकल इन्स्ट्रुमेंटस (हत्यारे ) खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.८१९.** श्री साईबाबा रुग्णालयाकरीता खरेदी करावयाची सर्जीकल इन्स्ट्रुमेंटस (हत्यारे) खरेदीकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०२/१०/२००५ चे सभेतील निर्णय क्र. ६१४ अन्वये रु. ५०,००,०००/- (रु. पन्नास लाख मात्र) चे खर्चास मंजुरी मिळालेली आहे. सदरची हत्यारे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहीरात देऊन दि. १७/१०/२००५ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरून एकूण १८ निविदा प्राप्त झाल्या होत्या. तथापि, सर्जिकल इन्स्ट्रुमेंटसाठी फक्त ५ निविदा प्राप्त झाल्या होत्या. परंतु सदर ५ प्राप्त निविदामधून सर्व हत्यारांची खरेदी परिपूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे प्राप्त झालेल्या निविदा व्यतिरीक्त मे. कालेलकर सर्जिकल-मुंबई, सिन्थेसीस-मुंबई, मनमन-पुणे, झेनीथ सर्जिकल-मुंबई इत्यादी निविदा मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी यांचे मार्फत प्राप्त झाल्या होत्या. तसेच मे.सुश्रूत सर्जीकल, मुंबई यांचेही दरपत्रक प्राप्त झालेले होते.

मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी यांचेकडून प्राप्त झालेले दरपत्रक अधिक इतर निविदास अनुसरून प्राप्त झालेल्या निविदा यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला आहे. मे. कालेलकर सर्जिकल, मुंबई यांनी जवळजवळ सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियेच्या हत्यारांचे सेट तयार करुन कोटेशन दिलेले आहे. (उदा. गायनिक, जनरल सर्जरी, ई.एन.टी., कार्डीओथोरॅसिक इत्यादी.) मात्र इतर निविदाधारकांनी परिपूर्ण हत्यारांची यादी दिलेली नव्हती. शिवाय तुलनात्मक तक्त्यांचे दरात मे. कालेलकर सर्जिकल, मुंबई यांचे दर निम्नत्तम पण दिसून येतात.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०५/११/२००५ चे सभेतील निर्णय क्रमांक ६९८ (फ) अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

दिनांक ०२/१०/२००५ च्या सभेत निर्णय क्रमांक ६१४ प्रमाणे रु. ५० लाख पर्यंतच्या खरेदीस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. यासाठी जाहीरातीस अनुसरून पाच निविदा प्राप्त झालेल्या होत्या व त्यानंतरही काही दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन हत्यांराचा दर्जा व किंमतीनुसार निर्णय घ्यावा. उपलब्ध झालेल्या निविदापैकी ज्या प्रकारच्या हत्यारासाठी निविदा आलेली नसेल त्यासाठी देखील इतर नामांकित कंपनीकडून दरपत्रके मागवून निर्णय घ्यावा, असे ठरले. मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी यांनी मे. कालेलकर सर्जिकल-मुंबई, सिंथेसीस मेडीकल प्रा. लि. मुबई, पराग एंटरप्रायजेस-मुंबई, मनमन-पुणे यांना चर्चा/वाटाघाटीसाठी आजचे सभेपूढे बोलविले होते. त्यापैकी पराग एंटरप्रायजेस-मुंबई यांनी आपल्या जाहीरातीस अनुसरून निविदा भरलेली होती. तर उर्वरीत पुरवठाधारकांनी आजचे सभेपुढे समक्ष दरपत्रके दिलेली आहेत. मे. कालेलकर सर्जिकल-मुंबई यांनी रु. १० लाखापर्यंतचे खरेदीवर ३ टक्के सूट व रु. १० लाखावरील खरेदीवर ५ टक्के सूट देऊ केली आहे. त्यानुसार सूट विचारात घेऊन पुढील खरेदीसंबंधी निर्णय घेणेत यावा, असे ठरले. या हत्यांराची यादी एकाचवेळी परिपूर्ण होऊ शकत नसल्यामुळे डिसेंबर-२००६ पर्यंत वरचेवर लागेल तशी हत्यारे खरेदी करण्यात यावीत, इतर पुरवठाधारकांनी आपणास काय सवलत देता येईल याबद्दल पत्राने कळवावे, असे सांगणेत आले व त्यांचेकडून सूट प्राप्त झालेनंतर दर्जात्मक व किंमतीस योग्य असतील अशा पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देण्यात यावा, रुग्णालय तातडीने सुरु करण्याचे असल्याने या संबंधीचा निर्णय मा. विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी व मा. विश्वस्त डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांनी घ्यावा, असे ठरले.

त्यानुसार दि. ०७/१२/२००५ रोजी प्रशासकीय अधिकारी व वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये, यांनी मा.विश्वस्त डॉ. पी. एल. तिवारी यांचेकडे मुंबई येथे जाऊन याबाबत सविस्तर चर्चा केली असता त्यांनी खालीलप्रमाणे खरेदी त्वरित करणेबाबत सूचना केलेल्या आहेत.

**१)** मे. कालेलकर सर्जिकल, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या कोटेशनमधून जनरल सर्जरी - ०२ सेट, गायनिक सर्जरी - ०२ सेट, इ.एन.टी. इन्स्ट्रूमेंट - ०१ सेट, कार्डीयाक सर्जरी इन्स्ट्रूमेंट - ०१ सेट, ऑन्को सर्जरी - ०१ सेट इत्यादीचा आदेश देण्यात यावा, असे सांगितले. त्यानुसार पत्र क्रमांक १४२४९ दि.०८/१२/२००५ अन्वये जनरल सर्जरी - ०१ सेट, गायनिक सर्जरी - ०२ सेट, इ.एन.टी. इन्स्ट्रूमेंट - ०१ सेटचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्याची किंमत रु.११,६४,५६३/- इतकी आहे.

**२)** आर्थोपेडीक इन्स्ट्रुमेंटसाठी मे. सिन्थेसीस मेडीकल, मुंबई व सुश्रुत सर्जीकल,मुंबई यांची दरपत्रके प्राप्त झालेली होती. चर्चेमध्ये मे.सुश्रुत सर्जीकल,मुंबई यांचेपेक्षा मे. सिन्थेसीस मेडीकल, मुंबई यांचे हत्याराचा दर्जा चांगला असल्याने मे.सिन्थेसीस मेडीकल, मुंबई यांना आर्थोपेडीक शस्त्रक्रियेसाठी लागणाऱ्या हत्यारांचा पुरवठा आदेश देण्यात यावा.

**३)** मे. झेनीथ सर्जिकल, मुंबई यांना कार्डीयाक सर्जरीची हत्यारे जी कालेलकर यांचेकडे नाहीत त्याचा पुरवठा आदेश देण्यात यावा.

**४)** मे. मनमन, पुणे यांचेकडून आर्थोपेडीक शस्त्रक्रियेसाठी लागणारी इलेक्ट्रीक सॉ व ॲक्सेसरीजचे दोन सेट घेण्यात यावेत.

त्यानुसार खरेदीचा तपशील खालीलप्रमाणे.

**अ)** कार्डीयाक इन्स्ट्रूमेंट व ऑन्को सर्जरी व जनरल सर्जरीचा अतिरिक्त सेट इत्यादी हत्यारांचे मे.कालेलकर सर्जीकल,मुंबई यांचेकडून खरेदीसाठी एकूण रु.८,०९,६९४.८१ इतका खर्च येणार आहे.

**ब)** मे.कालेलकर सर्जिकल,मुंबई यांचेकडे जी कार्डीयाक इन्स्टुमेंट नाहीत त्यासाठी मे.झेनीथ सर्जिकल, मुंबई यांचेकडून खरेदीसाठी रु. २१,०१,९३३/- खर्च येईल.

**क)** मे. सिन्थेसीस, मुंबई यांचेकडून आर्थोपेडीक विभागासाठी लागणारे इन्स्ट्रुमेंट खरेदीसाठी रु.२८,९३,५००/- खर्च येईल.

**ड)** मे. मनमन, पुणे यांचेकडून खरेदीसाठी रु.१,६७,३३४/- इतका खर्च येईल.

वरीलपैकी मे.कालेलकर यांचेकडून आलेले जनरल सर्जरीचे दरपत्रकामध्ये निविदेनुसार बहुतांशी हत्यारांसाठी दर आलेले आहेत. त्यांनी दि.५.११.२००५ चे सभेमध्ये मान्य केल्याप्रमाणे रुपये १० लाखावरील खरेदीसाठी ५% सूट देण्याचे मान्य केलेले आहे. त्यामुळे मे.कालेलकर यांचेकडून जनरल सर्जरीच्या त्यांचे यादीप्रमाणे तसेच वरील अ.नं. ०१ प्रमाणे दिलेल्या पुरवठा आदेशाप्रमाणे हत्यारे खरेदीस मान्यता देण्यात आली. व निविदेनुसार मे.इमरजेन्ट, यांचेकडून न्यूनतम दराने ऑपरेशन थिएटरमधील कॉटरीज खरेदीसाठी मान्यता देण्यात आली.

मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी सुचविलेल्या उर्वरित ऑन्को, कार्डीओव्हॅस्कुलर व आर्थोपेडिक सर्जरी हत्यारे इत्यादी खरेदीसाठी फेर निविदा काढण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४५.** **श्री साईबाबा रुग्णालयासाठी मशिनरी/उपकरणे/हत्यारे खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.८२०.** नवीन श्री साईबाबा रुग्णालयाकरीता व्यवस्थापन समितीचे दिनांक २.१०.२००५ चे सभेतील निर्णय क्र.६१४ अन्वये ऑपरेशन थिएटरकरीता आवश्यक असणारी शस्त्रे खरेदीकामी रुपये ५० लाख इतक्या खर्चास मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार आतापर्यन्त सुमारे रुपये ४८ लाख इतक्या रकमेच्या हत्यारांचे पुरवठा आदेश अलाहिदा देण्यात येत आहेत. याव्यतिरिक्त अजून नेत्रशल्यचिकीत्सा विभाग,जनरल सर्जरी, आर्थो., गायनिक,कार्डियाक इत्यादी विभागासाठी नवनवीन मशिनरी/ उपकरणे/ हत्यारे इत्यादी खरेदी करावी लागणार आहेत.

नेत्रशल्य चिकित्सक विभागासाठी लागणाऱ्या मशिनरी/हत्यारे इत्यादी खरेदीकामी मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेल्या टिपणीची प्रत सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आली होती. ती सोबत **परिशिष्ट "ड"** म्हणून ठेवण्यात आली आहे. या लागणाऱ्या मशिनरी/हत्यारे खरेदी कामी अंदाजे रुपये २,४४,१५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.त्याचा तपशिल थोडक्यात खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Description | Amount Rs. |
|---|---|---|
| 01. | Diagnostic Instruments | 1,64,45,000.00 |
| 02. | Surgical /Therapeutic Instruments | 59,70,000.00 |
| 03. | Surgical Instruments sets | 30,00,000.00 |
| | **Total** | **2,44,15,000.00** |

तसेच या व्यतिरिक्त जनरल सर्जरी, आर्थो., गायनिक, कार्डियाक इत्यादी शस्त्रक्रिया विभागासाठी आवश्यकतेनुसार हत्यारे /उपकरणे, किरकोळ साहित्य इत्यादी खरेदी करावे लागणार आहेत. त्याची माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | Description | Amount Rs. |
|---|---|---|
| 1) | Orthopedic Instruments. | 53,40,000/- |
| 2) | Physiotherapy Machines. | 10,00,000/- |
| 3) | Cardiology Instruments. | 20,15,000/- |
| 4) | Neurology/ Neuro Surgery Instruments. | 30,00,000/- |
| 5) | Radiology Instruments. | 6,75,000/- |

| | | |
|---|---|---|
| 6) | Bio Medical Waste Management. | 1,36,000/- |
| 7) | Pathology/Microbiology Instruments. | 7,20,000/- |
| 8) | Others. | 10,55,000/- |
| 9) | Store/Sundry Items. | 60,59,533/- |
| | **Total:-** | 2,00,00,533.00 |

याकामी रुपये २,००,००,५३३/- (अक्षरी रुपये दोन कोटी पाचशे तेहतीस मात्र) खर्च अपेक्षित आहे. (तपशीलवार यादी **परिशिष्ट "इ"** म्हणून ठेवण्यात आलेली आहे.)

उपरोक्त नुसार नेंत्रशल्यचिकित्सा विभागासाठी लागणाऱ्या मशिनरी /हत्यारे खरेदीकामी रुपये २,४४,१५,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. सदर खरेदीकामी आवश्यक तेथे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात. तसेच प्रस्तावित केलेल्या जनरल सर्जरी, आर्थो., गायनिक, कार्डियाक इत्यादी शस्त्रक्रिया विभागासाठी आवश्यकतेनुसार हत्यारे / उपकरणे,किरकोळ साहित्य खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,००,००,५३३/- (अक्षरी रुपये दोन कोटी पाचशे तेहतीस मात्र) चे खर्चास मान्यता देण्यात आली. या वस्तूची खरेदी यापुर्वीच्या निर्णयानुसार मा.विश्वस्तांच्या सल्ल्यानुसार विहीत पध्दतीने करण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४६.** **श्री साईबाबा रुग्णालयाकरीता कार्यालयीन फर्निचर खरेदीबाबत**

**निर्णय क्र.८२१.** श्री साईबाबा रुग्णालयात नव्याने सुरु करावयाचे कार्डीओलॉजी / नेफ्रॉलॉजी विभागासाठी खरेदी करावयाचे कार्यालयीन फर्नीचरसाठी अंदाजे रु. २०,६४,०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदर फर्नीचर खरेदीचा प्रस्ताव मंजुरीसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १७/०४/२००५ चे सभेपुढे ठेवण्यात आला होता. त्यानुसार सदरचे खरेदी ही वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस व रु. २०,६४,०००/- चे खर्चास मंजुरी मिळालेली आहे.

सदर कार्यालयीन फर्नीचर खरेदी कामी दिनांक २५/०३/२००५ चे मंजुर टिपणी अन्वये सकाळ, लोकमत, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, टाईम्स ऑफ इंडीया इत्यादी वर्तमान पत्रात जाहीरात देऊन दि. १५/०४/२००५ अखेर सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन मुंबई व शिरडी येथील संस्थानच्या कार्यालयात निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. दि. १५/०४/२००५ अखेर शिरडी व मुंबई कार्यालयात मिळून एकुण १० निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

- **Office Furniture – Part "D"**

| Sr.No. | Name of Company |
|---|---|
| 01. | M/s National Agency, Mumbai |
| 02. | M/s Magnum Office Aids, Mumbai |
| 03. | M/s Atul Enterprises, Mumbai |
| 04. | M/s Abhay Steel Industries, Nashik |
| 05. | M/s Arihant Industries, Nashik |
| 06. | M/s Abhaykumar Bafna, Shrirampur |
| 07. | M/s Jaidurga Collections, Yeola |
| 08. | M/s S.S.I.D.C.Ltd., Ahmednagar |
| 09. | M/s S.R. Furniture & Interior, Pune |
| 10. | M/s Century Coolers, Nagpur – ***Late on 16/04/2005*** |

उपरोक्त १० बंद निविदा मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८.०७.२००५ चे सभेतील निर्णय क्र.३३५ अन्वये समक्ष उघडण्यात आल्या होत्या. त्यांचा तुलनात्मक दरांचा तक्ता करुन तो मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०८.२००५ चे सभेपुढे ठेवण्यात आला होता व त्याच दिवशी सदरहू निविदाधारकांना चर्चा / वाटाघाटीसाठी प्रत्येक फर्निचरचा १ नमुना घेऊन समक्ष शिर्डी येथे बोलवण्यात आले होते. परंतू मुंबईत झालेल्या अतिवृष्टीमुळे फक्त दोनच निविदाधारकांनी आपल्या मालाचे नमुने आणले होते. त्यामुळे त्या दिवशी या विषयावर निर्णय होऊ शकला नाही. त्यावर चर्चा होऊन निर्णय क्रमांक ३९६ खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"गट ड प्रकारच्या कार्यालयीन फर्निचरसाठी १० निविदाधारकांनी निविदा भरल्या होत्या. त्यातील काहीची पहाणी केली असता त्यांचे साहित्य योग्य दर्जाचे आढळले नाही. उरलेल्याची पहाणी करुन फर्निचर योग्य नसल्याने उत्कृष्ट अशा गोदरेज कंपनीकडून समक्ष निविदा घेऊन खरेदी करावी असे मत मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी व मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर नोंदविले त्यानुसार त्यांना टेंडरमध्ये मागणी केलेल्या १ ते १३ प्रकारच्या फर्निचरचा पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले."

त्यानुसार गोदरेज कंपनीचे दरपत्रक मागवण्यात आले होते. तथापी गोदरेज कंपनीच्या तोडीचेच फर्निचर मे.खिरा स्टील इंडस्ट्रीज, मुंबई हे देखील बनवत असल्यामुळे त्यांचेकडून देखील मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी साहेब यांनी दर मागवले होते ते मे. खिरा, मुंबई यांनी दि. १५/१२/२००५ चे पत्रान्वये त्यांचेकडील फर्निचरचे दर दिले आहे.सोबत मे.गोदरेज व खिरा यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता सादर केला आहे. गोदरेज च्या तुलनेत मे.खिरा यांचे दर कमी दिसून येत आहे. मे.खिरा स्टील इंडस्ट्रीज, मुंबई यांनी दिलेल्या दरावर ५ टक्के सुट देऊ केलेली आहे व १० % CST किंमतीत अंतर्भूत करण्याचे मान्य केले

आहे. सदर कार्यालयीन फर्नीचरची मुळ मागणीमध्ये काही वाढ सुचविली आहे तर काहींची नविन मागणी करण्यात आलेली आहे. नामांकित कंपनीचे फर्नीचर घ्यावयाचे ठरल्यामुळे मुळ अंदाजापेक्षा रु. २०,७४,२४१.८० इतका जास्तीचा खर्च येणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

तसेच रुग्णालय लवकरात लवकर सुरु करावयाचे असल्याने मे.खिरा स्टिल इंडस्ट्रीज,अहमदाबाद यांचेकडून खरेदी करण्यात यावे. त्यांना त्वरीत पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४७. नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या प.पू.योगी स्वामी रामदेवजी महाराज, हरिद्वार, यांचे प्राणायाम, योग व चिकित्सा विज्ञान शिबीराबाबत.**

**निर्णय क्र.८२२.** प.पू.योगी स्वामी रामदेवजी महाराज,हरिद्वार, यांचे प्राणायाम, योग व चिकित्सा विज्ञान शिबीर गुरुवार दिनांक ५ जानेवारी, २००६ ते बुधवार दिनांक ११ जानेवारी,२००६ या कालावधीत श्रीक्षेत्र नाशिक येथे आयोजित करण्यात आलेले असून या शिबीरास श्रीसाईबाबा संस्थानचे मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व सर्व मा.विश्वस्तांनी उपस्थित रहावे व या कार्यक्रमास संस्थानच्या दोन टाटा सूमो व टी.व्ही.संच मोफत वापरण्यास मिळावेत अशी मा.विश्वस्त श्री.शैलेश श्रीहरी कुटे व मा.श्री.के.सी.पाण्डेय यांनी केलेली विनंती मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभाग/ध्वनीक्षेपण विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४८. पर्यटन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून संस्थानला बगीचा उभारणीकामी आर्थिक सहाय्य मिळविणेसाठी सल्लागाराची नियुक्ती करणेबाबत** ...

**निर्णय क्र.८२३.** शिर्डी येथे मोठ्या प्रमाणावर श्री साईभक्त श्रीबाबांच्या दर्शनासाठी येत असतात. श्रीबाबांचे दर्शन झाल्यानंतर त्यांना विरुंगळा म्हणून शिर्डी येथे थांबण्यासाठी /पहाण्यासाठी सध्या एकही रमणीय ठिकाण नाही. यासाठी मा. व्यवस्थापन समितीने श्री साईभक्तांना कुटुंबियासोबत काही काळ आनंदात घालवता यावा, त्यांना प्रवासात आलेला थकवा दूर व्हावा यासाठी शिर्डी येथे संस्थानला मिळालेल्या शेती महामंडळाच्या २० एकर विस्तारित जागेत अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असा रुपये २६.५१ कोटी खर्च करुन सुंदर बगीचा उभारणी करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

भारतीय पर्यटन विकास महामंडळाने तयार केलेल्या योजनेनुसार तिर्थ क्षेत्रांचा विकास करण्यासाठी पर्यटन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून तिर्थ क्षेत्राला आर्थिक सहाय्य केले जाते. हे आर्थिक सहाय्य संस्थानला मिळण्यासाठी नियोजित बगीचा उभारणी करण्याचा प्रकल्प अहवाल विधिविहीत पध्दतीने तयार करुन केंद्र सरकारला मंजुरीसाठी पाठवावयाचा असतो. सदर अहवाल त्रुटीविरहीत तयार करणे, अहवाल मंजुर होण्यासाठी संबंधीत मंत्रालयात त्याचा पाठपुरावा करणे इ. स्वरुपाची कामे व त्यातील सखोल ज्ञान असणाऱ्या एजन्सी किंवा चार्टड अकौंन्टन्ट यांना प्रकल्प अहवाल सल्लागार म्हणून नेमणे गरजेचे आहे.

उपरोक्तप्रमाणे संस्थानच्या नियोजित बगीचा उभारणीच्या प्रकल्पासाठी होणाऱ्या खर्चास केंद्र सरकारकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी श्री अभय शास्त्री, चार्टड अकौंन्टन्ट, पुणे यांनी संस्थानला प्रकल्प सल्लागार म्हणून काम पहाण्यास, या संदर्भातील प्रकल्प अहवाल तयार करणे, संस्थानला आर्थिक सहाय्य मिळवून देणेबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणे इ. बाबत नेमणूक व्हावी अशी विनंती करणारे पत्र दिनांक १६ डिसेंबर २००५ रोजी दिले आहे. या पत्राप्रमाणे प्रकल्प सल्लागार म्हणून त्यांनी रुपये २ लाख एवढे एकत्रीत मानधनाची मागणी केलेली आहे.

श्री अभय शास्त्री, चार्टड अकौन्टन्ट, पुणे यांच्या प्रस्तावावर मा. अध्यक्ष सो. यांनी दिलेल्या निर्देशानुसार नियोजित बगीचा बांधणीसाठी संस्थानला केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाकडून आर्थिक सहाय्य मिळवून देणेसाठी प्रकल्प अहवाल तयार करणे व मंजुर होणेसाठी त्याचा पाठपुरावा करणे इ. कामासाठी त्यांना एकत्रीत मानधन म्हणून रुपये २ लाख देवून, त्यांची सदर प्रकल्प अहवालासाठी नेमणूक होणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थानचे नियोजित बगीचा उभारणीच्या प्रकल्पावर होणाऱ्या खर्चास केंद्रसरकारच्या पर्यटन मंत्रालयाकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी श्री.अभय शास्त्री चार्टर्ड अकौंटंट पुणे यांची रुपये २,००,०००/- एवढे एकत्रित मानधनावर प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी/बांधकाम विभाग प्रमुख)

वरील निर्णय क्र.७३१ ते ८२३ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरित/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )

स्वाक्षरित/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )